# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.११/ २०१५** **दिनांक २३.०७.२०१५**
**स्थळ- साईनिवास अतिथीगृह, शिर्डी** **वेळ- दुपारी ०४.०० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा गुरुवार दिनांक २३.०७.२०१५ रोजी दुपारी ०४.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ २२४१/ २०१५, दिनांक २३/०७/२०१५ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा गुरुवार दिनांक २३.०७.२०१५ रोजी दुपारी ०४.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये मा.अध्यक्ष श्री.विनय जोशी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री. विनय जोशी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, अध्यक्ष
०२. मा.श्री.अनिल कवडे, जिल्हाधिकारी, अहमदनगर, सदस्य
०३. मा.श्री.राजेंद्र जाधव, कार्यकारी अधिकारी, सदस्य

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत येऊन, मा.अध्यक्ष श्री.विनय जोशी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

**विषय नं.०१** **दिनांक २२.०६.२०१५ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.२०१** दिनांक २२.०६.२०१५ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविणेत आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करणेत आले.

---

**विषय नं.०२** **दिनांक २४.०६.२०१५ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.२०२** दिनांक २४.०६.२०१५ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविणेत आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करणेत आले.

---

**विषय नं.०३** **दिनांक ०४.०७.२०१५ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.२०३** दिनांक ०४.०७.२०१५ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविणेत आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करणेत आले.

---

**विषय नं.०४** **दिनांक १४.०७.२०१५ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.२०४** दिनांक १४.०७.२०१५ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.

०१ **बांधकाम विभागाकरीता Auto desk Auto CAD Design suite standard- 2015 Commercial New SLM ACE Promo ची Licensed Copy खरेदीकामी विविध नामांकीत कंपन्यांकडून तिस-यांदा प्राप्त झालेल्या निविदा उघडणेबाबत.**

**अधिनियम 2004 मधील तरतुद:** कलम 17 (1) भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्रं.:** 1) मा.व्यवस्थापन समितीचे दि. 06/11/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 955. 2) मा.व्यवस्थापन समितीचे दि.18/02/2015 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 21.

**प्रास्ताविक:** श्री साईबाबा संस्थानकरीता विविध बांधकाम प्रकल्प उभारणे, दैनंदिन देखभाल दुरुस्तीची कामे तसेच इतर आर्किटेक्ट यांचेकडुन प्राप्त झालेले ड्राईग संगणकावर बघता यावे व त्यात आवश्यकतेनुसार बदल करणेसाठी Auto CAD - 2015 Software खरेदीकामी बांधकाम विभागाने उपरोक्त दि. 30/092014 रोजीचे अन्वये मागणी केलेली आहे. सदर Software माहिती तंत्रज्ञान विभागाकडे उपलब्ध नसल्याने संबंधीत Software खरेदी करणेकामी अंदाजे रक्कम रुपये 1,50,000/-+ टॅक्सचे खर्चास मा.व्यवस्थापन समितीचे दि.06/11/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 955 अन्वये मान्यता घेण्यात आलेली होती.

त्यानुसार Auto CAD - 2015 Software खरेदीसाठी संस्थानचे विहित पध्दतीने कार्यवाही होणेकामी विविध पुरवठाधारकांकडुन संस्थानचे संकेतस्थळावर (www.sai.org.in) दि. 10/10/2014 रोजीचे मंजुर टिपणी अन्वये जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार प्राप्त झालेल्या निविदा संदर्भ क्रं. 05 चे मंजुर टिपणी अन्वये मा. उप-समितीचे दि. 23/12/2014 रोजीचे सभेत उघडणेसाठी सादर केले असता, दोनच निविदा मुदतीत प्राप्त झालेल्या असल्याने दि. 23/12/2014 रोजीचे तुलनात्मक तक्त्यावर मा. कार्यकारी अधिकारी सो., यांनी दिलेल्या निर्देशानुसार दोनच निविदा मुदतीत प्राप्त झाल्याने दोन्हीही निविदा रद्द करणेत येऊन, प्रस्तावीत कामी फेर निविदांची मागणी करणेत यावी, असे निर्देश दिलेले आहे.

परंतु, सदरचे कालावधीत डॉलरचे दरात वाढ झाल्याने Auto CAD - 2015 Software चे दर वाढल्याने प्राप्त निविदाधारकांचे नमुद दर हे 1,62,000/- च्या पुढे असल्याने Auto CAD - 2015 Software खरेदीसाठी पुनश्च अंदाजे रक्कम रुपये 2,00,000/- + टॅक्स मात्रचे खर्चास मान्यता घेणेकामी फेर प्रस्ताव मा. उप-समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करण्यात आला होता. त्यास दि. 18/02/2015 रोजीचे सभेत मान्यता मिळालेली असुन प्रस्तावित कामी दि. 23/03/2015 रोजीचे मंजुर टिपणी अन्वये संस्थानचे संकेतस्थळावर दि. 01/04/2015 ते दि. 15/04/2015 पर्यंत जाहिरात प्रसिध्द करुन विविध कंपन्याकडुन फेर निविदा मागविण्यात आले होते. सदरकामी एकच निविदा आवक विभागामार्फत बंद पाकीटामध्ये प्राप्त झालेली असल्याने दि. 06/06/2015 रोजीचे मंजुर टिपणी अन्वये सदर कोटेशन रद्द करुन Auto CAD - 2015 Software संस्थानचे विहित पध्दतीने खरेदी करणेकामी विविध पुरवठाधारकांकडुन फेर निविदा संस्थानचे संकेतस्थळावर दि. 15/06/2015 ते दि. 30/06/2015 अखेर (तृतीय वेळेस) ठेवण्यात आली होती. त्यानुसार विविध पुरवठाधारकांकडुन प्राप्त झालेल्या निविदांचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.न. | कंपनीचे नाव | आवक नंबर दिनांक | शेरा |
|---|---|---|---|
| 1. | Sujata Computer Pvt. Ltd, Pune. | आ.नं. 5820 दि. 27/06/2015 | मुदतीत प्राप्त |
| 2. | M/S Protocol one IT Labs Pvt. Ltd, Mumbai | आ.नं. 5822 दि. 27/06/2015 | मुदतीत प्राप्त |
| 3. | LDS Infotech Pvt. Ltd, Pune | आ.नं. 5861 दि. 29/06/2015 | मुदतीत प्राप्त |
| 4. | Softtech Engineers Pvt. Ltd, Pune | आ.नं. 5969 दि. 30/06/2015 | मुदतीत प्राप्त |
| 5. | Avikam Agencies, Nashik | आ.नं. 5972 दि. 30/06/2015 | मुदतीत प्राप्त |
| 6. | Minitech System (I) Pvt Ltd, Nashik | आ.नं. 5973 दि. 30/06/2015 | मुदतीत प्राप्त |

**मागणी:** प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे Auto CAD - 2015 Software खरेदीसाठी मा.व्यवस्थापन समितीचे दि. 18/02/2015 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 30 (21) नुसार अंदाजे रक्कम रुपये 2,00,000/- + टॅक्स मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे (तृतीय वेळेस) प्राप्त झालेल्या निविदा मा. उपसमितीचे सभेपुढे उघडुन, सदर उघडलेल्या निविदेतील तांत्रिक बाबी संस्थानचे तांत्रिक सल्लागार श्री विजय नायडु यांचेकडुन तपासुन त्यांचा याकामी अभिप्राय घेऊन न्युन्नतम निविदाधारक/पुरवठाधारक यांचेकडून Auto CAD-2015 Software खरेदी करता येईल, असे नम्र मत आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव या नुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :** तांत्रिक, आर्थिक व प्रशासकीय.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:** प्रास्ताविकेत व मागणीमध्ये नमुद केलेप्रमाणे Auto CAD- 2015 Software बांधकाम विभागासाठी Auto CAD- 2015 Software खरेदीकामी प्राप्त झालेल्या निविदा मा. उपसमितीचे सभेपुढे उघडुन, सदर उघडलेल्या निविदेतील तांत्रिक बाबी संस्थानचे तांत्रिक सल्लागार श्री. विजय नायडु यांचेकडुन तपासुन त्यांचा याकामी अभिप्राय घेऊन न्युन्नतम निविदाधारक / पुरवठाधारक यांचेकडून Auto CAD - 2015 Software खरेदी करणेकामीचे मान्यतेस्तव प्रस्ताव मा. उपसमितीचे सभेपुढे सविनय सादर.

बांधकाम विभागाकरीता Auto desk Auto CAD Design suite standard- 2015 Commercial New SLM ACE Promo ची Licensed Copy खरेदीकामी विविध नामांकीत कंपन्यांकडून तिस-यांदा प्राप्त झालेल्या निविदा आजचे उपसमिती सभेसमोर उघडणेत आल्या.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रमाणे उघडणेत आलेल्या निविदांमधील तांत्रिक बाबी संस्थानचे तांत्रिक सल्लागार श्री. विजय नायडु यांचेकडुन तपासुन घेण्यात याव्यात व त्यांच्या अभिप्रायानुसार निम्नतमदरधारक पात्र असल्यास निम्नतम दरधारकांस सदरहूकामी कार्यादेश देणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस आहे.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

०२ **पाणी पुरवठा विभागासाठी पाणी तपासणी करणेसाठी एजन्सीची नेमणूक करणेकामी प्राप्त निविदांचे तांत्रिक लिफाफे व मुळ निविदा उघडणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:-** अधिनियम कलम 21 मधील पोट-कलम (1) च्या खंड (क) अन्वये "मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे" अशी तरतुद आहे.

**प्रस्ताविक:-** पाणी पुरवठा विभागासाठी पाणी तपासणी करणेसाठी एजन्सीची नेमणूक करणेसाठी मा.उपसमिती सभा दि.३०.०१.२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ११ नुसार खालीलप्रमाणे निर्णय संमत झालेला आहे.

"उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होवून, सन २०१५ करीता संस्थानमधील पाण्याच्या नमुन्यांची तपासणी करणेसाठी विहीत पध्दतीने निविदा मागवून एजन्सीची नेमणूक करण्यात यावी, याकामी येणा-या जाहिरातीच्या व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

**प्रस्तावना:-** पाणी पुरवठा विभागास पाणी तपासणी करणेसाठी एजन्सीची नेमणूक करणे आवश्यक असल्याने, दि.०८.०५.२०१५ रोजीचे मंजुर टिपणी अन्वये दि. १९.०५.२०१५ रोजीचे वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली होती. निविदा प्रक्रियेच्या तारखांचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.नं. | तपशील | कार्यवाही |
|---|---|---|
| १ | वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिद्धी | दि. १८-१९.०५.२०१५ |

| | | |
|---|---|---|
| २ | निविदा विक्री कालावधी | दि. २०.०५.२०१५ ते दि. २५.०५.२०१५ पर्यंत कार्यालयीन वेळेत |
| ३ | भरलेल्या निविदा स्विकारण्याची अंतिम दिनांक व वेळ | दि.३०.०५.२०१५ सायं.०५.०० वा.पर्यंत |
| ४ | तांत्रिक लिफाफा उघडणेबाबत मान्यता घेणे | ०५ ते ०६ दिवस |
| ५ | तांत्रिक निविदा उघडण्याची दिनांक | पुढील मा.व्यवस्थापन उपसमितीचे सभेत |
| ६ | मुळ निविदा उघडण्याची दिनांक | पुढील मा.व्यवस्थापन उपसमितीचे सभेत |
| ७ | आदेश पारित करणे | मा.व्यवस्थापन उपसमितीचे सभेतील निर्णयाची मुळ प्रत प्राप्त झालेनंतर. |

उपरोक्त कामी विहीत मुदतीत खालील ०३ निविदाधारकांच्या निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अं.नं. | निविदा धारकांचे नांव | आवक नंबर | दिनांक |
|---|---|---|---|
| ०१ | एनव्हायरो केअर लॅब प्रा.लि, नाशिक. | ४००९ | ३०.०५.२०१५. |
| ०२ | मे गडार्क लॅब प्रा. लि. नेरुर देऊलवाडा | ४०४३ | ३०.०५.२०१५. |
| ०३ | अश्वमेध इंजिनिअर्स & कंन्सलटंट, नाशिक. | ४०४४ | ३०.०५.२०१५. |

उपरोक्त कामी प्राप्त ०३ निविदा मा.व्यवस्थापन उपसमितीचे सभेत उघडून प्राप्त ०३ निविदेतील लिफाफा क्रमांक १ उघडून मागणी केलेल्या कागदपत्रांची तपासणी लेखाशाखेमार्फत करण्यात येईल. कागदपत्रांची पुर्तता केलेल्या निविदाधारकांची निविदा पात्र ठरविता येईल. नंतर पात्र निविदाधारकांच्या मुळ निविदा उघडून योग्य निर्णय घेता येईल.

तरी प्रस्तावित केल्याप्रमाणे पाणी पुरवठा विभागासाठी पाणी तपासणी करणेकामी एजन्सीची नेमणूक करणेकरीता प्राप्त झालेल्या तांत्रिक निविदांचे लिफाफे आजचे उपसमिती सभेसमोर उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत आले असता, त्यामध्ये तीनही निविदाधारक पात्र ठरले. त्यानंतर निविदाधारकांचे दरांचे लिफाफे उघडणेत येऊन, त्यामधील मूळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव | निविदेमधील मुळ दर रु. (दर प्रती नमुना व्हॅटसह) |
|---|---|---|
| ०१ | एनव्हायरो केअर लॅब प्रा.लि, नाशिक. | १२००/- |
| ०२ | मे गडार्क लॅब प्रा. लि. नेरुर देऊलवाडा | १७००/- |
| ०३ | अश्वमेध इंजिनिअर्स & कंन्सलटंट, नाशिक. | १२५०- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, पाणी पुरवठा विभागास पाणी तपासणी करणेसाठी एजन्सीची नेमणूक करणेकामी एनव्हायरो केअर लॅब प्रा.लि, नाशिक यांचे प्रती नमुना व्हॅटसह रु.१२००/- मात्र हे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना डिसेंबर- २०१५ अखेर आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस आहे.**

(कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

०३ **श्री साईप्रसादालय येथे प्रकाशने विभागासाठी नवीन काऊंटर तयार करणेकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून त्यावर निर्णय होणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:** अधिनियमाचे कलम-२१ मधील पोटकलम (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**प्रस्ताव:** श्री साई प्रसादालय येथे प्रसाद भोजनाचा लाभ घेणेसाठी येणारे साईभक्तांना साईबाबांचे जिवनावरील आधारीत चरित्र/ पुस्तके व फोटो खरेदी करता यावे करीता, श्री साईप्रसादालयामध्ये तळमजल्यावर 2726 चौ. फुटामध्ये प्रकाशने विभागासाठी पुस्तक/ फोटो विक्री काउंटर तयार करणेत आलेले आहे. सदर काउंटरवर पुस्तके व इतर साहीत्य खरेदी करणा-या साईभक्तांची संख्या अत्यल्प असल्यामुळे मा. कार्यकारी अधिकारी यांनी त्यांचे दि.१२/१०/२०१४ रोजीचे पहाणी दरम्यान सदरचे पुस्तक विक्री काउंटर प्रसादालय परिसरात इतर ठिकाणी स्थलांतरीत करुन सध्याचा हॉल प्रसादालयातील साहीत्य ठेवणेसाठी सूचना केल्या आहेत. याबाबत श्री साईप्रसादालय विभागाने त्यांचे दि.२२/१०/२०१४ रोजीचे पत्राव्दारे कळविले आहे.

श्री साईप्रसादालयाचे दक्षिण बाजू कम्पांउड भिंतीलगत दोन प्रवेशव्दारांमध्ये असलेले मोकळ्या जागेमध्ये प्रकाशने विभागाचे कांउटर कामासाठी येणा-या रक्कम रु.२,२३,७२६/- मात्रचे खर्चास व याकामी विहीत पध्दतीने निविदा मागविणेस मा. त्रिसदस्य समितीचे दि.३०/०१/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ०२ अन्वये मान्यता देण्यात आली. त्यानुसार याकामी खालील तपशिलानुसार निविदा सूचना प्रसिध्द करणेत येऊन, निविदा मागविणेत आलेल्या आहेत.

१. दि.०३/०३/२०१५ रोजीचे मंजूर टिपणीन्वये दि.१८/०३/२०१५ रोजीचे दै. सार्वमत, श्रीरामपूर व दै. बहूजनरत्न लोकनायक, नाशिक या वर्तमान पत्रातून निविदा सूचना हि जाहिरात प्रसिध्दीस देण्यात आलेली होती. दि.२७/०३/२०१५ रोजी पर्यंतच्या को-या निविदा विक्रीच्या अंतिम मुदतीत एकही निविदा विक्री झालेली नाही.

२. दि.११/०४/२०१५ मंजूर टिपणीन्वये दि.२४/०४/२०१५ रोजीचे दै. पुढारी या वर्तमान पत्रातून व संस्थानचे संकेतस्थळावर निविदा सूचना प्रसिध्दीस देण्यात आलेली होती. सदरचे निविदा विक्रीचा कालावधी दि.३०/०४/२०१५ ते दि. ०७/०५/२०१५ अखेर देणेत आला होता. सदरचे विहित मुदतीत दोन ठेकेदारांनी कोरे निविदा अर्ज विकत घेतले होते. सिलबंद निविदा दि.११/०५/२०१५ रोजी पर्यंत सादर करणेची अंतिम मुदत देणेत आली होती. सदरचे मुदतीत फक्त Cool Expert Engineers, Pune या एकच ठेकेदाराने सिलबंद निविदा सादर केली आहे.

३. दि.२१/०५/२०१५ रोजीचे मंजूर टिपणी अन्वये दि.०७/०६/२०१५ रोजी प्रसिध्द दैनिक श्रीरामपूर एक्सप्रेस, श्रीरामपूर या वर्तमानपत्रातून व गतीपत्र, अहमदनगर या साप्ताहीकातून निविदा सूचना प्रसिध्दीस देण्यात आलेली होती. सदरचे निविदा विक्रीचा कालावधी दि.०८/०६/२०१५ ते दि.१५/०६/२०१५ अखेर देणेत आला होता. सदरचे विहित मुदतीत Windoors international Ltd., Mumbai या एकाच ठेकेदराने कोरी निविदा विकत घेतली व दि. १८/०६/२०१५ पर्यंत सिलबंद निविदा सादर करणेचे अंतिम मुदतीत निविदा सादर केली आहे.

श्री साईप्रसादालय परिसरात उपलब्ध असलेल्या एका कांउटरमध्ये सध्या प्रकाशने विभागाचे पुस्तक विक्री केंद्र स्थलांतरीत करणेत आलेले आहे. विषयांकीत कामासाठी तिन वेळेस विहित पध्दतीने वर्तमानपत्रातून व संस्थानचे संकेतस्थळावरुन निविदा सूचना प्रसिध्द करुनही खालील दोन ठेकेदरांकडून निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.नं. | निविदा सादरकर्त्यांचे नांव | आवक नं. / दिनांक |
|---|---|---|
| १. | Cool Expert Engineers, Pune | २८४८ / ११.०५.२०१५ |
| २. | Windoors international Ltd., Mumbai | ५२०६ / १८.०६.२०१५ |

उपरोक्त विषयाकित कामासाठी तिस-यांदा प्राप्त झालेल्या ०२ सिलबंद निविदा आजचे उपसमिती सभेत उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव | निविदेमधील मुळ दर रु. |
|---|---|---|
| ०१ | Windoors international Ltd., Mumbai | ४,०२,६४०/- |
| ०२ | Cool Expert Engineers, Pune | ६,५८,६५९/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालय येथे प्रकाशने विभागासाठी नवीन काऊंटर तयार करुन घेणेकामी Windoors international Ltd., Mumbai यांचे रु.४,०२,६४०/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस आहे.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

०४ **श्री साईनाथ रुग्णालयाच्या वॉर्डमधील भिंतीतील कपाटांना प्लायवूडचे दरवाजे बसविणेकामी मटेरीयल खरेदीसाठी प्राप्त झालेल्या निविदा उघडणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद :** अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**मा. त्रिसदस्य समितीचे सभेतील निर्णय:** मा.त्रिसदस्य समितीचे दिनांक ३० जानेवारी, २०१५ रोजीचे सभेत निर्णय क्र. ०३ (१८) खालील प्रमाणे झालेला आहे.

"..यावर सविस्तर चर्चा होऊन, बांधकाम विभागामार्फत श्री साईनाथ रुग्णालय वॉर्डमधील भिंतीतील कपाटांना प्लायवूडचे दरवाजे बसविणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे साहीत्य विहीत पध्दतीने खरेदी करणेस व त्यासाठी येणा-या रु.२,५४,५६३/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली."

**प्रस्ताविक:** उपरोक्त निर्णयानुसार सदरहू कामी आवश्यक असणारे मटेरिअल खरेदीसाठी दैनिक देशदुत, नाशिक या वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन दि.३१ मार्च, २०१५ अखेर सिलबंद निविदा मगविणेत आल्या होत्या. सदरचे मुदतीत फक्त श्री गणपती सॉ मिल, सिन्नर या एका पुरवठादाराने निविदा विकत घेऊन, सादर केली होती. याकामी फक्त एकच निविदा प्राप्त झालेली असल्याने, दि.१३ एप्रिल, २०१५ रोजीचे मंजूर टिपणीन्वये याकामी फेर निविदा सूचना दैनिक पुढारी, अहमदनगर व संस्थानचे संकेतस्थळावर दि.०६ मे, २०१५ रोजी प्रसिध्द करणेत येऊन, दि.०७ मे, २०१५ ते दि.१४ मे, २०१५ अखेर कोरे निविदा विक्रीचा कालावधी देऊन निविदा मागविणेत आल्या आहेत. सदरचे मुदतीत खालील पुरवठादारांनी सिलबंद निविदा विकत घेतल्या आहेत.

१. सुमंगल प्लायवूडस्, कोपरगांव
२. प्रसाद प्लायवूड ॲण्ड हार्डवेअर, राहाता
३. न्यु डेको होम कोपरगांव

वरीलप्रमाणे पुरवठादारांनी नेलेल्या को-या निविदा दि.१८ मे, २०१५ रोजी सादर करणेची अंतिम मूदत देणेत आली होती. सदरचे विहीत मुदतीत अ. नं. ०२ व ०३ चे पुरवठादारांनी सिलबंद निविदा सादर केल्या आहेत. तसेच श्री गणपती सॉ मिल, सिन्नर यांनी त्यांचे दि.१८ मे, २०१५ रोजीचे ई-मेल पत्राव्दारे त्यांनी यापूर्वी सादर केलेली सिलबंद

निविदा गृहीत धरणेत यावी असे कळविले आहे. करीता याकामी खालील प्रमाणे सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

१. श्री गणपती सॉ मिल, सिन्नर : २४७०२ / दि.२८ मार्च, २०१५
२. न्यु डेको होम, कोपरगांव : ३१७१ / दि.१८ मे, २०१५
३. प्रसाद प्लायवूड ॲण्ड हार्डवेअर, राहाता : ३२०२ / दि.१८ मे, २०१५

उपरोक्त विषयांकीत कामासाठी वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या ०३ सिलबंद निविदा आजचे उपसमिती सभेत उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव | निविदेमधील मुळ दर रु. |
|---|---|---|
| ०१ | श्री गणपती सॉ मिल, सिन्नर | २,९४,१३१/- |
| ०२ | न्यु डेको होम, कोपरगांव | २,३६,९४४/- |
| ०३ | प्रसाद प्लायवूड ॲण्ड हार्डवेअर, राहाता | २,१८,८१२/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयाच्या वॉर्डमधील भिंतीतील कपाटांना प्लायवूडचे दरवाजे बसविणेकामी आवश्यक मटेरीयल खरेदीसाठी प्रसाद प्लायवूड ॲण्ड हार्डवेअर, राहाता यांचे रु.२,१८,८१२/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस आहे.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

०५ **श्रींना अर्पण केलेल्या नारळ फळांची विक्री करणेकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडणेस मंजूरी मिळणेबाबत.**

श्रींना अर्पण करण्यात आलेल्या नारळ फळांची विक्री करणेकामी वर्तमान पत्रात जाहीरात देवून निवीदा मागवुन उच्चत्तम दराने नारळ फळांची विक्री करणेसाठी दि. ०९/०५/२०१५ रोजीच्या मा. उपसमीती सभेतील ठराव क्रं. ०९ अन्वये मान्यता घेण्यात आलेली आहे. त्यानुसार श्रींना अर्पण केलेल्या नारळ फळांची विक्री करणेबाबतची जाहीरात जनसंपर्क विभागामार्फत दि. १४/०६/२०१५ रोजी नाशीक, अहमदनगर वृत्तपत्रामधुन शासकीय दराने प्रसीध्द करण्यात आलेली होती. कोरे निवीदा अर्ज विक्री दि. १९/०६/२०१५ रोजी संपलेली असुन एकुण ०४ निवीदांची विक्री झालेली आहे. तसेच सीलबंद निवीदा सादर करावयाची मुदत दि. २०/०६/२०१५ अखेर संपलेली असुन अद्याप ०४ निवीदा प्राप्त झालेली आहे. प्राप्त झालेल्या निवीदांचा तपशील खालीलप्रमाणे –

| अं.नं. | पार्टीचे नाव | आवक नं. –दिनांक | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | सुनील शंकरराव भांड, देवळाली- प्रवरा | ५२९९ – २०/०६/२०१५ | बंद लिफाफा |
| ०२ | इम्तीयाज रफीक पठाण, कोपरगाव | ५३५४ – २०/०६/२०१५ | बंद लिफाफा |
| ०३ | रामनारायण दशरथ कराळे,निमगाव | ५३५५ – २०/०६/२०१५ | बंद लिफाफा |
| ०४ | रखमाजी मुरलीधर गाढे,बेलापुर | ५३७२ – २०/०६/२०१५ | बंद लिफाफा |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या ०४ निविदा आजचे उपसमिती सभेत उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव | निविदेमधील मुळ दर प्रती नग रु. |
|---|---|---|
| ०१ | सुनील शंकरराव भांड, देवळाली- प्रवरा | ६.५५ |
| ०२ | इम्तीयाज रफीक पठाण, कोपरगाव | ७.१० |
| ०३ | रामनारायण दशरथ कराळे, निमगाव | ७.७७ |
| ०४ | रखमाजी मुरलीधर गाढे,बेलापुर | ७.०१ |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींना अर्पण केलेल्या नारळ फळांची ११ महिने कालावधीसाठी विक्री करणेकामी रामनारायण दशरथ कराळे, निमगाव यांचे प्रती नग रु.७.७७/- मात्र उच्चतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस आहे.** (कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

---

०६ **श्री साईबाबा रुग्णालयातील Cath Lab विभागाकरिता Foot Operated Sealing Machine खरेदीकामी प्राप्त कोटेशन उघडून निर्णय होणेबाबत.**

श्री साईबाबा रुग्णालयातील Cath Lab या विभागाने दिनांक 21/07/2014 (औषध भांडार विभाग प्राप्त दि. 16/08/2014) चे मागणीपत्रान्वये 1 नग Foot Operated Sealing Machine ची मागणी केलेली आहे. सदर Foot Operated Sealing Machine हे Cath Lab विभागातील पुर्नवापर होणारे सर्जिकल साहित्य निर्जंतुक (ETO) करुन ते ETO पेपर मध्ये ते पुन्हा मशिनव्दारे पॅक करण्यात येते.

सदर Foot Operated Sealing Machine खरेदीकामी मे. कौस्तुभ एन्टरप्रायजेस, मुंबई यांचेकडून दिनांक 02/09/2014 रोजी Email पत्रान्वये अंदाजे खर्चासाठी दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यानुसार मे. कौस्तुभ एन्टरप्रायजेस, मुंबई त्यांचे दि. 24/11/2014 रोजीचे Email पत्रान्वये दर कळविले आहे.

त्याचा तपशिल खालील प्रमाणे-

| Sr. No. | Name of Item | Qty. | Rate per in Rs. | Total Amount in Rs. |
|---|---|---|---|---|
| 01. | Foot Operated Sealing Machine | 1 | 28125.00 | 28,125.00 |
| | | | **Total Amt. in Rs.** | 28,125.00 |

उपरोक्त Foot Operated Sealing Machine खरेदीकामी अंदाजे रक्कम रु. 28,125.00 इतका खर्च अपेक्षित आहे.

त्यानुसार दि.३०/०१/२०१४ रोजीचे मा. त्रिसदस्य समिती सभेतील निर्णय क्र.३ (२८) अन्वये उपरोक्त १ नग Foot Operated Sealing Machine विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु. 28,125/- इतक्या खर्चास मान्यता मिळालेली होती.

त्यानुसार इकडील पत्र क्र. 3942, दि. 18/02/2015 अन्वये एकूण 14 अधिकृत विक्रेते / पुरवठा धारक यांचेकडून दि. 03/03/2015 अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यानुसार सिलबंद कोटेशन प्राप्त न झाल्यामुळे सर्व अधिकृत विक्रेते / कोटशन धारक दूरध्वनीव्दारे तगादा करण्यात आला होता. त्यास अनूसरुन ३ सिलबंद कोटेशन प्राप्त झालेले आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

1. M/s. Creative Engineering Company, Mumbai- (प्रशासन शाखेकडून टपालातुन उघडून कोटेशन प्राप्त दि. १४/०३/२०१५).
2. M/s. Pacific Plastics Industries Pvt. Ltd., Mumbai– (सिलबंद कोटेशन प्राप्त दि.१२/०३/२०१५)
3. M/s. Kaustubh Enterprises, Mumbai –ई- मेल कोटेशन प्राप्त दि.०४/०५/२०१५

उपरोक्त तीनही कोटेशन धारकाचे कोटेशन मुदतीनंतर प्राप्त झालेले असून, तुलनात्मक तक्ता तयार करण्याच्या दृष्टीने फायदा होऊ शकेल असे नम्र मत आहे.

तरी वरीलप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे उपसमिती सभेत उपस्थित कोटेशनधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| Sr. No. | Description | Qty. | M/s. Pacific Plastics Industries Pvt. Ltd., Mumbai | | M/s. Kaustubh Enterprises, Mumbai | | M/s. Creative Engineering Co., Mumbai | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Make / Model | Rate Per in Rs. | Make / Model | Rate Per in Rs. | Make / Model | Make / Model |
| 1 | Foot Operated Sealing Machine Size - 16" Sealing Width 10-15mm, Max. Sealing Length 410 mm | 1 | Sealing Length - 16" (400mm) | 21000 | Machine Dimension 16" L X 20" W X 30" H | 28500.00 | Machine Dimension 16" L X 20" W X 30" H | 28500.00 |
| | | | Sealing Width - 15 mm Standard | | Fabrication MSCRC Sheet 14 Gauge squire pipe and suitable angle with powder coated | | Fabrication MSCRC Sheet 14 Gauge squire pipe and suitable angle with powder coated | |
| | | | Power - 230 V A/C (15 Amp) | | Transformer 220 volt A C input out put 40 volt to 48 volt | | Transformer 220 volt A C input out put 40 volt to 48 volt | |
| | | | Body Construction - Aluminum Casting, | | Micro second setting timer circuit | | Micro second setting timer circuit | |
| | | | Colour - Epoxy powdr coated | | 6 Amp. Rocker switch on/ off | | 6 Amp. Rocker switch on/ off | |
| | | | Electronics - Timer (Made In House) | | 10 Amp. MCB for the safety | | 10 Amp. MCB for the safety | |
| | | | Mode of Operation - Foot Pedal | | Terminal= 2 Nos | | Terminal= 2 Nos | |
| | | | Sealing Type - Direct Heat Sealing | | Filament 16" L | | Filament 10 mm X 16" L | |
| | | | Sealable Material - Laminates, Paper poly & Aluminium foil only. | | Sealing width - 10 to 15mm | | Emergency switch suddenly stop | |
| | | | Sealing speed - 5000 Pouches per day. | | | | Best price of machine as per your requirement will be | |
| | Guarantee | | Machine carry's 6 month Guarantee against any manufacturing defect. | | | | SPARE 1) Filament wire - 2 Nos. 2) Teflon Sticker rool - 1 Nos. | |
| | Excise Duty | | 12.50% | 2625.00 | | | | |
| | Vat | | 12.50% | 2625.00 | | | | |
| | Total Amt. In Rs. | | | 26250.00 | | 31500.00 | | 28500.00 |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील Cath Lab विभागाकरिता ०१ नग Foot Operated Sealing Machine खरेदीकामी M/s. Pacific Plastics Industries Pvt. Ltd., Mumbai यांचे सर्व करांसहीत रु.२६,२५०/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस आहे.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

०७ **श्री साईबाबा रुग्णालयातील न्युरो ओ.टी. विभागाकरिता Fibre Optic Bronchoscope खरेदीकामी प्राप्त तांत्रिक निविदा उघडून मिळणेबाबत.**

श्री साईबाबा रुग्णालयातील न्युरो ओ.टी. विभागात अत्यवस्थ रुग्णांची शस्त्रक्रिया करताना सदर Fibre Optic Bronchoscope ची आवश्यकता असते. कारण सदरचा Bronchoscope हा श्री साईबाबा रुग्णालयाच्या

कुठल्याही ओ.टी. मध्ये उपलब्ध नाही. सदर Bronchosocpe ची आवश्यकता भासल्यास श्री साईनाथ रुग्णालयातून मागणी करुन वापर करावा लागतो. तेव्हा श्री साईबाबा रुग्णालयात सर्व ओ.टी. मिळून ०१ नग Fibre Optice Bronchoscope उपलब्ध झाल्यास येथील कामाची व तातडीचे वेळेस रुग्णांची मोठी गैरसोय दुर होईल. सध्या श्री साईबाबा रुग्णालयातील सर्व ओ.टी. मिळून २०० ते ३०० रुग्ण शस्त्रक्रियेसाठी येतात. शस्त्रक्रियेच्या वेळेस सदर Bronchoscope ची आवश्यकता भासते. त्यामुळे त्यांनी दि. ३१/०५/२०१२ चे मागणीपत्रान्वये ०१ नग Fibre Optic Bronchoscope ची मागणी केलेली आहे.

सदरचे Fibre Optice Bronchoscope खरेदीकामी M/s. Karl Stroz Endoscopy India Pvt. Ltd., New Delhi यांचेकडून अंदाजे खर्चासाठी दुरध्वनीवरुन दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यानुसार M/s. Karl Storz Endoscopy India Pvt. Ltd., New Delhi यांनी दि.०६/११/२०१२ चे ई-मेल पत्रान्वये सदर Fibre Optic Bronchoscope चे दर कळविलेले आहे.

| Sr. No. | Catalogue No. | Product Description | Qty. | Total Price (INR) |
|---|---|---|---|---|
| 01. | 11282BN1 | Neuro-Fiberscope Steerable instrument Channel 1.5mm Direction of view. 0" angle of view 110" working length: 34 cm outer Diameter 3.7mm Following accessories are included: 27677 BB case 1025 E pressure compensation cap 13242 XL Leakage tester 27651 AK Cleaning Brush | 01 | 8,37,600.00 |
| 02. | 11161KA | Biopsy Forceps, Double action jaws, flexible 1 mm length 60 cm | 01 | 25,560.00 |
| 03. | 11161KB | Grasping Forceps, Double action jaws, flexible 1 cm length 60 cm | 01 | 29,040.00 |
| 04. | 26002m | Unipolar High Frequency cord with 4mm plug, length 300 cm for models KARL STORZ, Erbe type T, older models and Ellman | 01 | 4,200.00 |
| 05. | 11161A | Coagulating Electrode unipolar flexible 1 mm, length 73 cm | 01 | 5,760.00 |
| | | **Total Amt. in Rs.** | | **9,02,160.00** |

उपरोक्त ०१ नग Fibre Optic Bronchscope खरेदीकामी अंदाजे रु. ९,०२,१६०/- इतका खर्च अपेक्षित आहे.

दि. २६/०२/२०१३ रोजीचे मा. त्रिसदस्य समिती सभेतील विषय नं. ११८ निर्णय क्र. २३८ अन्वये ०१ नग विहीत पद्धतीने Fibre Optice Bronchoscope विहीत पद्धतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या रक्कम रु. ९,०२,१६०/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार सदरचे खरेदीकामी दैनिक सामना - औरंगाबाद, पुढारी – पुणे, लोकशाही वार्ता – नागपूर, Free Press या वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे संकेत स्थळांवर दि. ०५/०८/२०१३ ते दि. १५/०८/२०१३ या कालावधीत देण्यात येऊन दि. २२/०८/२०१३ अखेर ई-निविदा मागवण्यित आलेल्या होत्या त्यास अनुसरुन एकूण १७ निविदा प्राप्त झालेल्या होत्या.

परंतु माहिती तंत्रज्ञान विभागाचे दि. २९/०४/२०१३ रोजीचे मंजूर टिपणी अन्वये घेण्यात आलेल्या Digital Signature Certificate पैकी मा. कार्यकारी अधिकारी साहेब यांचे Certificate ची मुदत संपुष्टात आलेली होती. तसेच श्री.दिनेश दिलीप कानडे– लिपीक यांची Digital Signature Certificate खराब झालेली होती, त्यामुळे वरील तारखेच्या सदर निविदा Open झाल्या नाहीत.

त्यानंतर सदरचे खरेदीकामी पुन्हा Re-Schedule करण्यात यावे असे माहिती तंत्रज्ञान विभाग यांनी दि. २३/०८/२०१३ रोजीची मंजूर टिपणीअन्वये औषध भांडार विभागास कळविण्यात आलेले होते त्यानुसार पुन्हा तारखा निश्चित करण्यात आल्या होत्या व त्यानुसार संस्थानच्या जनसंपर्क कार्यालयामार्फत Free Press – Mumbai, प्रहार – मुंबई या वर्तमानत्रात जाहिरात प्रसिद्ध करण्यात येऊन दि. २३/०९/२०१३ अखेर निविदा मागविण्यात आल्या होत्या.

परंतू IT विभागाकडून Digital Signature Certificate वेळेत तयार न झाल्यामुळे वरील "अ" तक्त्यातील तारखेप्रमाणे सदर ई - निविदा संकेत स्थळावर प्रसिद्ध होऊ शकल्या नव्हत्या.

त्यामुळे पुन्हा सुधारीत तारखा देऊन त्याप्रमाणे IT विभागाकडून www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर निविदा देण्यात येऊन दि. ०९/१०/२०१३ अखेर बंद होणार होत्या परंतू IT विभागाकडून दि. ०२/१०/२०१३ अखेर अशी तारीख झाल्यामुळे दि. ०२/१०/२०१३ रोजीच संकेत स्थळावरुन निविदा बंद झाल्या होत्या. त्यामुळे ब-याच निविदाधरकांना निविदा पाहून देखील निविदा सादर करता आल्या नाहीत. सदरचे खरेदीकामी पुन्हा फेर ई–

निविदा मागविणेकामी संस्थानच्या जनसंपर्क कार्यालयामार्फत वर्तमानपत्रात तसेच www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर फेर जाहिरात देण्यात येऊन दि. ३०/११/२०१३ अखेर निविदा मागविण्यात आल्या होत्या.

ज्या निविदाधारकांनी पहिल्या जाहिरातीस अनुसरुन निविदा सादर केल्या होत्या त्यांना पुन्हा फक्त कमर्शियल निविदा Online सादर करणेबाबत दि. १३/११/२०१३ रोजीचे ई-मेल पत्रान्वये कळविण्यात आले होते. कारण त्यांनी तांत्रिक निविदेचे बंद पाकिट सादर केलेले होते. परंतू काही निविदा धारकांनी नंतरच्या जाहिरातीस अनुसरुन Online निविदा सादर केलेली नव्हती.

सुरुवातीच्या जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या १७ तांत्रिक निविदा व नंतरच्या जाहिरातीस अनुसरुन ६ तांत्रिक निविदा अशा एकूण २३ तांत्रिक निविदांचे बंद पाकीट सादर झाले होते.

सदरच्या प्राप्त बंद तांत्रिक निविदा दि. ०५/१२/२०१३ रोजी वैद्यकीय संचालक यांचे समोर उघडण्यात आल्या होत्या. तसेच ज्या निविदाधारकांनी नंतरच्या जाहिरातीस अनुसरुन कमर्शियल निविदा सादर केल्या आहे किंवा कसे याबाबत दुरध्वनीवरुन विचारणा करण्यात आली होती, परंतु काही निविदाधारकांनी त्या Online सादर केल्या नाहीत.

सदरचे खरेदीकामी तीन वेळेस जाहिरात देण्यात आली होती. त्यामुळे सद्यपरिस्थितीत प्रत्येक मशिनरी उपकरणांची काही ठिकाणी दोन तर काही ठिकाणी तीन पेक्षा जास्त निविदा प्राप्त झाल्या आहे, त्यामुळे आहे त्या प्राप्त कमर्शियल निविदा मा. त्रिसदस्य समिती सभेपुढे समक्ष उघडून त्यावर निर्णय व्हावा असा प्रस्ताव दि. १२/०६/२०१४ रोजीचे मा. त्रिसदस्य समिती सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. त्यावर दि. १२/०६/२०१४ रोजीचे मा. त्रिसदस्य समितीचे सभेतील निर्णय क्र. ४६९ अन्वये श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील मशिनरी / उपकरणे / इन्स्ट्रुमेंट / कन्झुमेबल स्पेअर पार्ट खरेदीकामी मागविणेत आलेल्या ई – निविदा मागील आर्थिक वर्षातील असल्यामुळे व त्या प्राप्त होऊन सहा महिन्यांपेक्षा जास्त कालावधी झालेला असल्यामुळे सदर निविदा ऑनलाईन बंद झालेल्या आहेत. त्यामुळे आजचे सभेमध्ये या निविदा उघडू शकल्या नाही व चर्चेसाठी बोलविणेत आलेल्या निविदाधारकांशी चर्चा/ वाटाघाटी होऊ शकल्या नाहीत.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावामध्ये वेगवेगळ्या सात प्रकारच्या साहित्यांची खरेदीबाबत उल्लेख आहे. त्यापैकी रु. १० लाख मात्रपेक्षा कमी खर्च येणारे व त्यापेक्षा जास्त खर्च येणा-या साहित्यांची विभागणी करणेत येऊन, नवीन प्रस्ताव तयार करणेत यावा आणि वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिद्ध करणेत येऊन, नवीन प्रस्ताव तयार करणेत यावा आणि वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिद्ध करणेत येऊन निविदा / ई – निविदांची मागणी करणेत यावी. तसचे यापुढे हॉस्पिटल साहित्य खरेदीकामी चर्चा / वाटाघाटी होणार नाहीत, निम्नतम दरधारकांस पुरवठा आदेश देण्यात येईल, याकरिता अंदाजे दर देण्यात यावे, याबाबतचा निविदेमध्ये स्पष्ट उल्लेख करावा, असे ठरले होते.

त्यानुसार Fibre Optice Bronchoscope खरेदीस जास्तीत जास्त प्रतिसाद मिळणेकामी सदरची जाहिरात चौफेर– मुंबई, सार्वमत– श्रीरामपुर, पुण्यनगरी– नाशिक, पुढारी– पुणे या वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात व निविदा देण्यात आली होती. निविदा विक्रीची मुदत दि.०९/०९/२०१४ ते दि.२०/०९/२०१४ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.२३/०९/२०१४ अखेर ठेवण्यात आली होती. तसेच एकूण ३१ उत्पादक कंपन्या / अधिकृत विक्रेते यांना दि.१०/०९/२०१४ अन्वये जाहिरातीबाबत अवगत करणेकामी ई-मेल व्दारे कळविण्यात आले होते.

त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे ०१ निविदा प्राप्त झालेली आहे.

| Sr. No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 01. | M/s. Cher Medical Technologies, Mumbai | 23/09/2014 |

उपरोक्त प्रमाणे सदरचे खरेदीकामी एकच निविदा प्राप्त झालेल्या असुन खरेदीकामी कमीत-कमी तीन निविदा आवश्यक असल्यामुळे पुन्हा सदरचे खरेदीकामी फेरनिविदा मागवाव्या लागणार आहेत, त्यामुळे वरीलप्रमाणे खरेदीकामी पुन्हा फेरनिविदा मागविण्याच्या प्रस्तावास मान्यता असावी.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील न्युरो ओ.टी. विभागाकरिता Fibre Optic Bronchoscope खरेदीकामी चौथ्यांदा निविदांची मागणी करुनही एकच निविदा प्राप्त झालेली असल्यामुळे त्या एकमेव निविदेचा तांत्रिक लिफाफा आजचे उपसमिती सभेत उघडणेत आला. या तांत्रिक लिफाफ्याचा सविस्तर अभ्यास करुन त्याच्या अहवालाबरोबरच कमर्शिअल निविदा उघडणेसाठी पुढील सभेसमोर प्रस्ताव सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस आहे.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

०८ **श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाकरिता Semi Automatic Rotary Microtome खरेदी करणेकामी प्राप्त निविदा उघडून मिळणेबाबत.**

श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाने दि.12/06/2013 रोजीचे मागणीपत्रान्वये 01 नग Semi Automatic Rotary Microtome ची मागणी केलेली आहे. सध्या त्यांचेकडे असलेले Microtome हे सन 2006 साली M/s. Sanjay Scientific Co., Mumbai यांचेकडुन रक्कम रु. 19642/- इतक्या रक्कमेत खरेदी केलेले असून ते व्यवस्थित काम देत नाही, तसेच कंपनीने त्यांचे Production बंद केलेले असून दुरुस्तीसाठी त्यांचे स्पेअर्स पार्टस् देखील उपलब्ध होत नाही. सध्या त्यांचेकडे असलेले मशिन हे Mannual असल्यामुळे Testing साठी वेळ लागतो व Proper Output मिळत नाही. तसेच सध्या रुग्णालयात पेशंटची संख्या वाढत आहे, त्यामुळे त्यांनी नवीन Semi Automatic Rotary Microtome ची मागणी केलेली आहे.

उपरोक्त Semi Automatic Rotary Microtome खरेदीकामी अंदाजे खर्चासाठी M/s. Labcon Scientific Instruments Pvt. Ltd., Mumbai यांचेकडुन दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यांनी दि.27/06/2013 रोजीचे दरपत्रकानुसार खालीलप्रमाणे दर कळविलेले आहे.

| Sr. No. | Description | Qty. | App. Rate Per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1. | Semi Automatic Rotary Microtome | 01. | 825525.00 | 825525.00 |
| | | | Total Amt. in Rs. | 825525.00 |

दि.14/11/2013 रोजीचे मा. त्रिसदस्य समिती सभेत निर्णय क्र. 900 अन्वये वरील मागणीप्रमाणे Semi Automatic Rotary Microtome 01 नग विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन सिलबंद निविदा मागवुन खरेदीस व याकामी येणाऱ्या रक्कम रु. 825525/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार सदरच्या खरेदीची रक्कम जास्त असल्याने जास्तीत जास्त प्रतिसाद मिळणेकामी सदरची जाहिरात देशदुत-अहमदनगर, युवा वार्ता - संगमनेर, लोकमंथन - नाशिक या वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्यात आली होती, तसेच संस्थानचे संकेत स्थळावर देखील निविदा देण्यात आली होती.

निविदा विक्रीची मुदत दि.01/02/2014 ते 15/02/2014 पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.18/02/2014 अखेर ठेवण्यात आली होती. तसेच एकूण 12 उत्पादक कंपन्या / पुरवठा धारक यांना इकडील पत्र क्र.7005 दि. 29/01/2014 अन्वये जाहिराती बाबत अवगत करणेकामी पत्र पाठविण्यात आले होते.

त्यास अनुसरुन मुंबई कार्यालयात 02 निविदा प्राप्त झालेल्या आहे, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1 | Labcon Scientific Instrument Pvt. Ltd., Mumbai | 17/02/2014 |
| 2 | Leica / Micro Systems, Mumbai | 18/02/2014 |

अ) तेव्हा उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या 02 सिलबंद निविदा मा. त्रिसदस्य समिती सभेपुढे समक्ष उघडून त्याच दिवशी निविदाधारकांना चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविण्याचा प्रस्ताव मा.त्रिसदस्य समिती सभेपुढे ठेवण्यास मान्यतेसाठी ठेवण्यात यावा.

**किंवा**

ब) या कामी फेर निविदा मागवणेचा प्रस्ताव मा. त्रिसदस्यीय समितीपुढे ठेवावा.

वरीलप्रमाणे अ किंवा ब या प्रस्तावावर निर्णय होणेसाठी सदर प्रस्ताव दि. 12/04/2014 रोजीचे मा. त्रिसदस्य समितीपुढे सादर करण्यात आला होता. यावर निर्णय होऊन सदरचे खरेदीकामी वर्तमानपत्रात फेर जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात असे निर्णय क्रमांक 278 अन्वये ठरले होते. त्यानुसार सदरचे खरेदीकामी सार्वमत - अहमदनगर, देशदूत- नाशिक या वर्तमानपत्रात फेर जाहिरात देऊन दि. 12/05/2014 ते दि. 24/05/2014 पर्यंत निविदा विक्रीसाठी ठेवण्यात आल्या होत्या.

तर निविदा स्वीकारण्याची अंतिम मुदत दि. 27/05/2014 अखेर ठेवण्यात आली होती. तसेच एकूण 12 अधिकृत विक्रेते/ पुरवठाधारक यांना इकडील पत्र क्र. 764 दि. 06/05/2014 अन्वये जाहिरातीबाबत अवगत करणेकामी पत्र पाठविण्यात आले होते परंतु फेर जाहिरातीस अनुसरुन देखील एकही निविदा प्राप्त झालेली नाही त्यामुळे सदरचे खरेदीकामी प्रथम जाहिरातीस अनुसरुन दोनच निविदा प्राप्त झालेल्या आहे.

तेव्हा

अ) उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या 02 सिलबंद निविदा मा. त्रिसदस्य समिती सभेपुढे समक्ष उघडून त्याच दिवशी निविदाधारकांना चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविण्याचा प्रस्ताव मा. त्रिसदस्य समिती सभेपुढे ठेवण्यास मान्यतेसाठी ठेवण्यात यावा.

किंवा

ब) या कामी पुन्हा तिसऱ्यांदा निविदा मागवणेचा प्रस्ताव मा. त्रिसदस्यीय समितीपुढे ठेवावा.

वरीलप्रमाणे अ किंवा ब या प्रस्तावावर निर्णय होणेसाठी सदर प्रस्ताव दि. 07/08/2014 रोजीचे मा. त्रिसदस्य समितीपुढे सादर करण्यात आला होता. यावर निर्णय होऊन सदरचे खरेदीकामी वर्तमानपत्रात फेर जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात असे निर्णय क्रमांक 675 अन्वये ठरले होते. त्यानुसार सदरचे खरेदीस जास्तीत जास्त प्रतीसाद मिळणेकामी सदरची जाहिरात फ्री - प्रेस जरनल - मुंबई, लाईफ 365 इंग्लिश - पुणे, दिव्य मराठी - नाशिक, पुण्यनगरी - औरंगाबाद या वर्तमान पत्रात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर वरीलप्रमाणे जाहिरात व निविदा देण्यात आली होती. निविदा विक्रीची मुदत दि.10/11/2014 ते 22/11/2014 पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि. 25/11/2014 अखेर ठेवण्यात आली होती. तसेच एकूण 72 पुरवठाधारक यांना ईमेलद्वारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते.

परंतु तिस-यादा दिलेल्या फेर जाहिरातीस अनुसरुन देखील एकही निविदा प्राप्त झालेली नाही त्यामुळे सदरचे खरेदीकामी प्रथम जाहिरातीस अनुसरुन दोनच निविदा प्राप्त झालेल्या आहे. त्यामुळे सदर 02 सिलबंद तांत्रिक निविदा मा.उप समिती सभा दि.०९/०२/२०१५ रोजी समक्ष उघडण्यात आलेल्या आहे. सदर तांत्रिक बाबींच्या निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला आलेला असून सदर तांत्रिक तुलनात्मक तक्त्यावर वापर करणा-या डॉक्टरांची Priority प्रमाणे त्याची शिफारस घेण्यात आलेली आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे –

| Sr. No. | Name of Supplier | Make | Model | User Recommendation |
|---|---|---|---|---|
| 1 | Labcon Scientific Instrument Pvt. Ltd., Mumbai | Thermo | HM 340E | |
| 2 | Leica / Micro Systems, Mumbai | Leica | RM 2245 Configration 2 | |

उपरोक्त निविदाधारांनी आपण Specification मध्ये मागणी केल्याप्रमाणे Specification दिलेले आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे तीन वेळा निविदांची मागणी करुनही दोनच निविदा प्राप्त झालेल्या असून त्या ०२ कमर्शियल सिलबंद निविदा आजचे उपसमिती सभेसमोर उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| S. N. | Description | M/s. Labcon Scientific Instrument Pvt. Ltd Mumbai | | M/s. DHR Holding India Pvt. Ltd., Mumbai | |
|---|---|---|---|---|---|
| | | Make / Model | Rate per in Rs. | Make / Model | Rate per in Rs. |
| | Semi Automatic Rotary Microtome for Histopath | Thermo | | Leica | |
| | Semi Automatic Rotary Microtome are advanced rotary microtome used to produce thin sections of specimens of different hardness in both routine and research applications | HM 340E | 800000 (incl. of all tax & duties FOR SHIRDI | RM 2245 Configuratio n 2 | **7900 Euro** (CIF MUMBAI) |
| | It should have following: | | | | |
| 1 | Micrometer mechanism and coarse feed system in an enclosed, ergonomically designed housing | | | | |
| 2 | Vertical specimen movement on backlash and maintenance- free cross roller bearings | | | | |
| 3 | · Removable, integrated operating panel with backlit graphic LCD display for the indication of section thickness, section cutting, trimming thickness, section counter, sum of section thicknesses and remaining travel to the front end position, actual time and date | | | | |
| | 1. Touch key operated micron settings with LCD display | | | | |
| | 2. LED visual limit indicators | | | | |
| | 3. Touch key operated trimming, forward & rewind | | | | |
| | 4. Convenient specimen holder | | | | |
| | 5. Precise guide way and clamping device for knife holder with optimum sliding capability | | | | |
| | · It can be used with universal Microtome Knife & Disposable Blade | | | | |
| | · Specimen retraction in return stroke can be turned off | | | | |
| | ·Electro- mechanical feed system for fine and trimming section thickness and forward and backward specimen movements via stepping motor | | | | |
| | · Intuitive operable coarse feed system with one knob | | | | |
| | · Variable advance speed control system | | | | |
| | · Memory function to quickly return to find again the previous same position for quick for routine work the first cuts | | | | |
| | · Integrated hand wheel that lock in any position | | | | |
| | · Fine orientation of specimen on 2 axes | | | | |
| | · Adaptation for each specimen clamp – rotatable | | | | |
| | ·Quick change for all specimen clamps | | | | |
| | · Direct fitting of knife carries with precision guide way | | | | |
| | · Extra- large removable section waste tray with integrated arm rest, covering the whole working area, even below the knife/ blade carrier : capacity 2.400ml<br>Fine section thickness feed via precision stepping motor 0.5 to 100 µm | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | up to 2 µm in 0. 5 µm increments<br>up to 10 µm in 1 µm increments<br>up to 20 µm in 2 µm increments<br>up to 30 µm in 5 µm increments<br>up to 40 µm in 10 µm increments<br>up to 100 µm in 10 µm increments | | | | |
| | Trimming thickness feed via precision stepping motor up to 500 µm<br>up to 10 µm in 5 µm increments<br>up to 100 µm in 10 µm increments<br>up to 200 µm in 20 µm increments<br>up to 500 µm in 50 µm increments | | | | |
| | · Horizontal Feed Range 30 mm | | | | |
| | · Vertical Specimen stroke 75 mm (Long Stroke) | | | | |
| | · Machine should be supplied with all standard accessories. | | | | |
| | Operators should be given training for its regular use and maintainance training should be given to Biomedical Engineer free of cost. | | | | |
| | All technology should be mandatorily with safty approval USFDA/ UL&CE approval certificate must be submitted for the total unit. | | | | |
| | The product should be time tested, branded & should be OEM | | | | |
| | · Warranty: 3 Years | | 3Years | 3Years | |
| | · AMC: 2 % of Basic cost plus Tax with escalation of 5% every year | 2% + service tax fix for next 5 years | | 14625+ service tax+ 5% Escalation every year | |
| | · CMC: 5% of Basic cost plus Tax with escalation of 5% every year | 5% service tax for for next 5 years | | 36550+ service tax + 5% escalation every year | |
| | It should be fixed for next 5 years. | | | | |
| | Cost of consumables to be fixed for next 5 years | | | Blade- Rs 8700+tax for next 3 years | |

यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाकरिता ०१ नग **Semi Automatic Rotary Microtome** खरेदी करणेकामी **M/s. DHR Holding India Pvt. Ltd., Mumbai** यांचे उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील **7900 Euro** मात्र (मुंबई पोहोच) हे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा.

तसेच **M/s. DHR Holding India Pvt. Ltd., Mumbai** हे सदरहू साहित्य मुंबईपर्यंतच पोहोच करणार असून मुंबईपासून शिर्डीपर्यंत संस्थान वाहनाने आणनेत यावे व त्यांना उपरोक्त रक्कम ही **L/C** द्वारे आदा करावयाची असल्याने सदर **L/C** ही वित्त विभागामार्फत उघडणेत येऊन, त्यावेळेसच्या **Euro** च्या दराप्रमाणे सदरहू रक्कम **M/s. DHR Holding India Pvt. Ltd., Mumbai** यांना आदा करणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस आहे. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

०९ **श्री साईबाबा रुग्णालयातील C.V.T.S. OT-01 करिता Surgical Instrument खरेदी करणेकामी प्राप्त कमर्शियल निविदा उघडून निर्णय होणेबाबत.**

श्री साईबाबा रुग्णालयातील CVTS OT I या विभागाने दि. १३/०६२०१४ रोजीचे मागणीपत्रान्वये खालीलप्रमाणे Surgical Instrument ची मागणी केलेली आहे. सध्या त्यांचेकडे असलेले Instrument हे वापरुन खराब झालेले असुन कार्डियाक शत्रक्रियेकरिता सदरहू Instrument आवश्यक असतात त्यामुळे सदरचे Instrument खरेदीकामी अंदाजे खर्चासाठी M/s. Kalelker Surgical Industries, Mumbai यांचेकडून दरपत्रक मागविण्यात आले होते. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Name of Instrument | Qty. | App. Rate in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 01. | Wire Holder 7" | 15 Pc | 1330.00 | 19950.00 |
| 02. | Wire Twister with T/C Jaws, 18 cm/7" | 4 Pc | 6730.00 | 26920.00 |
| 03. | Wire Twister with T/C Jaws, 20 cm/8" | 2 Pc | 8020.00 | 16040.00 |
| 04. | Needle Holder Mayo-Heger 20 cm/8" | 6 Pc | 630.00 | 3780.00 |
| 05. | Needle Holder Mayo-Heger 15 cm/6" | 6 Pc | 530.00 | 3180.00 |
| 06. | Scalpel / B.P. Handle No. 7 18 cm | 4 Pc | 155.00 | 620.00 |
| 07. | Scalpel / B.P. Handle 14 cm No. 4 | 4 Pc | 140.00 | 560.00 |
| | | | Total Rs. | 71050.00 |

त्यांचे दरानुसार सदरचे Surgical Instrument खरेदीकामी रक्कम रु. ७१,०५०/- इतका खर्च अपेक्षित आहे

दि.२८/०८/२०१४ निर्णय क्र. ७२३ अन्वये मा.त्रिसदस्य समिती सभेत श्री साईबाबा रुग्णालयातील CVTS OT- I करिता Surgical Instrument खरेदी विहित पद्धतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे खर्च रु. ७१,०५०/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार सदरचे खरेदीस जास्तीत जास्त प्रतीसाद मिळणेकामी सदरची जाहिरात फ्री - प्रेस जरनल - मुंबई, लाईफ ३६५ इंग्लिश - पुणे, दिव्य मराठी - नाशिक, पुण्यनगरी - औरंगाबाद या वर्तमान पत्रात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर वरीलप्रमाणे जाहिरात व निविदा देण्यात आली होती. तसेच एकूण ७२ पुरवठाधारक यांना ईमेलद्वारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते.

निविदा विक्रीची मुदत दि.१०/११/२०१४ ते २२/११/२०१४ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.२५/११/२०१४ अखेर ठेवण्यात आली होती.

त्यास अनुसरुन शिर्डी येथील कार्यालयात ०१ निविदा प्राप्त झालेली आहे, तर मुंबई कार्यालयात ०३ निविदा प्राप्त झालेल्या आहेत, अशा एकूण ०४ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1 | M/s.Axenic Labs Pvt. Ltd., Nashik | 22/11/2014 |
| 2 | M/s.Kalelker Surgicals Pvt. Ltd., Mumbai | 25/11/2014 |
| 3 | M/s. Keps Pharma, Mumbai | 25/11/2014 |
| 4 | M/s.South India Surgical Co. Ltd., Mumbai | 25/11/2014 |

तरी उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या ०४ तांत्रिक सिलबंद निविदा मा. उप समिती सभा दि.06/01/2015 रोजी समक्ष उघडण्यात आलेल्या आहे. सदर तांत्रिक बाबींच्या निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला आलेला असून सदर तांत्रिक तुलनात्मक तक्त्यावर वापर करणा-या डॉक्टरांची शिफारस घेण्यात आलेली आहे. त्यांच्या शिफारशीनूसार M/s.Kalelker Surgicals Pvt. Ltd., Mumbai यांची इन्स्ट्रुमेंट ही रुग्णालयात वापरासाठी असून ती चांगल्या दर्जाची असलेबाबत शिफारस केलेली आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या ०४ कमर्शियल सिलबंद निविदा आजचे उपसमिती सभेपुढे संबंधीत निविदा धारकांचे समक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| Sr. No. | Description | Qty | | M/s.Axenic Labs Pvt. Ltd., Nashik | | M/s.Kalelker Surgicals Pvt. Ltd., Mumbai | | M/s. Keps Pharma, Mumbai | | M/s.South India Surgical Co. Ltd., Mumbai | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | SURGICAL INSTRUMENT (Only Indian Make) | | | Make | Rate per in Rs. | Make | Rate per in Rs. | Make | Rate per in Rs. | Make | Rate per in Rs. |
| | **SURGICAL INSTRUMENT (Only Indian Make)** | 15 | Pc. | Chatterjee Surgical | 4253.00 | Own Make | 2430.00 | All India Surgical | 2520.00 | Own Make | **1811.25** |
| 1 | Wire Holder. 7" | 4 | Pc. | Chatterjee Surgical | 3872.00 | Own Make | 7425.00 | All India Surgical | 5460.00 | Own Make | **3465.00** |
| 2 | Wire Twister.with T/C Jaws, 18cm/7". | 2 | Pc. | Chatterjee Surgical | 3872.00 | Own Make | 8775.00 | All India Surgical | 6300.00 | Own Make | **3543.75** |
| 3 | Wire Twister.with T/C Jaws, 20cm/8" | 6 | Pc. | Chatterjee Surgical | 2475.00 | Own Make | **730.00** | All India Surgical | 756.00 | Own Make | 2598.75 |
| 4 | Needle Holder. Mayo-Hegar. 20cm/8" | 6 | Pc. | Chatterjee Surgical | 1927.00 | Own Make | **620.00** | All India Surgical | 588.00 | Own Make | 2205.00 |
| 5 | Needle Holder. Mayo-Heger. 15cm/6" | 4 | Pc. | Chatterjee Surgical | 191.00 | Own Make | **175.00** | All India Surgical | 252.00 | Own Make | 367.50 |
| 6 | Scalpel/B.P. Handle No. 7, 18cm | 4 | Pc. | Chatterjee Surgical | 158.00 | Own Make | **160.00** | All India Surgical | 159.60 | Own Make | 173.25 |
| 7 | Scalpel/B.P. Handle NO.4, 14CM | 15 | Pc. | Chatterjee Surgical | 4253.00 | Own Make | 2430.00 | All India Surgical | 2520.00 | Own Make | **1811.25** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील C.V.T.S. OT-01 करिता प्रस्तावात नमूद केलेली Surgical Instruments खरेदी करणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यातील गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस आहे.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

१० **श्री साईनाथ रक्तपेढी या विभागाकरिता Elisa Plate Reader with UPS with Printer खरेदी करणेकामी प्राप्त कमर्शियल निविदा उघडून निर्णय होणेबाबत.**

श्री साईनाथ रक्तपेढी विभागाने दि. २५/११/२०१३ रोजीचे मागणीपत्रान्वये ०१ नग Elisa Plate Reader with UPS With Printer ची मागणी केलेली आहे. सध्या त्यांचेकडे एक Ranbaxy कंपनीचे Elisa Plate Reader असुन ते सन २००७ या वर्षात खरेदी केलेले असुन त्या मशिनचा Display खराब झालेला आहे व कंपनीकडून

दुरुस्तीकामी Service देखील मिळत नाही. त्यामुळे त्यांनी नवीन Elisa Plate Reader with UPS With Printer ची मागणी केलेली आहे.

सदरहू ०१ नग Elisa Plate Reader with UPS with Printer खरेदीकामी अंदाजे रक्कम रु. २,५०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

दि.२८/०८/२०१४ निर्णय क्र. ७३१ अन्वये मा.त्रिसदस्य समिती सभेत रक्तपेढी विभागाकरिता १ नग Elisa Plate Reader with UPS with Printer विहित पद्धतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे खर्च रु. २,५०,०००/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार सदरचे खरेदीस जास्तीत जास्त प्रतीसाद मिळणेकामी सदरची जाहिरात फ्री - प्रेस जरनल - मुंबई, लाईफ ३६५ इंग्लिश - पुणे, दिव्य मराठी - नाशिक, पुण्यनगरी - औरंगाबाद या वर्तमान पत्रात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर वरीलप्रमाणे जाहिरात व निविदा देण्यात आली होती. तसेच एकूण ७२ पुरवठाधारक यांना ईमेलद्वारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते.

निविदा विक्रीची मुदत दि.१०/११/२०१४ ते २२/११/२०१४ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.२५/११/२०१४ अखेर ठेवण्यात आली होती.

त्यास अनुसरुन शिर्डी येथील कार्यालयात ०५ निविदा प्राप्त झालेल्या आहेत, तर मुंबई कार्यालयात ०१ निविदा प्राप्त झालेल्या आहेत, अशा एकूण ०६ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1 | M/s. Austin Health care, Pune | 25/11/2014 |
| 2 | M/s. J. K. Sales & Services, Aurangabad | 25/11/2014 |
| 3 | M/s. Meril Diagnostics Pvt. Ltd., Mumbai | 25/11/2014 |
| 4 | M/s. Siddhi Medical Distributors, Aurangabad | 25/11/2014 |
| 5 | M/s. Transasia Bio - Medicals Ltd, Mumbai | 25/11/2014 |
| 6 | M/s. Universal Chemicals, Nashik | 25/11/2014 |

उपरोक्त तांत्रीक निविदा मा.उप समिती सभा दि.06/01/2015 रोजी समक्ष उघडण्यात आलेल्या आहे. सदर तांत्रिक बाबींच्या निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला आलेला असून सदर तांत्रिक तुलनात्मक तक्त्यावर वापर करणा-या डॉक्टरांची Priority प्रमाणे त्याची शिफारस घेण्यात आलेली आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे–

| Sr. No. | Name of Supplier | Make | Model | User Recommendation |
|---|---|---|---|---|
| 1 | M/s. J. K. Sales & Services, Aurangabad | Robonik | Readwell Touch | Priority 1st |
| 2 | M/s. Siddhi Medical Distributors, Aurangabad | Robonik | Readwell Touch | Priority 1st |
| 3 | M/s. Transasia Bio - Medicals Ltd, Mumbai | Erba, Germany | LisaScan EM | Priority 2nd |
| 4 | M/s. Universal Chemicals, Nashik | Tulip Diagnostic | Lisaquant TS | Priority 3rd |
| 5 | M/s. Meril Diagnostics Pvt. Ltd., Mumbai | Own | Merilyzer EIAQuant | Not Recommended |
| 6 | M/s. Austin Health care, Pune | Meditech | RT 2100C | Not Recommended |

उपरोक्त अ.नं. १ ते ४ निविदाधारांनी आपण Specification मध्ये मागणी केल्याप्रमाणे Specification दिलेले असून अ.नं. ५ ते ६ यांचे Technical Specification आपण मागणी केल्याप्रमाणे दिलेले नाही.

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या ०६ कमर्शियल सिलबंद निविदांपैकी अ.नं. १ ते ४ या पात्र निविदाधारकांच्या कमर्शियल सिलबंद निविदा आजचे उपसमिती सभेपुढे उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| Description | M/s. J. K. Sales & Services, Aurangabad | | M/s. Siddhi Medical Distributors, Aurangabad | | M/s. Transasia Bio - Medicals Ltd, Mumbai | | M/s. Universal Chemicals, Nashik | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Make / Model | Rate Per in Rs. | Make / Model | Rate Per in Rs. | Make / Model | Rate Per in Rs. | Make / Model | Rate Per in Rs. |
| · User -programmable open system | Robonik | 129375.00 | Robonik | 111375.00 | Erba,Germany | 175100.00 | Tulip Diagnostic | 235620.00 |
| · Fully Automated with capability to read 96 wells | Readwell Touch | | Readwell Touch | | LisaScan EM | | Lisaquant TS | |
| · It should have at least 2 x 24 LCD Display | | | | | | | | |
| · Light Source should be Halogen | | | | | | | | |
| · Built-in thermal printer with graphic capability | | | | | | | | |
| · It should have on-board data Analysis & on-board diagnostic testing | | | | | | | | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| · Provided with USB data transfer facility with required software & USB mouse option | | | | | | | | |
| · Absorbance Measurement Range: 0 to 3.3 OD | | | | | | | | |
| · Filters : 5 position filters with 405,450,490,630 nm wavelength filters and one empty position | | | | | | | | |
| · Accuracy : ± 1 % or ±0.01 Abs from 0 - 2 Abs | | | | | | | | |
| Linearity : ± 1 % for 0 - 2 Abs & ± 3 % for 2 - 3 Abs | | | | | | | | |
| · Repeatability : ± 0.5 % or ±0.005 Abs for 0-2 Abs | | | | | | | | |
| · Reading type: End Point | | | | | | | | |
| · Reading speed: 30 sec. with single wavelength | | | | | | | | |
| · Memory capacity : at least 50 programs & last 200 nos. of readings | | | | | | | | |
| · Appropriate on-line UPS should be provided for 2 Hrs. Back-up | | | | | | | | 84375.00 |
| · **Warranty- 3 Years** | 3 Years | | 3 Years | | 3 Years | | 3 Years | |
| · **AMC/CMC Cost-** AMC should be 3% of basic cost including Taxes. CMC should be between 3 to 5% of basic cost including Taxes. It should be fixed for next 5 years. | AMC fixed for next 5 years | 3% | AMC fixed for next 5 years | 3% | AMC fixed for next 5 years | 5100+Service Tax | AMC fixed for next 5 years | 16685.00 |
| | CMC fixed for next 5 yers | 3 to 5 % | CMC fixed for next 5 yers | 3 to 5 % | CMC fixed for next 5 yers | 8500 + Service Tax | CMC fixed for next 5 yers | 30590.00 |
| Cost of Consumables to be fixed for warranty period. | | | | | | | | |
| **Total Amt in Rs.** | | 129375.00 | | 111375.00 | | 175100.00 | | 319995.00 |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रक्तपेढी या विभागाकरिता ०१ नग Elisa Plate Reader with UPS with Printer खरेदी करणेकामी M/s. Siddhi Medical Distributors, Aurangabad यांचे रु.१,११,३७५/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस आहे.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**११ कॅन्टीन, नाष्टा, लाडू काऊंटर संगणकीकृत करणेसाठी संगणकासाठी इलेक्ट्रीक पॉईटचे वायरींग काम करणेबाबत.**

**प्रस्तावाना:-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एका प्रयोजनासाठी करण्यात येईल :-

(क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

संस्थानचे कॅन्टीन, नाष्टा, लाडू काऊंटर संगणकीकृत करण्यासाठी प्रत्येक काऊंटरवर संगणक बसविण्यासाठी त्यांनी इलेक्ट्रीक पॉईंट बसवून मिळणेकामी माहिती तंत्रज्ञान विभागाने मागणी केलेली आहे. त्यानुसार प्रत्यक्ष पाहणी केली असता सदरचे काम करुन देण्यासाठी खालीलप्रमाणे खर्च येणे अपेक्षित आहे. तपशील खालीलप्रमाणे :-

| Sr. No | C.S.R. | DESCRIPTION | Qty. | Rate.in Rs | Amount. Rs |
|---|---|---|---|---|---|
| 01) | 1-3-5 | Supplying & erecting mains with 2x2.5 sq.mm F.R stranded/solid copper PVC insulated wire laid in provided conduit/trunking/inside pole/Bus bars or any other places. as per specification No: WG-MA/BW | 1000 Mtr. | 54.60 | Rs. 0,54,600.00 |
| 02) | 1-3-7 | Supplying & erecting mains with 2x4 sq.mm F.R stranded/solid copper PVC insulated wire laid in provided conduit/trunking/inside pole/Bus bars or any other places as per specification No: WG-MA/BW | 500 Mtr. | 77.70 | Rs. 0,38,850.00 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 03) | 1-3-9 | Supplying & erecting mains with 2x6 sq.mm F.R stranded/solid copper PVC insulated wire laid in provided conduit/trunking/inside pole/Bus bars or any other places as per specification No: WG-MA/BW | 500 Mtr. | 110.25 | Rs. 0,55,125.00 |
| 04) | 1-3-1 | Supplying & erecting mains with 1x1.5 sq.mm F.R stranded/solid copper PVC insulated wire laid in provided conduit/trunking/ inside pole/Bus bars or any other places. as per specification No: WG-MA/BW | 1000 Mtr. | 14.175 | Rs. 0,14,175.00 |
| 05) | 1-8-7 | Supplying and erecting modular type switch one way 16 / 20 A, ISI mark, approved make duly erected on provided plate and box with wiring connections complete with neon indicator. | 100 Nos. | 181.65 | Rs. 0,18,165.00 |
| 06) | 1-8-11 | Supplying and erecting modular type 3 pin 6 / 16A multi socket with safety shutter ISI mark approved make duly erected on provided plate and box with wiring connections complete. | 200 Nos. | 226.80 | Rs. 0,45,360.00 |
| 07) | 1-8-29 | Supplying and erecting PVC Surface modular switch box with double mounting plate for 3 module duly erected in an approved manner. | 40 Nos. | 153.30 | Rs. 0,06,132.00 |
| 08) | 1-8-31 | Supplying and erecting PVC Surface modular switch box with double mounting plate for 6 module duly erected in an approved manner. | 10 Nos. | 231.00 | Rs.0,02,310.00 |
| 09) | 1-8-32 | Supplying and erecting PVC Surface modular switch box with double mounting plate for 8 module duly erected in an approved manner. | 55 Nos. | 308.70 | Rs.0,16,978.50 |
| 10) | 5-4-18 | Supplying and erecting single pole and neutral distribution board (SPNDB) with door surface/flush mounted with 2 ways for incoming and 8 ways for outgoing SP MCB's on iron frame/wooden board as per specification No. SWSWR/ MCBDB | 04 Nos. | 1351.35 | Rs.0,05,405.40 |
| 11) | 5-6-2 | Providing, erecting & commissioning RCCB only of electro magnetic type with 30/100/300 mA sensitivity and having capacity of 40 A. 2 pole complete as per specification No. SW-RCCB/RCCB | 04 Nos. | 2310.00 | Rs.0,09,240.00 |
| 12) | 5-3-2 | Supplying, erecting & marking SPMCB 6A to 32A, C-series (for motor/power) in provided distribution board as per specification No. SW-SWR/MCB | 32 Nos. | 181.65 | Rs.0,05,812.80 |
| 13) | 1-2-8 | Supplying and erecting rigid PVC conduit 25mm. dia with PVC accessories on wall/ceiling as per specification No: WG-MA/CON, para no.1.1.1 | 100 Mtr. | 79.80 | Rs.0,07,980.00 |
| | | | | **Round up Rs.** | **2,80,134.00** |

उपरोक्तप्रमाणे संस्थानचे कॅन्टीन, नाष्टा, लाडू काऊंटर संगणकीकृत करण्यासाठी प्रत्येक काऊंटरवर संगणकाकरीता इलेक्ट्रीक पॉईटचे वायरींग काम करणेकामी येणा-या अंदाजे रक्कम रुपये २,८०,१३४/- इतक्या खर्चास मान्यता मिळणेस व वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर ही जाहिरात अपलोड करुन टेंडर मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, कॅन्टीन, नाष्टा व लाडू काऊंटर संगणकीकृत करणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे संगणकासाठी इलेक्ट्रीक पॉईटच्या वायरींगचे काम करणेसाठी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.२,८०,१३४/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस आहे.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

१२ **सिंहस्थ कुंभमेळा सन- २०१५ निमित्ताने शिर्डी व परिसरात साईभक्तांसाठी करावयाच्या अतिरिक्त सुविधा पुरविणेकामी इलेक्ट्रीकल मटेरियल आणि केबल खरेदीकामी उघडण्यात आलेल्या ऑनलाईन फेर ई-निविदांमधील निम्नतम दरधारकास कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

सिंहस्थ कुंभमेळा सन-२०१५ निमित्ताने शिर्डी व परिसरात साईभक्तांसाठी करावयाच्या अतिरिक्त सुविधा पुरविणेकामी इलेक्ट्रीकल मटेरीअल आणि केबल खरेदीकामी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिद्ध करुन निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रुपये ९,९६,३५०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार सदर कामाचे ऑनलाईन निविदा मागविणेकामी दि.२५-०५-२०१५ रोजी, दैनिक पुढारी, अहमदनगर या वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आली होती. त्यानुसार महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन निविदा मागविणेकामी टेंडर नोटीस व टेंडर डाक्युमेंट दि.२७-०५-२०१५ रोजी अपलोड करण्यात आले होते. निविदा ऑनलाईन डाऊन लोडींगसाठी दि.२७.०५.२०१५ रोजी सकाळी १०.०० वाजेपासून उपलब्ध करण्यात आली होती. तसेच निविदा ऑनलाईन दाखल करण्याची अंतिम मुदत दि.०३.०६.२०१५ रोजी सायं.०५.०० वाजेपर्यंत ठेवण्यात आली होती. ऑनलाईन निविदेसोबत तांत्रिक लिफाफामध्ये सादर करावयाच्या सर्व कागदपत्रांच्या स्कॅन कॉपी जोडण्यास व दि.०६.०६.२०१५ रोजी सायं.०५.०० या अखेर किंवा त्यापुर्वी (रविवार खेरीज) निविदेसोबत स्कॅन करुन जोडलेले तांत्रिक (Techincal Bid) कागदपत्रांच्या मुळप्रती शिर्डी कार्यालयात सादर करणेकामी ऑनलाईन अपलोड करण्यात आलेल्या जाहिरातीमध्ये कळविण्यात आले होते. त्यानुसार दोनच तांत्रिक निविदेच्या हार्ड कॉपी व दोनच तांत्रिक ई-निविदा प्राप्त झालेल्या असलेमुळे दि.१२.०६.२०१५ रोजी सदर कामाच्या ई-तांत्रिक निविदा उघडण्यात आलेल्या नाही. दि.१६.०६.२०१५ रोजी मा.मुख्यलेखाधिकारी यांचेशी समक्ष झालेल्या चर्चेनुसार लेखापरिक्षणाच्या दृष्टीने कमीत कमी ०३ निविदेची आवश्यकता असते. त्यामुळे सदर मटेरीअल खरेदी करणेकामी पुन्हा वर्तमानपत्रात जाहिरात देऊन पुन्हा फेर ई-निविदा बोलविणेस व प्राप्त दोन तांत्रिक निविदेचे बंद पाकिट निविदाधारकांना परत करणेस दि.१६.०६.२०१५ चे विद्युत विभागाचे टिपणी अन्वये मान्यता मिळालेली होती. तांत्रिक निविदेचे दोन बंद पाकिट निविदाधारकाना परत करणेत आलेले आहे. व सदर कामाचे ऑनलाईन निविदा मागविणेकामी दि.२४.०६.२०१५ रोजी, दै.देशदुत, नाशिक या वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आली होती. महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन निविदा मागविणेकामी टेंडर नोटीस व टेंडर डाक्युमेंट दि.२३-०६-२०१५ रोजी अपलोड करण्यात आले होती. निविदा ऑनलाईन डाऊन लोडींगसाठी दि.२५.०६.२०१५ रोजी सकाळी १०.०० वाजेपासून उपलब्ध करण्यात आली होती. तसेच निविदा ऑनलाईन दाखल करण्याची अंतिम मुदत दि.३०.०६.२०१५ रोजी सायं.०५.०० वाजेपर्यंत ठेवण्यात आली होती. ऑनलाईन निविदेसोबत तांत्रिक लिफाफामध्ये सादर करावयाच्या सर्व कागदपत्रांच्या स्कॅन कॉपी जोडण्यास व दि.०१.०७.२०१५ रोजी सायं.०५.०० या अखेर किंवा त्यापुर्वी (रविवार खेरीज) निविदेसोबत स्कॅन करुन जोडलेले तांत्रिक (Techincal Bid) कागदपत्रांच्या मुळप्रती शिर्डी कार्यालयात सादर करणेकामी ऑनलाईन अपलोड करण्यात आलेल्या जाहिरातीमध्ये कळविण्यात आले होते. त्यानुसार ०४ निविदाधारकांचे तांत्रिक ई-निविदा लिफाफे प्राप्त झालेले होते. तांत्रिक निविदा (Techincal Bid) उघडण्याची तारीख ०४.०७.२०१५ अशी होती. प्राप्त ०४ निविदाधारकांचे तांत्रिक ई-निविदा लिफाफे दि.०४.०७.२०१५ रोजी मा.उपकार्यकारी अधिकारी, मा.मुख्यलेखाधिकारी व मा.सर्व प्रशासकीय अधिकारी यांचे समक्ष उघडून निविदाधाराकांच्या बयाणा रक्कम तसेच कागदपत्रांची तपासणी मा.मुख्यलेखाधिकारी लेखाशाखा यांचेमार्फत करण्यात आलेली आहे. तसेच निविदाधारकांच्या बयाणा रक्कम तसेच कागदपत्रांची तपासणी मा.मुख्यलेखाधिकारी लेखाशाखा यांचेमार्फत केल्यानंतर सर्व निविदाधारक क्वालिफाय झालेमुळे सदरचे काम तातडीचे असल्याने निविदाधारकासमक्ष व मा.उपकार्यकारी अधिकारी, मा.मुख्यलेखाधिकारी व मा.सर्व प्रशासकीय अधिकारी यांचे उपस्थितीत लगेच दि.०४.०७.२०१५ रोजी कमर्शियल ऑनलाईन फेर ई-निविदा उघडणेत आलेल्या आहेत.

सिंहस्थ कुंभमेळा सन-२०१५ निमित्ताने शिर्डी व परिसरात साईभक्तांसाठी करावयाच्या अतिरिक्त सुविधा पुरविणेकामी इलेक्ट्रीकल मटेरीअल आणि केबल खरेदीकामी प्राप्त झालेल्या ०४ ई-निविदा दि.०४.०७.२०१५ रोजी निविदाधारकासमक्ष व मा.उपकार्यकारी अधिकारी, मा.मुख्यलेखाधिकारी व मा.सर्व प्रशासकीय अधिकारी यांचे उपस्थित उघडणेत येऊन, त्यामधील ई-निविदेच्या मुळ तक्त्यानुसार खालीलप्रमाणे दरांचा तुलनात्मक तक्ता तयार केला आहे.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | निविदेमधील दर रु. |
|---|---|---|
| **०१)** | **मे.यशवंत इलेक्ट्रीकल्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर, अहमदनगर** | **रु. ८,४५,९०१/-** |
| ०२) | मे.इंटरनॅशनल इलेक्ट्रीकल्स, अहमदनगर | रु. ९,०४,१८७/- |
| ०३) | मे.आदिती इलेक्ट्रीकल्स, नाशिक | रु. ८,४६,८९७/- |
| ०४) | मे.दिपज्योत ट्रान्सफॉर्मर इंडस्ट्री, जालना | रु. ९,२५,०११/- |

सिंहस्थ कुंभमेळा सन-२०१५ निमित्ताने शिर्डी व परिसरात साईभक्तांसाठी करावयाच्या अतिरिक्त सुविधा पुरविणेकामी इलेक्ट्रीकल मटेरियल आणि केबल खरेदीकामी मे.यशवंत इलेक्ट्रीकल्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर, अहमदनगर यांचे रु. ८,४५,९०१/- मात्र निम्नतम दर स्विकारणेस व त्यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सिंहस्थ कुंभमेळा सन- २०१५ निमित्ताने शिर्डी व परिसरात साईभक्तांसाठी अतिरिक्त सुविधा पुरविणेकामी इलेक्ट्रीकल मटेरियल आणि केबल खरेदीसाठी उघडण्यात आलेल्या फेर ई-निविदांच्या कार्यवाहीचे अवलोकन करणेत येऊन, सदरहूकामी मे.यशवंत इलेक्ट्रीकल्स अॅण्ड कॉन्ट्रॅक्टर, अहमदनगर यांचे रु.८,४५,९०१/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस आहे.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

१३ **सिंहस्थ कुंभमेळा सन- २०१५ निमित्ताने शिर्डी व परिसरात साईभक्तांसाठी करावयाच्या अतिरिक्त सुविधा पुरविणेसाठी लाईट व्यवस्थेकरीता भाडोत्री तत्वावर जनसेट पुरविणेकामी उघडण्यात आलेल्या ऑनलाईन फेर ई-निविदांमधील निम्नतम दरधारकास कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

सिंहस्थ कुंभमेळा सन-२०१५ निमित्ताने शिर्डी व परिसरात साईभक्तांसाठी करावयाच्या अतिरिक्त सुविधा पुरविणेसाठी लाईट व्यवस्थेकरीता भाडोत्री तत्त्वावर जनसेट पुरविणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिद्ध करुन निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रुपये ६,५५,५००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार सदर कामाचे ऑनलाईन निविदा मागविणेकामी दि.२५-०५-२०१५ रोजी, दैनिक पुढारी, अहमदनगर या वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आली होती. त्यानुसार महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन निविदा मागविणेकामी टेंडर नोटीस व टेंडर डाक्युमेंट दि.२७-०५-२०१५ रोजी अपलोड करण्यात आले होते. निविदा ऑनलाईन डाऊन लोडींगसाठी दि.२७.०५.२०१५ रोजी सकाळी १०.०० वाजेपासून उपलब्ध करण्यात आली होती. तसेच निविदा ऑनलाईन दाखल करण्याची अंतिम मुदत दि.०३.०६.२०१५ रोजी सायं.०५.०० वाजेपर्यंत ठेवण्यात आली होती. ऑनलाईन निविदेसोबत तांत्रिक लिफाफामध्ये सादर करावयाच्या सर्व कागदपत्रांच्या स्कॅन कॉपी जोडण्यास व दि.०६.०६.२०१५ रोजी सायं.०५.०० या अखेर किंवा त्यापुर्वी (रविवार खेरीज) निविदेसोबत स्कॅन करुन जोडलेले तांत्रिक (Techincal Bid) कागदपत्रांच्या मुळप्रती शिर्डी कार्यालयात सादर करणेकामी ऑनलाईन अपलोड करण्यात आलेल्या जाहिरातीमध्ये कळविण्यात आले होते. परंतु दि.०६.०६.२०१५ रोजी एकही निविदेची हार्ड कॉपी प्राप्त झालेली नव्हती तसेच दि.१२.०६.२०१५ रोजी ई-टेंडर सिस्टिममध्ये टेंडर भरलेल्या पार्टीजचे तांत्रिक निविदा ई.डी.पी.विभागामार्फत चेक केली असता ई-टेंडर सिस्टिममध्ये एकही ई-निविदा प्राप्त झाल्याचे आढळून आलेले नाही. त्यामुळे लाईट व्यवस्थेकरीता भाडोत्री तत्त्वावर जनसेट पुरविणेकामी पुन्हा वर्तमानपत्रात जाहिरात देऊन पुन्हा फेर ई-निविदा बोलविणेस दि.१३.०६.२०१५ चे विद्युत विभागाचे टिपणी अन्वये मान्यता मिळालेली होती. त्यानुसार ऑनलाईन निविदा मागविणेकामी दि.२४.०६.२०१५ रोजी, दै.देशदुत, नाशिक या वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आली होती. तसेच महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन निविदा मागविणेकामी टेंडर नोटीस व टेंडर डाक्युमेंट दि.२३-०६-२०१५ रोजी अपलोड करण्यात आले होती. निविदा ऑनलाईन डाऊन लोडींगसाठी दि.२५.०६.२०१५ रोजी सकाळी १०.०० वाजेपासून उपलब्ध करण्यात आली होती. तसेच निविदा ऑनलाईन दाखल करण्याची अंतिम मुदत दि.३०.०६.२०१५ रोजी सायं.०५.०० वाजेपर्यंत ठेवण्यात आली होती. ऑनलाईन निविदेसोबत तांत्रिक लिफाफामध्ये सादर करावयाच्या सर्व कागदपत्रांच्या स्कॅन कॉपी जोडण्यास व दि.०१.०७.२०१५ रोजी सायं.०५.०० या अखेर किंवा त्यापुर्वी (रविवार खेरीज) निविदेसोबत स्कॅन करुन जोडलेले तांत्रिक (Techincal Bid) कागदपत्रांच्या मुळप्रती शिर्डी कार्यालयात सादर करणेकामी ऑनलाईन अपलोड करण्यात आलेल्या जाहिरातीमध्ये कळविण्यात आले होते. त्यानुसार ०३ निविदाधारकांचे तांत्रिक ई-निविदा लिफाफे प्राप्त झालेले होते. तांत्रिक निविदा लिफाफे (Techincal Bid) उघडण्याची तारीख ०४.०७.२०१५ अशी होती. प्राप्त ०३ निविदाधारकांचे तांत्रिक ई-निविदा लिफाफे दि.०४.०७.२०१५ रोजी मा.उपकार्यकारी अधिकारी, मा.मुख्यलेखाधिकारी व मा.सर्व प्रशासकीय अधिकारी यांचे समक्ष उघडून निविदाधाराकांच्या बयाणा रक्कम तसेच कागदपत्रांची तपासणी मा.मुख्यलेखाधिकारी लेखाशाखा यांचेमार्फत करण्यात आलेली केल्यानंतर सर्व निविदाधारक क्वालिफाय झालेमुळे सदरचे काम तातडीचे असल्याने निविदाधारकासमक्ष व मा.उपकार्यकारी अधिकारी, मा.मुख्यलेखाधिकारी व मा.सर्व प्रशासकीय अधिकारी यांचे उपस्थितीत लगेच दि.०४.०७.२०१५ रोजी कमर्शियल ऑनलाईन फेर ई-निविदा उघडणेत आलेल्या आहेत.

सिंहस्थ कुंभमेळा सन-२०१५ निमित्ताने शिर्डी व परिसरात साईभक्तांसाठी करावयाच्या अतिरिक्त सुविधा पुरविणेसाठी लाईट व्यवस्थेकरीता भाडोत्री तत्त्वावर जनसेट पुरविणेकामी प्राप्त झालेल्या ०३ ई-निविदा दि.०४.०७.२०१५ रोजी निविदाधारकासमक्ष व मा.उपकार्यकारी अधिकारी, मा.मुख्यलेखाधिकारी व मा.सर्व प्रशासकीय अधिकारी यांचे उपस्थित उघडणेत आले, परंतु निविदाधारकांनी ई-निविदेमध्ये एक दिवसाचे दर देणेऐवजी ३० दिवसाचे दर नमूद केलेले आहे. निविदेधारकांकडून प्रति दिवसाकरीता २० केव्हीए जनसेटरचे व ३० केव्हीए जनसेटरचे प्रती दिन भाडे स्वत:चे हस्ताक्षरात फर्मचे लेटरवर लिहून घेतलेले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | निविदाधारकानी दि. ०४.०७.२०१५ रोजी लेखी दिलेले प्रती जनसेट प्रती दिवसाचे दर | ई-निविदेमधील एकुण ३० दिवसाचे दर (२० केव्हीए जनसेट + ३० केव्हीए जनसेट भाडे एकुण रक्कम) |
|---|---|---|---|
| ०१) | **मे.निर्मल मंडप, सोलापूर** | **२० केव्हीए प्रती जनसेट –<br>रु. २,२५०/- x ६ नग= एकुण १३,५००/-<br>३० केव्हीए प्रती जनसेट –<br>रु. २,४००/- x ३ नग = एकुण ७,२००/-** | **रु. ६,२१,०००/-** |

| | | | |
|---|---|---|---|
| ०२) | मे.गणेश मंडप कॉन्ट्रॅक्टर, सोलापूर | २० केव्हीए प्रती जनसेट – रु. २,३५०/- x ६ नग= एकुण १४,१००/- ३० केव्हीए प्रती जनसेट – रु. २,४७५/- x ३ नग = एकुण ७,४२५/- | रु. ६,४५,७५०/- |
| ०३) | मे.आर्या एन्टरप्राईजेस, उस्मानाबाद | २० केव्हीए प्रती जनसेट – रु. २,३५०/- x ६ नग= एकुण १४,१००/- ३० केव्हीए प्रती जनसेट – रु. २,५००/- x ३ नग = एकुण ७,५००/- | रु. ६,४८,०००/- |

सिंहस्थ कुंभमेळा सन-२०१५ निमित्ताने शिर्डी व परिसरात साईभक्तांसाठी करावयाच्या अतिरिक्त सुविधा पुरविणेकामी लाईट व्यवस्थेकरीता भाडोत्री तत्वावर जनसेट पुरविणेकामी मे.निर्मल मंडप, सोलापूर यांचे २० केव्हीए प्रती जनसेट प्रती दिन भाडे रु. २,२५०/- ( रु. २,२५०/- x ६ नग = एकुण १३,५००/-) व ३० केव्हीए जनसेट प्रती दिन भाडे रु. २,४००/- (रु. २,४००/- x ३ नग = एकुण ७,२००/-) असे एकुण ३० दिवसाकरीता भाडोत्री जनसेट पुरविणेकामी रक्कम रु. ६,२१,०००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेस व त्यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सिंहस्थ कुंभमेळा सन- २०१५ निमित्ताने शिर्डी व परिसरात साईभक्तांसाठी अतिरिक्त सुविधा पुरविणेसाठी लाईट व्यवस्थेकरीता भाडोत्री तत्वावर जनसेट पुरविणेकामी उघडण्यात आलेल्या फेर ई-निविदांच्या कार्यवाहीचे अवलोकन करणेत येऊन, सदरहूकामी निम्नतम दरधारकास कार्यादेश देणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस आहे.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

१४ **कॅन्टीन विभागाकरीता कॅरेटस् खरेदीकामी झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत.**

विनियम 17 (1)मध्ये साईभक्तांना आवश्यक त्या सोयी व सूविधा उपलब्ध करुन देणेची तरतूद आहे.

कॅन्टीन विभागामार्फत साईभक्तांना प्रसादलाडू काऊंटरवर प्रसादलाडू पाकीटांची विक्री करणेत येते.तसेंच दर्शनरांगेतील साईभक्तांना प्रसादलाडू बुंदि पाकींटाचे वाटप कॅन्टीन विभागामार्फत् करण्यात येते .सकाळी 6 ते 10 या वेळेत नाष्टा पाकीटांची विक्री देखील कॅन्टीन विभागामार्फत केली जाते.पूर्वी प्रसादलाडू तयार करणेचे काम जून्या प्रसादालयाचे किचन शेडमध्ये करणेत येत होते.सदर किचन व प्रसादलाडू विक्री काऊंटर जवळच असलेने रिकामे झालेले कॅरेटर्स त्याच ठिकाणी लगेचच ठेकेदारामार्फत भरुन मिळत होते.त्यामूळे अतिरीक्त् कॅरेटची आवश्यकता भासत नव्हती .परंतू आता प्रसादलाडू, प्रसाद बुंदि पाकीटे नंविन प्रसादालय परीसरात तयार करणेत येत आहेत.प्रसाद लाडू कॅरेटस मध्ये भरुन लाडू विक्री काऊंटरवर व प्रसाद बुंदि पाकीटे कॅरेटमध्ये भरुन दर्शनरांगेत प्रसाद बुंदी वाटपाचे ठिकाणी वाहनादारे आणावी लागत आहेत.सदरची कॅरेटर् संपलेनंतर तेवढीच कॅरेटस लाडू विभागामार्फत त्या ठिकाणी भरुन ठेवावी लागतात.रिकामी झालेली कॅरेटस लाडू निर्मीतीचे ठिकाणी ठेवून भरेलेली कॅरेट वाहनादारे लाडू विक्री व प्रसाद बुंदि वाटपाचे ठिकाणी आणली जातात.त्यामूळे अतिरीक्त् कॅरेटस उपलबध ठेवावे लागत आहेत.तसेंच सकाळी 6 ते 10 या वेळेतही नाष्टा पाकीटे वाहतूकीसाठी कॅरेटची आवश्यकता असते .त्याकरीता अतिरीक्त् (जादा) कॅरेटस असणे जरूरीचे आहे.

माहे जुलै ते सप्टेबर या कालावधीत नाशिक ,त्रबकेश्वर येथे सिंहस्थ् कुंभमेळा आहे.जुलै महिन्याचे दि.30/07/15 ते 01/08/15 या कालावधीत श्री गुरुपोणिमा उत्सव साजरा करणेत येणार आहे.तसेंच श्रावणमासा निमीत्त् प्रतिवर्षा प्रमाणे श्री साईसच्चरीत्र पारायण देखील आयोजीत करणेत येणार आहे.माहे जुलै ते ऑगष्ट या कालावधीत कुंभमेळा ,गुरुपोणिमा, पारायण असलेने साईभक्तांची प्रंचड गर्दी अपेक्षीत असून गर्दीचे कालावधीत साईभक्तांना देण्यात येणाऱ्या प्रसादलाडू प्रसाद बुंदि,नाष्टा पाकींटे या सेवा सुविधा मध्ये उणीव भासू नये याकरीता तातडीने 35 कॅरेटस विहित पध्दतीने खरेदी केले आहेत.

कॅरेटस तातडीने खरेदी करणे आवश्यक असलेने पूर्व मंजूरी घेणे दरपत्रके मागविणे, न्युनतम दरधारकास पुरवठा आदेश देणे या विहित पध्दतीनुसार में.सोमनाथ गंगाधर रासने संगमनेर याचेदर न्युनतम असलेने त्यांचेकडून 35 कॅरेट खरेदी केले असून याकामी रु.38115/- मात्र खर्च आलेला आहे.तरी सदरचे खर्चास व में.सोमनाथ गंगाधर रासने याचें बील आदा करणेस कार्योन्त्र मंजूरी मिळणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेत चर्चा होवून निर्णय होणेस विनंती आहे.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कॅन्टीन विभागाकरीता कॅरेटस् खरेदीकामी झालेल्या रु.३८,११५/- मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस आहे.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

१५ **साईनिवास अतिथीगृह इमारतींचे प्लंबींग मेन्टेनंसकरीता मटेरीयल खरेदी करणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदः-** २१ (१) चा (क)- मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

**प्रस्तावना:-** श्री साईंच्या दर्शनासाठी शिर्डी येथे येणा-या साईभक्तांना निवासाची सुविधा उपलब्ध व्हावी याकरीता संस्थानमार्फत निवासस्थान इमारतींची उभारणी करण्यात आलेली आहे. सदर इमारतींमधील खोल्या/हॉल साईभक्तांना निवासासाठी उपलब्ध करुन देणेत येत आहेत.

साईप्रसाद निवासस्थान विभागाकडील जा.नं./एसएसएस/वशी-सा.प्र.नि/९४५/२०१५, दि. ०१/०६/२०१५ चे पत्रान्वये आगामी नाशिक कुंभमेळा-२०१५ करीता शिर्डीत श्री साईंचे दर्शनासाठी होणारी संभाव्य गर्दी तसेच संस्थानचे साईनिवास अतिथिगृहात नेहमी मान्यवरांची निवासाची व्यवस्था करण्यात येत असल्याने सदर इमारतीमधील पाणी गळती थांबविणेसाठी पाणी पुरवठा विभागाचे संबंधीत कामे करुन घेणेबाबत कळविण्यात आलेले आहे.

**प्रस्ताव:-** पाणी पुरवठा विभागाकडुन साईनिवास अतिथीगृह इमारतीची पाहणी केली असता, सदर इमारतीचे ब-याच खोल्यांमधील बेसीन, कमोड संडास भांडे, शिट कव्हर, नळ खराब झालेचे आढळुन आलेले आहेत. सदरचे खराब झालेले साहित्य बदलविणे गरजेचे असल्याने ते खरेदी करणे आवश्यक आहे.

खरेदी करावयाच्या साहित्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | साहित्य तपशिल | कंपनी | परिमाण | एकक | अंदाजे दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | मिक्सर कॉक (नं.CQT-23273UPR) | जग्वार | २८ | नग | ४,०००.०० | १,१२,०००.०० |
| ०२ | पिलर कॉक (नं.CQT-23167B) | जग्वार | २८ | नग | ३,५००.०० | ९८,०००.०० |
| ०३ | सी.पी.ॲंगल कॉक (नं.CQT-23053) | जग्वार | ५६ | नग | ७००.०० | ३९,२००.०० |
| ०४ | वॉल हॅंगिग कमोड शिट कव्हर | पॅरिवेअर | २८ | नग | ८००.०० | २२,४००.०० |
| ०५ | वॉल हॅंगीग कमोड संडास भांडे (सफेद)(नं.0298) | पॅरिवेअर | २८ | नग | ६,०००.०० | १,६८,०००.०० |
| ०६ | ग्रेनाईट व्हाईट राऊंड बेसीन (नं.0448) | पॅरिवेअर | २८ | नग | १,८००.०० | ५०,४००.०० |
| ०७ | फ्लश व्हॉल (नं.FLV 1025) | जग्वार | २८ | नग | ४,४००.०० | १,२३,२००.०० |
| अंदाजे एकुण रक्कम रुपये- | | | | | | ६,१३,२००.०० |

**विभागाचे स्पष्ट मत / अभिप्राय:-** साईप्रसाद अतिथीगृह इमारतीत यापुर्वी वरील नमुद कंपनीचे मटेरियलचा वापर करण्यात आलेला आहे. त्यामुळे मेन्टेनंसचे सोईनुसार पुन्हा त्याच कंपनीचे मटेरियल खरेदी करणेचे प्रस्तावीत केलेले आहे. तसेच याकामी श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ कलम २१ (१) चा (क) मध्ये नमुद केलेल्या तरतुदीनुसार व जा.क्रं. एसएसएस/साप्रशा/आस्था/१८८१/२०१४, दि. ०४/०८/२०१४ रोजीचे आदेशान्वये रक्कम रु. २५,००१/- ते रु. १०,००,०००/- मात्र आर्थीक मर्यादितील आवश्यक साहित्य खरेदी करणे/ विभागांतर्गत आवश्यक कामे करणे आदि बाबींना (अशा बाबींसाठी विहीत पध्दतीने दरपत्रके/ निविदा बोलविणे, त्याच्या अटी-शर्ती निश्चित करणे, त्याची गुणवत्ता/ दर्जा/ उपयुक्तता निश्चित करणे इ.) प्रशासकिय मान्यता देणेचे अधिकार उपसमितीस प्रदान करण्यात आलेले आहेत. मा.उपसमितीची मान्यता घेतल्यानंतर सदरचे साहित्य निविदा मागवून खरेदी करता येईल असे मत आहे.

तरी वरीलप्रमाणे नमुद साहित्य खरेदी करणेसाठी अंदाजे रु. ६,१३,२००/- मात्र खर्च अपेक्षित आहे. तरी सदरचे साहित्य विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी विभागामार्फत खरेदी करणेस व त्यासाठी येणारे अंदाजे रु. ६,१३,२००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळावी ही विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, कुंभमेळयाचे कालावधीसाठी आवश्यक प्लंबींग साहित्य खरेदी करणेची प्रक्रिया चालू असून प्रस्तावित साहित्यांपैकी जे साहित्य कुंभमेळयाच्या साहित्य खरेदीमध्ये उपलब्ध असेल ते साहित्य वगळून इतर प्लंबींग साहित्य खरेदीकामी फेरप्रस्ताव सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस आहे.** (कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

१६ **साईधर्मशाळा विभागाकडील बेडशीट, उशीकव्हर व चादर धुणे/ इस्त्री करण्याचे कामाबाबत येणा-या वार्षिक खर्चाचे मंजुरीबाबत.**

साई धर्मशाळा हा विभाग दि.१८/०७/२०१३ पासुन पालखी पदयात्रीतील साईभक्तांचे निवासव्यवस्थेसाठी सुरु करण्यात आलेला आहे. सदर ठिकाणी एकुण सहा इमारती असून पैकी एक इमारत श्री साईबाबा संस्थान संचलित कनिष्ठ महाविद्यालय यांना वापरण्यासाठी दिलेली आहे. उर्वरीत पाच इमारतीमध्ये प्रत्येकी ३२ हॉल नुसार एकुण १६० हॉल साईभक्तांचे निवासासाठी वापरण्यात येत आहे.

दि. १५/०२/२०१४ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.१६५ नुसार साईश्रध्दा लॉन्ड्री ॲण्ड सर्व्हीसेस, श्री विजय अशोकराव चव्हाण, सावळीविहीर यांना जा.क्र.एसएसएस/वशी-साईधर्मशाळा/६०८१ /२०१४, दि.२१/०३/२०१४ रोजीचा पुरवठा आदेशाने सन २०१४-१५ मध्ये साई धर्मशाळा या विभागाकडील बेडशिट, उशीकव्हर व चादर धुणे/इस्त्री करणेचे वार्षिक काम पुढील एका वर्षासाठी म्हणजे दि.१८/०७/२०१४ ते १७/०७/२०१५ अखेर देण्यात आलेले आहे. पुर्वीच्या ठेकेदाराची मुदत दिनांक १७/०७/२०१५ रोजी संपृष्ठात येत आहे.

साई धर्मशाळा विभागामध्ये सन २०१४-१५ सालासाठी एकुण ५,०८,०११ इतक्या साईभक्तांची निवासाची व्यवस्था करणात आली असुन, कपडे धुण्यासाठी बेडशिट १०,४४८ नग, उशीकव्हर ४,९७५ नग तसेच चादर ३९७ नग दिले होते. साई धर्मशाळा विभागाकडील बेडशिट, उशीकव्हर व चादर इ. धुण्यासाठी एकुण रुपये १,०१,९७४/- (अक्षरी रु.एक लाख एक हजार नऊशे चौ-याहत्तर मात्र) इतका खर्च झाला आहे. साईभक्तांची वाढणारी गर्दी तसेच निवासाची व्यवस्था पाहुन साई धर्मशाळाकडेही गर्दीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. त्यावेळी बेडशिट, उशीकव्हर व चादर यांचा वापर जास्त होणार आहे. त्यामुळे कपडे धुणे/इस्त्री यांचा खर्चही वाढणार आहे.

भक्तांची गैरसोय होऊ नये म्हणुन नविन ठेकेदाराची नेमणुक होईस्तोपर्यंत पुर्वीच्याच ठेकेदारास मागील दरानुसार बेडशिट, उशीकव्हर व चादर धुणे/इस्त्री करणेकामी आदेश देता येईल, असे नम्र मत आहे.

साई धर्मशाळा येथील बेडशिट, उशीकव्हर व चादर धुणे/इस्त्री करणेकामी मासिक खर्च अंदाजे २५,०००/- (अक्षरी रु.पंचवीस हजार मात्र ) खर्च येणार असुन सन २०१५-१६ साठी एकुण रु.३,००,०००/- (अक्षरी रु. तिन लाख मात्र) खर्च येणार आहे. मा. उपसमितीचे सभेत निणयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस आहे.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईधर्मशाळा)

---

१७ **जुने प्रसादालय पार्किंग मैदानावर संस्थान कर्मचारी यांचे दुचाकी वाहने पार्किंग करणेसाठी शेड उभारणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील** तरतुद- अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावनाः**– संस्थानचे जुने प्रसादालय परिसरातील पार्कींग मैदानावर साई प्रसाद निवासस्थान विभाग, कॅन्टीन विभाग, भांडार विभाग, खरेदी विभाग, व विद्युत विभागातील कर्मचारी अंदाजे १०० दुचाकी वाहने पार्कींग करत असतात. यापुर्वी मैदानाच्या उत्तर बाजूस दुचाकी पार्कींग शेड तयार करण्यात आले आहेत. परंतू त्याठिकाणी फळे विक्रेते यांनी आप–आपले स्टॉल लावलेले आहेत. त्यामुळे डयुटीवर कार्यरत असणा-या कर्मचारी यांचे दुचाकी वाहने उन्हात पार्कींग करावे लागतात. उन्हात वाहने पार्कींग केल्यामुळे दुचाकी वाहनांची टायर पंक्चर होणे, पेट्रोल कमी होणे यासारख्या समस्या उदभवत आहे. संरक्षण विभागाकडील दि.१४/०४/२०१५ रोजीचे टिपणी अन्वये संस्थान कर्मचारी यांनी इकडील विभागास दुचाकी वाहनांकरीता पार्कींग शेड तयार करुन देणेबाबत कळविले आहे.

**प्रस्ताव**– जुने प्रसादालय येथे दुचाकी वाहनांकरीता ४६mx३.००m या साईजचे शेड तयार करणेत आलेले आहे. सदरचे शेडमध्ये ५० दुचाकी मोटार सायकल पार्किंग होऊ शकतात. आणखी ५० मोटार सायकल करीता पार्किंगची व्यवस्था करणेकामी जुने प्रसादालय येथील एल.पी.जी. यार्डचे पश्चिम बाजूकडील भिंतीस L Shape मध्ये ४५mx३.३०m या साईजचे शेड उभारता येईल. याकामी सोबतचे अंदाजपत्रकानुसार रु.३,९२,०००/- मात्रचा खर्च अपेक्षीत आहे.

विषयांकीत कामाबाबत मॅकेनिकल विभागाचा अभिप्राय घेण्यात आला असून तो खालील प्रमाणे आहे.

*"जुने प्रसादालय परिसरातील एल.पी.जी. टॅंक मधील गॅसचा वापर कॅन्टीन विभाग तसेच लाडू निर्मिती विभाग यांचे करीता करण्यात येत होता. मागील महिन्यात दोन्ही विभाग साई प्रसादालय परिसरात स्थलांतरीत करण्यात आलेले असलेने सदरचे एल.पी.जी. टॅंक मध्ये गॅस घेणे बंद केलेले आहे. त्यामुळे मोटार सायकल पार्कींग करीता यार्ड चे पश्चिम भिंतीलगत शेड तयार करणेस हरकत नाही."*

तरी जुने प्रसादालय येथील एल.पी.जी. यार्डचे पश्चीम बाजूकडील भिंतीलगत दुचाकी वाहनांकरीता पार्कींग व्यवस्था करणे करीता शेड उभारणीकामी येणारे अंदाजे रक्कम रु.३,९२,०००/- मात्रचे अपेक्षीत खर्चास तसेच याकामी वर्तमानपत्रातील जाहिरातीद्वारे ई – निविदा मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, जुने प्रसादालय येथील एल.पी.जी. यार्डचे पश्चीम बाजूकडील भिंतीलगत संस्थान कर्मचा-यांची दुचाकी वाहने लावणेसाठी पार्किंग शेड उभारणीकामी वर्तमानपत्रातील जाहिरातीद्वारे ई-निविदांची मागणी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु. ३,९२,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी.**

**तसेच त्याठिकाणी संस्थान कर्मचा-यांव्यतिरिक्त इतरांची वाहने पार्क करुन देऊ नये, यासाठी संस्थान कर्मचा-यांना वाहन पार्क करणेसाठी टोकण देण्याची व्यवस्था करणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस आहे.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

१८ **श्री साईबाबा हॉस्पिटलमधील अधिकारी/ कर्मचारी यांच्या दुचाकी वाहने पार्किंग करणेसाठी शेड उभारणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदः**- अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**मा. व्यवस्थापन समिती निर्णयः**

१. मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०४/०२/२०१४ रोजीचे सभेत निर्णय क्र. ८८.
२. मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १२/०६/२०१४ रोजीचे सभेत निर्णय क्र.४५२ (अ) (०२).
३. मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २५/०९/२०१४ रोजीचे सभेत निर्णय क्र.८११ (०२).

**प्रस्तावनाः** मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०४ फेब्रुवारी, २०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ८८ नुसार श्री साईबाबा हॉस्पिटलमधील अधिकारी/ कर्मचारी यांच्या दुचाकी वाहने पार्किंग करणेसाठी शेड उभारणेकामी विहीत पध्दतीने वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन निविदांची मागणी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.६,०८,५६५/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

१. दि.०५/०४/२०१४ रोजीचे दैनिक देशदुत व दैनिक पुढारी या वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आल्या. दि.१८/०४/२०१४ पर्यंतच्या अंतिम मुदतीत प्राप्त झालेल्या तिन निविदा मा. व्यवस्थापन समितीचे दि.१२/०६/२०१४ रोजीचे सभेत उघडण्यात आल्या. सदरहू सभेतील निर्णय क्र. ४५२ (अ) (०२) अन्वये प्राप्त झालेल्या तिन निविदांपैकी दोन ठेकेदारांनी निविदे सोबत आवश्यक असलेली कागदपत्रे सादर केलेली नसल्याने, ते अपात्र ठरले. त्यामुळे याकामी फेर निविदा मागविण्यात याव्यात अशी उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.

२. दि.१२/०६/२०१४ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार याकामी दि.१४/०८/२०१४ रोजीचे दैनिक सार्वमत व दैनिक पुढारी या वर्तमानपत्रात फेर निविदा सूचना प्रसिध्द करुन निविदा मागविणेत आल्या. सिलबंद निविदा सादर करण्याचे अंतिम मुदत दि.२३/०८/२०१४ अखेर प्राप्त झालेल्या सहा सिलबंद निविदा मा. उपसमितीचे दि.१३/०९/२०१४ रोजीचे सभेत उघडणेत येऊन, मा. व्यवस्थापन समितीचे दि.२५/०९/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ८११ (०२) अन्वये निम्नतम दर धारक ठेकेदार श्री. संतोष नागनाथ गुंजेगांवकर, निघोज यांना कार्यादेश देणेत यावा. अशी उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.

वरील प्रमाणे झालेले निर्णयानुसार ठेकेदार श्री. संतोष नागनाथ गुंजेगांवकर, निघोज यांना इकडील जा. क्र. ३६२६/ २०१४ दि.३१ ऑक्टोबर, २०१४ अन्वये रु.५,४७,७०९/- मात्रचा देणेत आला होता. सदरचे काम करणेस ठेकेदार असमर्थ ठरल्याने, याकामी दि.११/०४/२०१५ रोजीचे टिपणी अन्वये ठेकेदार यांना दिलेला कार्यादेश रद्द करुन त्यांची संस्थानकडे या कामापोटी जमा असलेली अनामत रक्कम रु.६०००/- मात्र वित्त विभागामार्फत जप्त करुन घेणेस व याकामी फेर निविदा मगविणेसाठी वर्तमान पत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर ई- निविदा सूचना हि जाहिरात प्रसिध्द करणेस मान्यता देणेत आली.

सदर मान्यतेनुसार याकामी दि.२९/०४/२०१५ रोजीचे दैनिक सार्वमत या वर्तमानपत्रात निविदा सूचना प्रसिध्द करणेत आली होती. ई-निविदा अपलोड करण्याचे दि.१४/०५/२०१५ रोजी पर्यंतचे अंतिम मुदतीत खालील तिन ठेकेदारांनी ई-निविदा अपलोड केल्या.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव |
|---|---|
| ०१. | कृष्णा इन्फ्रास्ट्रक्चर, संगमनेर |
| ०२. | श्री. बी. पी. शिंदे, पढेगांव |
| ०३. | रत्ना इंजिनिअर्स, भोसरी, पुणे |

विषयांकीत कामासाठी वरील प्रमाणे प्राप्त झालेल्या ई-निविदांचा लिफाफा क्र. ०१ (Technical bid) ची कागदपत्रे विभागाचे प्रशासकिय अधिकारी यांचे समक्ष दि.२६/०५/२०१५ रोजी उघडणेत आली असून, निविदेमध्ये नमूद केलेनुसार पात्रता निकष (Minimum Qualifying Criteria ) मध्ये नमूद केलेप्रमाणे वरील तिनही ठेकेदार पात्र होत असल्याने, त्यांचे निविदेचा लिफाफा क्र. ०२ (Commercial bid) इकडील विभागाचे प्रशासकिय अधिकारी यांचे समक्ष दि.२५/०६/२०१५ रोजी उघडणेत आला असून, प्राप्त दरांचा तुलनात्मक तपशिल खालील प्रमाणे आहे.

| S.No | Bidder Name | Estimated Rate | Quoted Percentage | Quoted Rate in Figures and Words | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | Rate | Amount |
| 1 | RATNA ENGINEERS | 608565.9252 | -5.00 | 578137.63 | Five Lakh Seventy Eight Thousand One Hundred and Thirty Seven |
| **2** | **Krushna Infrastructure** | **608565.9252** | **-7.93** | **560306.65** | **Five Lakh Sixty Thousand Three Hundred and Six** |
| 3 | Mr Babasaheb P Shinde | 608565.9252 | -7.13 | 565175.17 | Five Lakh Sixty Five Thousand One Hundred and Seventy Five |

तरी उपरोक्त विषयांकीत कामासाठी वरील प्रमाणे ठेकेदार Krushna Infrastructure, Sangamner यांनी देऊ केलेले दर निम्नतम (L1) आहेत करीता सदरचे काम त्यांचेकडून करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमधील अधिकारी/ कर्मचारी यांची दुचाकी वाहने लावणेसाठी पार्किंग शेड उभारणेकामी प्रस्तावात नमुद केलेल्या ई-निविदा प्रक्रियेचे अवलोकन करणेत येऊन, कृष्णा इन्फ्रास्टक्चर, संगमनेर यांचे रु.५,६०,३०६/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा.**

**तसेच त्याठिकाणी संस्थान कर्मचा-यांव्यतिरिक्त इतरांची वाहने पार्क करुन देऊ नये, यासाठी संस्थान कर्मचा-यांना वाहन पार्क करणेसाठी टोकण देण्याची व्यवस्था करणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस आहे.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

१९ **श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव (दसरा) सन- २०१५ निमित्त मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम,२००४ मधिल तरतूदः-** अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट- कलम (१) च्या खंड (ख) अन्वये *"रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पुजा- अर्चा,समारंभ व*

*उत्सव आयोजीत करणे व पार पाडणे"* या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

तसेच अधिनियमाच्या पोट कलम (१) च्या खंड (ग) अन्वये *"भक्तांना मंदिरात देवेतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे"*या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावनाः** संस्थानमार्फत प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी बुधवार दि.२१ ऑक्टोबर २०१५ ते शुक्रवार दि.२३ ऑक्टोबर २०१५ अखेर ०३ दिवस श्रींचा पुण्यतिथी उत्सव साजरा करण्यात येणार आहे. उत्सवाचे कालावधीत साईभक्तांची मोठया प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता असल्यामुळे मंदिर परिसरात खालील तपशिलाप्रमाणे मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणे आवश्यक आहे.

**अ) समाधी मंदिर परिसरात ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप उभारणे:-**

**I) एम.एस .पाईप, कैच्या वापरुन वरील बाजूने ताडपत्री व आतिल बाजुने सुशोभित काडप असलेले मंडप.**

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण | मंडपाची साईज | चौरस फुट |
|---|---|---|---|
| ०१ | समाधी मंदिर उत्तर बाजूस, चावडी गेट ते नगरद्वार गेटपर्यंत. | २८४'x१९' | ५३९६.०० |
| ०२ | समाधी मंदिरासमोरील सभाकुंडामध्ये | ६१'x६१' | ३७२१.०० |
| ०३ | मंदिर परिसराचे पुर्वेकडील मोकळया जागेत | २००'x८०' | १६०००.०० |
| ०४ | साई कॉम्प्लेक्स समोर पिंपळवाडी रस्त्यावर दर्शन रांगेसाठी | ३००'x१८' | ५४००.०० |
| | | एकूण चौ. फुट | ३०,५१७.०० |
| | **अंदाजे रु.१.९२ प्रती चौ. फुट प्रमाणे येणारे एकूण अंदाजे अपेक्षीत खर्च -** | | **१,७५,७७८/-** |

**II) पाईप/ बांबु व गोल्टे वापरुन वरील बाजूने ताडपत्री व आतिल बाजुने सुशोभित कापड असलेले मंडप.**

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण | मंडपाची साईज | चौरस फुट |
|---|---|---|---|
| ०१ | समाधी मंदिर दक्षिण बाजूस, द्वारकामाई ते पालखी गेटपर्यंत | १६०'x१८' | २८८०.०० |
| ०२ | अ) समाधी मंदिर बाहेर पडण्याचा मार्ग (गुरुस्थान गेट) गुरुस्थान समोरील बेसमेंट पर्यंत. | १५०'x१०' | १५००.०० |
| | ब) गुरुस्थान समोर पश्चिम बाजूस दक्षिण – उत्तर असा. | ४५'x३५' | १५७५.०० |
| ०३ | गेट नं.३ ते श्री मारुती मंदिर पर्यंत १५ फुट उंचीचा | ६५'x२०' | १३००.०० |
| ०४ | श्री मारुती मंदिर ते शाम सुंदर हॉल पर्यंत | ६०'x२७' | १६२०.०० |
| ०५ | गेट नं.०४ समोर | ६०'x२५' | १५००.०० |
| ०६ | श्रींचे चावडी समोर शामसुंदर हॉल पर्यंत | ८०'x३०' | २४००.०० |
| ०७ | शनि मंदिर, महादेव, श्री गणेश मंदिरासमोर. | ६०'x४०' | २४००.०० |
| ०८ | शनि मंदिर व्हि.आय.पी. गेट समोर दर्शन रांगेकरीता | ८०'x१०' | ८००.०० |
| ०९ | मंदिर परिसरामध्ये कॅलेंडर विक्री काउंटर समोर | १५'x२०' | ३००.०० |
| १० | श्री साई प्रसादालय मुख्य गेट ते तिकीट बुकींग काऊंटर पर्यंत. | १५०'x१८' | २७००.०० |
| ११ | श्री साईबाबांचे शिल्पासमोर | ९०'x१८' | १६२०.०० |
| १२ | जनसंपर्क कार्यालयासमोर | ४०'x१५' | ६००.०० |
| १३ | लेंडीबागेत श्री दत्त मंदिरासमोर | १०५'x३५' | ३६७५.०० |
| १४ | उदी काऊंटर समोर | ४५'x२०'<br>२०'x१५' | ९००.००<br>३००.०० |
| १५ | जुना पिंपळवाडी रस्ता दर्शन रांगेच्या पुर्व व पश्चिम बाजूने | ३०'x७५'<br>४५'x१५' | २२५०.००<br>६७५.०० |
| १६ | जुने प्रसादालय परिसरात मोबाईल लॉकर्स समोर | ४५'x२५' | ११२५.०० |
| १७ | लाडू विक्री काऊंटर समोर | ६०'x३०' | १८००.०० |
| १८ | नगर मनमाड रस्ता पुर्व बाजू फुटपाथवर | ४३०'x८' | ३४४०.०० |
| १९ | पिंपळवाडी रस्ता उत्तर बाजू फुटपाथवर | ४००'x७' | २८००.०० |
| | | एकूण चौ. फुट | ३८,१६०.०० |
| | **अंदाजे रु.२.२० प्रती चौ. फुट प्रमाणे येणारे एकूण अंदाजे अपेक्षीत खर्च -** | | **२,५१,८५६.००** |
| | | **एकूण (अ I+II)** | **४,२७,६३४.००** |

**ब) साईनगर मैदानावर कलाकारांचे कार्यक्रमासाठी स्टेज व्यवस्था:-**

| अ.नं. | ठिकाण | साईज | चौरस फुट |
|---|---|---|---|
| ०१ | सदरहू स्टेजवर सुमारे ४० ते ५० कलाकारांसाठी ३' -६'' उंचीचे स्टेज अंगल फ्रेममध्ये मजबुत बांधी तयार करुन स्टेजचे वरील बाजुने भक्कम असे प्लायवूड वापरुन व मजबूत सपोर्ट देऊन ३०'x२०' साईजचे स्टेज तयार करणे. तसेच | ३०'x२०' | ६००.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| | सदरहू स्टेजचे वरील बाजूने ताडपत्री बांधून,आतिल बाजूने सुशोभित एकाच रंगाचे कापड बांधून, स्टेज फ्रेमचे चारही बाजुने सुशोभित एकाच रंगाचे कापड बांधणे, स्टेजचे पुढील भागासाठी सुशोभित एकाच रंगाचा सुमारे ३५' लांबीचा व १५' उंचीचा पडदा बसविणे. तसेच स्टेजचे बाजूस कलाकारांचे मेकअपसाठी २०'x१५' साईजच्या ०२ ग्रीन रुम जाड कापडामध्ये तयार करणे, स्टेजवर व साईभक्तांना बसणेकामी १०,००० चौ. फुट मॅटीन, १००० नग फायबर खुर्च्या पुरविणे व कार्यक्रमाचे वेळी व्यवस्थीत मांडणी करुन देणे इ. सह व्यवस्था. | | |
| | एकूण चौ. फुट | | ६००.०० |
| | **अंदाजे रु.३८.५० प्रती चौ. फुट प्रमाणे येणारे एकूण अंदाजे अपेक्षीत खर्च** | | **६९,३००/-** |
| ०२ | **मंदिर परिसरामध्ये सभाकुंड येथे:-**<br>सदर स्टेजवर सुमारे २० ते २५ कलाकारांकरीता २'-६' उंचीचे स्टेज अंगल फ्रेममध्ये स्टॅण्ड उभारणी करुन प्रत्येकी ३'x३' अंतरावर खालील बाजूस सपोर्ट देऊन त्यावर भक्कम प्लायवूड एकाच लेव्हलमध्ये बांधणेत यावेत. स्टेजचे पाठीमागील भागात निळया रंगाचा प्लेन पडदा लावून साईडणे सफेद (पांढरे) कापड तसेच स्टेजचे प्लॅटफॉर्मला पुढील बाजूने तसेच साईडणे चॉकलेटी / सफेद रंगाचे कापड लावण्यात यावेत. स्टेजचे बाजूस कलाकारांचे मेकअप करीता १०'x१०' साईजचे दोन (०२) ग्रीन रुम, जाड कापडी पार्टीशनमध्ये तयार करणे, स्टेजवर मॅटीन टाकून स्टेज सुमारे ३०० नग फायबर खुर्च्या टाकणे.<br>तसेच स्टेजचे बाजूने स्पीकर ठेवणेकरीता ३'x३' साईजचे व ३ फुट उंचीचे प्लॅटफॉर्म तयार करुन देणे व स्टेज करीता दोन बाजुने अंदाजे ३ फुट ते ४ फुट रुंदीच्या पाय-या (जिने) तयार करुन बसविणे. इ. सह स्टेज व्यवस्था करणे. | १६'x२४' | ३८४.०० |
| | ..एकूण चौ. फुट | | ३८४.०० |
| | **अंदाजे रु.३८.५० प्रती चौ. फुट प्रमाणे येणारे एकूण अंदाजे अपेक्षीत खर्च** | | **४४,३५२/-** |
| | **एकूण (अ १ + २)** | | **१,१३,६५२/-** |

**क) दर्शन रांगेसाठी व श्री साईप्रसादालय येथे तिकीट रेलिंगसाठी बॅरेकेटींग करणे:-**

| **अ.नं.** | **ठिकाण** | **साईज** | **चौरस फुट** |
|---|---|---|---|
| ०१ | दर्शन रांगेकरीता व श्री साई प्रसादालय येथे साईभक्तांचे रेलींग व्यवस्थेकामी व इतर आवश्यक ठिकाणी ४'' उंचीचे लोखंडी पाईप / बांबू वापरुन भक्कम बांधी करुन बॅरेकेडींग करणे. | १००० रनिंग फुट | १०००.०० |
| | ..एकूण चौ. फुट | | १०००.०० |
| | **अंदाजे रु.७.७० प्रती चौ. फुट प्रमाणे येणारे एकूण अंदाजे अपेक्षीत खर्च** | | **२३,१००/-** |
| | **एकूण (अ+ब+क)** | | **५,६४,३८६.००** |

पुण्यतिथी उत्सव २०१५ निमित्त करावयाच्या मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्थेकरीता वरीलप्रमाणे एकूण रु.५,६४,३८६/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

**प्रस्ताव:** -श्री पुण्यतीथी उत्सव (दसरा) २०१५ करिता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी अंदाजे रु.५,६४,३८६/- मात्र अंदाजे खर्च अपेक्षीत आहे. तसेच समाधी मंदिर व परिसरात रंगकाम करणेकामी रु.१५,०००/-, विद्युत रोषणाई करीता बांबु गोल्टे भाडोत्री व विकत घेणेकरीता रु.२०,०००/- व माहीतीचे बोर्ड तयार करणेकामी रु.१०,०००/- असे एकूण ६,०९,३८६/- मात्र खर्च अपेक्षीत आहे.

तरी वरीलप्रमाणे श्री पुण्यतिथी उत्सव २०१५ निमित्त मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी येणारे एकूण रक्कम रु.६,०९,३८६/- मात्रचे खर्चास तसेच मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन ई – निविदा मागविणेस मान्यता मिळणे विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव (दसरा) सन- २०१५ निमित्त प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन, ई-निविदांची मागणी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.६,०९,३८६/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस आहे.**(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

२० **श्री साई प्रसादालयाकडील मालवाहु लिफ्ट व पॅसेंजर लिफ्टचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रक्ट (AMC) देणेबाबत.**

मे.ओटीस इलेव्हेटर कंपनी (इंडिया) लि., मुंबई यांना श्री साई प्रसादालयात माल वाहतुकीकरीता कोलॅप्सीबल डोअर्सचे एक लिफ्ट व व्ही.आय.पी. भोजन कक्षाकरीता स्टेनलेस स्टील डोअर्सचे एक पॅसेंजर लिफ्ट पुरविणे व बसविणेकामी एसएसएस/विद्युत/9237/2007 दिनांक 23/06/2007 अन्वये रुपये 30,41,000/- रकमेचा कार्यादेश देण्यात आला होता.

मे. ओटीस इलेव्हेटर कंपनी (इंडिया) लिमिटेड यांनी श्री साई प्रसादालयामध्ये माल वाहतुकीकरीता कोलॅप्सीबल डोअर्सचे एक लिफ्ट व पॅसेजरकरीता स्टेनलेस स्टील डोअर्सचे एक लिफ्ट बसवून कार्यान्वित केल्या आहेत. लिफ्ट चालू झाल्यानंतर त्यांनी टेंडरमधील कार्यादेशातील अटीनुसार प्रथम वर्षी फ्री सर्व्हीस दिली आहे. त्यानंतर प्रत्येक वर्षी आपण लिफ्ट बसविलेल्या कंपनीलाच सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देत असतो.

मागील वर्षी या दोन्ही लिफ्टसाठी दिनांक 01/04/2014 ते 31/03/2015 या कालावधीसाठी सर्व करांसहीत रुपये 1,98,196/- इतक्या रकमेस देण्यात आलेले होते. त्याची मुदत दिनांक 31/03/2015 रोजी संपणार आहे.

जर रिस्क् कॉन्टॅक्ट (रिस्क प्रोटेक्शन् कॉन्ट्रॅक्ट टाईप) केलेले नसेल आणि मशीनरीला मेकॅनिकल प्रॉब्लेम आले व मशीनरीचे मेकॅनिकल स्पेअर्स बदलण्याची गरज लागली तर या स्पेअर्सचे वेगळे बील भरावे लागते. शिवाय हे स्पेअर्स लगेच उपलब्ध् होतील याची शाश्वती नसते. त्यामुळे लिफ्टचे उत्पादक कंपनी मे. ओटीस इलेव्हेटर कंपनी (इंडिया) लि., मुंबई यांना श्री साई प्रसादालयाकडील दोन्ही लिफ्टचे 01/04/2015 ते 31/03/2016 या कालावधीसाठी वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देणेस व याकामी त्यांनी कळविलेली एकत्रीत रक्कम् रुपये 2,20,910/- (दोन लाख, वीस हजार, नऊशे दहा) मात्र ॲडव्हान्स रक्कम मे. ओटीस इलेव्हेटर कंपनी (इंडिया) लि., मुंबई यांना अदा करणेचा प्रस्ताव दिनांक 18/03/2015 चे मा. उप-समितीची सभेपुढे सादर करणेत आला होता.

उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयाकडील मालवाहू व पॅसेजर लिफ्टचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रक्ट (AMC) देणेसाठी AMC अंतर्गत कोणत्या बाबींचा समावेश होतो. मागील वर्षी कोणते स्पेअरपार्ट बदलले. मागील वर्षापेक्षा चालू वर्षामध्ये AMC रकमेत किती टक्के वाढ झाली याचा उल्लेख करणेत येऊन, सविस्तर फेर प्रस्ताव सादर करणेत यावा, अशी उप-समितीने शिफारस केलेली आहे.

AMC अंतर्गत रिस्क कॉन्ट्रॅक्ट टाईप सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टमध्ये सर्व मेकॅनिकल स्पेअर्स हे रिस्क प्रोटेक्शन कॉन्ट्रॅक्ट टाईप सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट असल्याने त्या स्पेअर्सची कोणतीही किंमत न घेता स्पेअर्स बदलून मिळतात व शिवाय वर्षातून दरमहा कंपनीचा प्रशिक्षित एक्स्पर्ट मेकॅनिल येऊन मशीनरीची साफसफाई करुन सेटींग करुन देत असतो. जेणेकरुन लिफ्ट सुरळीत चालू राहणे शक्य होणार आहे. सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (रिस्क प्रोटेक्शन कॉन्ट्रॅक्ट टाईप) पिरिअडमध्ये मशीनरीचा कोणताही मेकॅनिकल पार्ट नैसर्गिकरित्या (मशीनरीशी कन्झुमरने कोणतीही छेडछाड केलेली नसल्यास) खराब झाल्यास ती बदलून देणे कंपनीला सक्तीचे आहे.

मागील वर्षी AMC कालावधीमध्ये खालीलप्रमाणे स्पेअरपार्ट बदलून दिलेले आहेत :

| मालवाहतुक लिफ्ट | | प्रवासी लिफ्ट | |
|---|---|---|---|
| 1) | लॉजीक बोर्ड (मदर बोर्ड) | 1) | हॅंगर रोल चेंज |
| 2) | कारगेट रोलर | 2) | कार फॅन |
| 3) | हॉल बॉटम | | |

मे.ओटीस इलेव्हेटर कंपनी (इंडिया) लिमिटेड, मुंबई यांनी दिनांक 01/04/2015 ते 31/03/2016 या कालावधी (रिस्क प्रोटेक्शन टाईप सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट्) करीता खालीलप्रमाणे रकमेचा खर्च कळविलेला आहे.

| लिफ्टचा प्रकार | रकमेचा तपशील | AMC करीता मागील वर्षी दि. 01/04/2014 ते 31/03/2015 या देण्यात आलेली रक्कम | AMC करीता या वर्षी दि. 01/04/2015 ते 31/03/2016 या कालावधीकरीता कळविण्यात आलेली रक्कम | या वर्षी AMC रकमेत झालेली वाढ (%) |
|---|---|---|---|---|
| माल वाहतुक | मुळ (अ) : | 1,00,608/- | 1,10,669/- | **10%** |
| | टॅक्सेस (अ) : | 15,007/- | 18,196/- | |
| | **एकूण (अ) :** | **1,15,615/-** | **1,28,865/-** | |
| पॅसेजर | मुळ (ब) : | 71,862/- | 79,048/- | **10%** |
| | टॅक्सेस (ब) : | 10,719/- | 12,997/- | |
| | **एकूण (ब) :** | **82,581/-** | **92,045/-** | |
| माल वाहतुक + पॅसेजर | मुळ (अ+ब) : | 1,72,470/- | 1,89,717/- | **10%** |
| | टॅक्सेस (अ+ब) : | 25,726/- | 31,193/- | |
| | **एकूण (अ+ब) :** | **1,98,196/-** | **2,20,910/-** | |

दिनांक 20/05/2007 रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. 386 अन्वये दरवर्षी संस्थानमधील महत्वाच्या मशीनरीचे (उदा. प्रसादालयातील विविध मशीनरी, विद्युत विभागाकडील विविध मशीनरी, श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध मशीनरी, एअर कंडीशनर, वायुवीजन यंत्रण वगैरे) वार्षिक मेन्टेनन्स सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट अथवा रिस्क् प्रोटेक्शन टाईप सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट हे त्या त्या मशीनरीच्या उत्पादक कंपनीला अथवा संबंधीत मशीनरीच्या उत्पादक कंपनीने निर्देशित केलेल्या त्यांच्या अधिकृत सर्व्हीस डिलरला देण्यात यावे, असे ठरले.

तरी उपरोक्त ठरावानुसार लिफ्टचे उत्पादक कंपनी मे. ओटीस इलेव्हेटर कंपनी (इंडिया) लि., मुंबई यांना श्री साई प्रसादालयाकडील दोन्ही लिफ्टचे 01/04/2015 ते 31/03/2016 या कालावधीसाठी वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देणेस व याकामी त्यांनी कळविलेली एकत्रीत रक्कम् रुपये 2,20,910/- (दोन लाख, वीस हजार, नऊशे दहा) मात्र ॲडव्हान्स रक्कम् मे.ओटीस इलेव्हेटर कंपनी (इंडिया) लि., मुंबई यांना अदा करणेचा फेर प्रस्ताव मा. उप-समितीची सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयाकडील मालवाहू व पॅसेंजर लिफ्टचे मे. ओटीस इलेव्हेटर कंपनी (इंडिया) लि., मुंबई यांचेकडून वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रक्ट (AMC) करणेस व त्याकामी येणारा खर्च रक्कम रुपये २,२०,११०/- मात्र सदरहू कंपनीस अगाऊ देणेस मान्याता देण्यात यावी, अशी उपसमितीची शिफारसर आहे.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

२१ **वाहन क्र.एमएच- १७/ एजे- १६९१ (स्विप्ट डिझायर) चे दुरुस्ती कॉमाकरीता झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

वाहन विभागाकडील संदर्भिय टिपणीनुसार,वाहन क्रं.एमएच-१७/एजे-१६९१ (स्विफ्ट डिजायर) या वाहनाची पुर्वीची इंजिन ऑईल बदली करुन एकुण१४,४८०कि.मी. प्रवास झालेला होता. त्यामुळे मारुती सुझुकी कंपनीचे अधिकृत डिलर, अॅटोमोटीव्ह मॅन्युफॅक्चर्स प्रा.लि., नाशिक यांचेकडूनइंजिन ऑईल,ऑईल फिल्टर, डिझेल फिल्टर, कव्हर क्लच, डिस्क कॉम्प. क्लच, रिंग असेम्बली लो गिअर,ब्रेक पॅड व लायनर इत्यादी बदली करुन ऐनवेळी निघणारी किरकोळ दुरुस्ती करुनघेणेस व याकामी येणा-या खर्चाच्या बिलाची रक्कम रोखीने आदा करणे कामी रु.२०,०००/- (अक्षरी रक्कम रु. विस हजार) मात्रचा अॅडव्हान्स श्री अमृत गंगाधर जगताप,सहाय्यक अभियंता, वाहन विभाग यांचे नांवे घेण्यात आला होता. परंतु प्रत्यक्षातएकुण रक्कम रु.३०,४५१/- (अक्षरी रक्कम रु. तिस हजार चारशे एकावन्न) मात्र खर्च आलेला आहे. सदर खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.नं. | पार्टीचे नांव | बिल नं. / दिनांक | रक्कम (रु.) |
|---|---|---|---|
| ०१ | अॅटोमोटीव्ह मॅन्युफॅक्चर्स प्रा.लि., नाशिक | १५००४३७७-०६/०६/२०१५ | ३०,४५१.०० |
| | | **एकुण रक्कम (रु.)** | **३०,४५१.००** |

उपरोक्त प्रमाणे वाहनाची दुरुस्तीचे काम करुन घेणे कामी एकुण रक्कम रु.३०,४५१/- (अक्षरी रक्कम तिस हजार चारशे एकावन्न) मात्र खर्च आलेला आहे. अॅटोमोटीव्ह मॅन्युफॅक्चर्स प्रा.लि., नाशिक यांना पावती नं.१७७५, दि.०६/०६/२०१५ ने रु.२०,०००/- मात्र रक्कम रोखीने आदा केलेली असून उर्वरीत रक्कम रु. १०,४५१/- मात्र अदा करणे बाकी आहे. सदर खर्च मोटार कार दुरुस्ती खर्च या अंदाजपत्रकातून करता येईल.

**संस्थान अधिनियम/ ठरावानुसार छाननी/ शासन निर्देश तांत्रिक कायदेशिर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान-** आर्थिक खर्चाची बाब आहे.

**मागणी / विभागाचा स्पष्ट अभिप्राय-** उपरोक्त वाहन क्र. एमएच-१७/एजे-१६९१ (स्विफ्ट डिजायर) वाहनांचे दुरुस्ती कामाकरीता आलेल्या एकुण रक्कम रु.३०,४५१/-(अक्षरी रक्कम रु.तीस हजार चारशे एक्कावन्न ) मात्रचे खर्चास कार्येत्तर मान्यता मिळणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावीत वाहन क्र. एमएच-१७/एजे-१६९१ (स्विफ्ट डिजायर) चे दुरुस्ती कामाकरीता आलेल्या एकुण रक्कम रु.३०,४५१/- मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात यावी, अशी उपसमितीची शिफारस आहे.**

(कार्यवाही- प्र. अधिक्षक वाहन विभाग)

---

२२ **तीन वाहनांचे आर.टी.ओ. खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

वाहन विभागाकडील दि.११/०५/२०१५ रोजीचे मंजुर टिपणीनुसार, वाहन विभागाकडील वाहन क्र.एमएच-१७/टी-६८०१ (कचरावाहतुक), बस क्र.एमएच-१७/टी-७१०९ व टी-७११० या तिन वाहनांचे परमिट अपडेट करणे व पर्यावरण कर भरणे तसेच वाहन क्र.एमएच-१७/टी-६८०१ (कचरावाहतुक) या वाहनावरील डेप्युटी आर.टी.ओ., श्रीरामपुर यांचा मेमो भरणे कामी मा.उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, श्रीरामपुर येथे टॅक्सची रक्कम रोखीने भरणे कामी सहाय्यक अभियंता, वाहन विभाग यांचे नांवे रु.३९,३७३/- (अक्षरी रक्कम रु. एकोणचाळीस हजार तिनशे त्याहत्तर) मात्रचा अॅडव्हान्स घेण्यात आला होता. सदर खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.नं. | बस क्रमांक / प्रकार | तपशिल | पावती नं./ दिनांक | रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|
| ०१ | एमएच-१७/टी-६८०१ (कचरावाहतुक) | परमिट अपडेट फी | ५६०११८-२५/०५/२०१५ | ५,३००.०० |
| ०२ | एमएच-१७/टी-७१०९ (नगरसुल बस) | परमिट अपडेट फी | ५६०११७-२५/०५/२०१५ | ५,१००.०० |
| ०३ | एमएच-१७/टी-७११० (नगरसुल बस) | परमिट अपडेट फी | ५६०११९-२५/०५/२०१५ | ४,९००.०० |
| ०४ | एमएच-१७/टी-६८०१ (कचरावाहतुक) | पर्यावरण कर फी | ४५७३१६-२५/०५/२०१५ | ५४९.०० |
| ०५ | एमएच-१७/टी-७१०९ (नगरसुल बस) | पर्यावरण कर फी | ४५७३१७-२५/०५/२०१५ | ८,७६२.०० |
| ०६ | एमएच-१७/टी-७११० (नगरसुल बस) | पर्यावरण कर फी | ४५७३१८-२५/०५/२०१५ | ८,७६२.०० |
| ०७ | एमएच-१७/टी-६८०१ (कचरावाहतुक) | मेमो फी | ५६०१४२-२५/०५/२०१५ | ५,२००.०० |
| | | | **एकुण रक्कम (रु.)** | **३८,५७३.००** |

उपरोक्त प्रमाणे ०३ वाहनांचे परमिट अपडेट फी व पर्यावरण कर फी तसेच कचरावाहतुक वाहनाचे मेमो फी भरणे कामी रु.३८,५७३/- (अक्षरी रक्कम रु. अडोतीस हजार पाचशे त्र्याहत्तर) मात्र खर्च झालेली असुन शिल्लक रक्कम रु.८००/- मात्र लेखाशाखा पावती नं.२३७,दि.२७/०५/२०१५ ने जमा केलेली आहे.

तरी वरील प्रमाणे तिन वाहनांचे परमिट अपडेट फी व पर्यावरण कर फी तसेच कचरावाहतुक वाहनाचा मेमो फी भरणे कामी रु.३८,५७३/- (अक्षरी रक्कम रु. अडोतीस हजार पाचशे त्र्याहत्तर) मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावित तिन वाहनांचे परमिट अपडेट फी व पर्यावरण कर फी तसेच कचरावाहतुक वाहनाचा मेमो फी भरणेकामी आलेल्या रु.३८,५७३/- मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस आहे.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

२३ **पाच वाहनांचे आर.टी.ओ. खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

वाहन विभागाकडील दि.२७/०५/२०१५ रोजीचे मंजुर टिपणीनुसार, आयशर कंपनीच्या प्रवासी बस क्र.एमएच-१७/एजी-९७४७, एमएच-१७/एजी-९७४८, एमएच-१७/एजी-९७४९, एमएच-१७/एजी-९७५०, एमएच-१७/एजी-९७५१ या पाच बसेसचा वापर श्री साईबाबा भक्तनिवासस्थान व साईआश्रम येथील निवास करणा-या साईभक्तांना मंदीर परिसर व प्रसादालय येथे ने-आण करणे कामी होत आहे. सदर बसेसचा दि.३०/०६/२०१५ रोजी टॅक्सची मुदत संपुष्टात येत येत असलेने मा. उप प्रादेशिक परिवहन अधिकार, श्रीरामपुर यांचे नांवे स्टेट बँक ऑफ इंडीया शाखा-शिर्डीचा डी.डी.नं. ७०५३६६ दि.०९/०६/२०१५ ने अॅडव्हान्स रक्कम रु. १,५५,०००/- घेण्यात आला होता. सदर खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.नं. | बस क्रमांक / प्रकार | तपशिल | पावती नं./ दिनांक | रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|
| ०१ | एमएच-१७/एजी-९७४७ (प्रवाशी बस) | टॅक्स फी | ४०४२६०-२४/०६/२०१५ | ३१,०००.०० |
| ०२ | एमएच-१७/एजी-९७४८ (प्रवाशी बस) | टॅक्स फी | ४०४२६१-२४/०६/२०१५ | ३१,०००.०० |
| ०३ | एमएच-१७/एजी-९७४९ (प्रवाशी बस) | टॅक्स फी | ४०४२६२-२४/०६/२०१५ | ३१,०००.०० |
| ०४ | एमएच-१७/एजी-९७५० (प्रवाशी बस) | टॅक्स फी | ४०४२६३-२४/०६/२०१५ | ३१,०००.०० |
| ०५ | एमएच-१७/एजी-९७५१ (प्रवाशी बस) | टॅक्स फी | ४०४२६४-२४/०६/२०१५ | ३१,०००.०० |
| | **एकुण रक्कम (रु.)** | | | **१,५५,०००.००** |

उपरोक्त प्रमाणे ०५ प्रवासी बसेस वाहनांचा दि.०१/०७/२०१५ ते दि.३०/०६/२०१६ अखेर वार्षिक टॅक्स भरणे कामी रु.१,५५,०००/- (अक्षरी रक्कम रु. एक लाख पंच्चावन्न हजार) मात्र खर्च झालेली आहे. सदर खर्च मोटारकार कर व भाडे खर्चा या अंदाजपत्रकातुन करता येईल.

तरी वरील प्रमाणे ०५ प्रवासी बसेस वाहनांचा दि.०१/०७/२०१५ ते दि.३०/०६/२०१६ अखेर वार्षिक टॅक्स भरणे कामी झालेल्या रु.१,५५,०००/- (अक्षरी रक्कम रु. एक लाख पंच्चावन्न हजार) मात्र खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावीत ०५ प्रवासी बसेस वाहनांचा दि.०१/०७/२०१५ ते दि.३०/०६/२०१६ अखेर वार्षिक टॅक्स भरणेकामी झालेल्या रु.१,५५,०००/- मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात यावी, अशी उपसमितीची शिफारस आहे.** (कार्यवाही- प्र. अधिक्षक,वाहन विभाग)

---

२४ **बॅटरी ऑपरेटेड कार्सचे दुरुस्ती कामांबाबत.**

विद्युत विभागामार्फत दि.०३/०९/२०१२ रोजी ०४ नग बॅटरी ऑपरेटेड कार मे. मैनी मटेरीअल्स मुव्हमेंट प्रा.लि., बैंगलोर यांचेकडून खरेदी करण्यात आलेल्या आहे. सदर बॅटरी ऑपरेटेड कारचा माहे एप्रिल-२०१३ पासुन "साईआश्रम निवासस्थान" मध्ये निवास करणा-या वृध्द व अपंग साईभक्तांना इमारतींपर्यंत (बुकिंग काऊंटर ते रुम पर्यंत) पोहोचविणे कामी चालु आहे.

चारही बॅटरी कार्सचे सततच्या वापराने स्पेअरपार्ट खराब होवुन नादुरुस्त झालेली आहेत. सदरचे स्पेअरपार्ट स्थानिक मार्केटमध्ये उपलब्ध होत नसल्याने संदर्भ क्र.०१ चे टिपणीनुसार बॅटरी ऑपरेटेड कार उत्पादक कंपनी मे. मैनी मटेरीअल्स मुव्हमेंट प्रा.लि., बैंगलोर यांचे सर्व्हिस टेक्निशियन बोलाविणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार संदर्भ क्र.०२ चे पत्राने, मे.मैनी मटेरीअल्स मुव्हमेंट प्रा.लि., बैंगलोर कंपनीचे सर्व्हीस टेक्नीशियन यांना बोलाविण्यात आले होते.

दि.१७/०६/२०१५ रोजी मे.मैनी मटेरीअल्स मुव्हमेंट प्रा.लि.,बैंगलोर यांचे सर्व्हिस इंजिनीअर, श्री विकास भगत यांनी वाहन विभागात येवुन दोन बॅटरी कार्सची दुरुस्ती करुन दिलेले आहे तसेच उर्वरीत दोन बॅटरी कार्सचे दुरुस्ती कामाकरीता लागणारे स्पेअर पार्टचे रु.९५,८८१/- मात्र खर्चाचे कोटेशन संदर्भ क्र.०४ चे ई-मेल पत्राद्वारे कळविलेले आहे.

तरी बॅटरी ऑपरेटेड कार्स करीता लागणारे स्पेअरपार्ट उत्पादक पुरवठादार कंपनी मे.मैनी मटेरीअल्स मुव्हमेंट प्रा.लि.,बैंगलोर यांचेकडून खरेदी करुन त्यांचे सर्व्हिस इंजिनिअर व्हिजीट चार्जेसह दुरुस्तीचे काम करुन घेणेस व या कामी येणा-या एकुण अंदाजे रु.१,१०,०००/- (अक्षरी रक्कम रु. एक लाख दहा हजार) पर्यंतचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त बॅटरी ऑपरेटेड कार्स दुरुस्तीचे प्रस्तावास व त्याकामी येणा-या अंदाजे रु.१,१०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस आहे.**

(कार्यवाही- प्र. अधिक्षक, वाहन विभाग)

---

२५ **श्री गुरुपौर्णिमा उत्सव- २०१५ किर्तनकार व कलाकार निश्चित करणे, बिदागी निश्चित करणेबाबत.**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी तर्फे श्री गरुपौर्णिमा उत्सव- २०१५ गुरुवार, दि. ३०/०७/२०१५ ते शनिवार दि.०१/०८/२०१५ असा तीन दिवस साजरा होणार आहे.

**अ) कीर्तन कार्यक्रम –**

उत्सवात ०३ दिवस नारदीय पध्दतीने कीर्तन कार्यक्रम होतात. मागील श्री रामनवमी उत्सवात ०३ दिवसाचे कीर्तनासाठी रु.९००१/- बिदागी देण्यात आलेली होती. त्याचप्रमाणे श्री गुरुपौर्णिमा उत्सवासाठी रु.९००१/- मात्र रक्कम कीर्तनकारास बिदागी म्हणून देता येईल. श्री गुरुपौर्णिमा उत्सवासाठी खालील कीर्तनकारांनी कीर्तन कार्यक्रम मिळावा म्हणून संस्थानकडे अर्ज केलेले आहेत.

| अ.नं. | कीर्तनकारांचे नाव |
|---|---|
| ०१ | वे.शा. सं. ह. भ. प. बबनशास्त्री चिपळूनकर<br>होडी बंगला,राधाकृष्ण निवास , रुम नं ८ , नवीन आयरे रोड, दिवा वसई रोड, बोगद्याजवळ, कोपर रेल्वे स्टेशन ( पूर्व) पासून जवळ,<br>डोंबिवली ( पुर्व) ता. कल्याण जि , ठाणे |
| ०२ | ह. भ. प. माधवराव तुकारामपंत आजेगांवकर<br>श्री केशव कृपा,कौस्तुभ कार्यालय, श्री संत दासगणु नगर, कारेगांव रोड, परभणी |
| ०३ | कीर्तनालंकार ह. भ. प. गंगाधर नरहर व्यास<br>श्रीपाद दर्शन नं ०१, आयरे रोड, लक्ष्मण रेषा समोर डोंबिवली ( पुर्व)<br>ता. कल्याण जि , ठाणे |
| ०४ | ह. भ. प. मंदार गंगाधर व्यास<br>श्रीपाद दर्शन नं ०१, आयरे रोड, लक्ष्मण रेषा समोर डोंबिवली ( पुर्व)<br>ता. कल्याण जि. ठाणे |

दिनांक ११.०९.२०१४ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र.७५५" श्रींच्या वर्षातील तीनही उत्सवा करिता किर्तनकारांचे पॅनल तयार करण्यात यावे. त्यामध्ये श्री रामनवमी उत्सवाकरिता सालाबादाप्रमाणे श्रीमद सदगुरु श्री दासगणू महाराज प्रतिष्ठाण, गोरटे, ता. उमरी, जि. नांदेड यांचे प्रतिनिधी यांना , श्री गुरुपौर्णिमा उत्सवा करिता ह.भ.प. माधवराव तुकाराम पंत आजेगांवकर यांना तसेच ह.भ.प. गंगाधर नरहर व्यासबुआ अथवा ह.भ.प. मंदार गंगाधर व्यास यांना श्री पुण्यतिथी उत्सव (दसरा) करीता कायमस्वरुपी पॅनलवर ठेवण्यात यावे. श्री पुण्यतिथी उत्सव (दसरा) करीता जर दोन्ही किर्तनकार उपलब्ध नसतील तर ज्या कीर्तनकारांचे अर्ज येतील त्या मधील कीर्तनकारांची निवड करण्यात यावी." असे ठरले आहे.

**ब) कलाकार कार्यक्रम–**

श्री गुरुपौर्णिमा उत्सव -२०१५ मध्ये धार्मिक/ सांस्कृतिक कार्यक्रम करणेसाठी इच्छुक असणा-या कलाकारांनी संस्थानकडे अर्ज केलेले आहेत. त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.नं. | कलाकारांचे नाव | कार्यक्रम | कलाकार संख्या | मानधन |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री.विजय साखरकर,<br>दत्त निवास चाळ नं २ /१०, देविपाडा, मच्छी मार्केट समोर , बोरीवली (पुर्व) मंबई -६६<br>९८२१३९३३२३ | साई स्वर संध्या हिंदी– मराठी साई गितांचा कार्यक्रम | ४० | विनामुल्य |
| ०२ | श्री रेणुका कला मंच , ठाणे<br>व्दारा सौ. रेखा शरद बेलपाठक , ३०३ अे श्री दत्त टॉवर्स, साईकृपा हॉटेल जवळ, डॉ मुस रोड, तलाव पाळी, ठाणे ( प)<br>९९२०८०३९०५ | भजनी भारुड | ०९ | विनामुल्य |
| ०३ | श्री. सुमित पोदा ,<br>साई निलायम , एच सी ५० , लेक हयू, एन. आर. आय कॉलीनी, कोह- इ- फिजा भोपाळ. ०९२२९२९९९८९ | श्री साई अमृत कथा | १३ | विनामुल्य |
| ०४ | श्री विश्वनाथ ओझा,<br>बेलापूर रोड श्रीरामपूर, जि-अहमदनगर<br>९४२२२२६२११ | साई मिलन की आस | ०५ | विनामुल्य |
| ०५ | वनिता बजाज,<br>जी. एच-०८ - १३६ ,पश्चिम विहार , मीरा बाग , दिल्ली -८७<br>९२८९२७६९०० | साई भजन | ०६ | विनामुल्य |

| अ.नं. | कलाकारांचे नाव | कार्यक्रम | कलाकार संख्या | मानधन |
|---|---|---|---|---|
| ०६ | व्ही नौशामी , मलेशिया ( साई सेवा गृप) | एक शाम साईके नाम | ८ ते १० | विनामुल्य |
| ०७ | तिरुव्हील्वामाला गोपी , तामिला आट्रिस्ट, केरला मो.नं. ९७६३४८९१६, | पंच वादयम संगीत कार्यक्रम | २० | विनामुल्य |
| ०८ | पुनम खन्ना , दिल्ली ९८१००३४८७२ | साई भजन | ०६ | विनामुल्य |
| ०९ | उस्ताद शहिद परवेझ संगीत गुरुकुल, नाशिक, ७/७८८, पुजा को- ऑप हौ. सोसायटी, उमा-महेश्वर लेन, रविवार पेठ, नाशिक ९४२२२७८३०९ | समुह सतार वादन | ०९ | रु.२००००/- |
| १० | कलाविष्कार कलापथक, ठाणे विनोद नाखवा, बी-५/२३, रुनवाल नगर ठाणे – ९८२०७८४८४२ | मी मुंबईचा हाय कोळी | २२ | रु.१६०००/- प्रवास भाडे |
| ११ | श्री पंढरीनाथ रावजी जाधव ५, सिध्देश्वर प्लाझा अपाईमेंट , पाटील नगर , नविन सिडको , नाशिक मो.नं.९४२१५१ १५७१ | साई भजन /अभंग सेवा | ८ ते १० | पत्रात मानधनाचा उल्लेख नाही./ विनामुल्य |
| १२ | पं. ह.भ.प.देवरावजी कुळमेथे महाराज, भोर मळा, संभाजीनगर ट्रॅक्शन गेट समोर एकलहरा रोड, नाशिक रोड जि- नाशिक ९२२५७३८६५० | संगीतमय श्री साईसचरित महिमा गुणगाण कार्यक्रम | ५ ते ६ | पत्रात मानधनाचा उल्लेख नाही./ विनामुल्य |
| १३ | श्रध्दा भक्ती कल्याण संस्थान,भोपाळ शिर्डी कार्यालया- श्रध्दा भक्ती इन, छत्रपती नगर,शिर्डी ता. राहता, जि- अ.नगर ०८८८९५१३५२९ | साईभजन | ८ ते १० | पत्रात मानधनाचा उल्लेख नाही./ विनामुल्य |
| १४ | श्री साई दरबार आर्केस्टा, हुबळी श्री दत्तसाई मोबाईल्स, शॉप नं ४६ , बालाजी हॉटेलच्या मागे, हर्षा कॉम्लेक्स, स्टेशन रोड, हुबळी -२० ९५३८२४३९९९ | एक शाम साई के नाम | ०९ | पत्रात मानधनाचा उल्लेख नाही./ विनामुल्य |
| १५ | सुनिता टिकारे, मुंबई ९८६७८१२७४२ | भक्तीसंध्या | ८ ते १० | पत्रात मानधनाचा उल्लेख नाही./ विनामुल्य |

अ.नं.१ ते ८ कलाकारांनी कार्यक्रम विनामुल्य करणेबाबत कळविलेले आहे., अ.क्र ०९ यांनी रु. २००००/- मानधन, अ.क्र १० यांनी रु.१६०००/- प्रवासी भाडे मागणी केलेले आहे. अ.नं.११ ते १५ कलाकारांनी आपल्या पत्रात मानधनाचा उल्लेख केलेला नाही. त्यांचेशी दुरध्वनी वरुन संपर्क साधला असता सदरचे कलाकार विनामुल्य सेवा करण्यास तयार आहे. श्री गुरुपौर्णिमा उत्सव ३ दिवसाचा असल्याने प्रत्येक दिवशी ०२ कार्यक्रम आयोजित करता येतील. किंवा किमान दररोज एक कार्यक्रम आयोजीत करणे आवश्यक आहे. श्री गुरुपौर्णिमा- २०१४ निमित्ताने अ.क्र ०१ , ०३ व ०४ यांचे कार्यक्रम सादर झालेले आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.त्रीसदस्य समितीचे दिनांक ११.०९.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७५५ मध्ये ठरलेनुसार श्री गुरुपौर्णिमा उत्सवामध्ये गुरुवार, दि. ३०/०७/२०१५ ते शनिवार दि.०१/०८/२०१५ असे तीन दिवस ह.भ.प. माधवराव तुकाराम पंत आजेगांवकर यांना किर्तनकार म्हणून बोलविणेत यावे व त्यांना तीन दिवसाच्या किर्तनाची रु.९००१/- मात्र बिदागी देण्यात यावी.**

**तसेच सदर उत्सवामधील संस्थान आयोजित कार्यक्रमासाठी विनामुल्य सेवा सादर करणा-या व परिसरातील कलाकारांना प्राधान्य देण्यात येते. त्यानुसार उपरोक्त कलाकारांच्या तक्त्यातील विनामुल्य सेवा करणारे व यापुर्वी संस्थानमध्ये कार्यक्रम सादर केलेला नाही, असे अ.नं.२,३,५,६,७,११,१२,१३ व १४ या कलाकारांना दिवस व वेळ कळविणेत येऊन, त्यांचे कार्यक्रम सादर करणेत परवानगी देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस आहे.**

(कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५)

---

२६ **जादा वैद्यकिय बीलाचा परतावा अदा करणेस मंजुरी मिळणेबाबत.**

(अ) **व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. –** १) जा. नं. एसएसएस-वशी रुग्णालय ५८२-९७ दि. १६/०१/१९९९. २) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०८/०२/२००९ निर्णय क्र. ७५ अन्वये रु. १०,०००/- पर्यंत मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

**प्रास्ताविक –** खालील संस्थान कर्मचा-यांची रु. १०,०००/- पर्यंतची खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु. १०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहेत.

**मागणी –**

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **अ. संस्थानचे श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात उपचार घेतलेले** | | | | | | | |
| १ | बकरे सतिष गंगाधर<br>विभाग – बांधकाम<br>हुद्दा – वरीष्ठ लिपिक | पत्नी | Arthritis / blood pressure | डॉ. जपे / डॉ. मेहरोत्रा | श्री साईबाबा हॉस्पिटल | 22719.00 | 10220.00 | |
| २ | काद्री शबाना<br>विभाग – साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा – परिचारीका | पती / स्वतः | Jaundice / hepatitis | डॉ. इंगळे | श्री साईबाबा हॉस्पिटल | 6755.00 | 6755.00 | |
| ३ | कल्पना रघूनाथ मूसमाडे<br>विभाग – साईनाथ हॉस्पिटल<br>हुद्दा – परिचारीका | वडील / मुलगी | Blood Pressure & Dermatologaist Treatment | डॉ. पोरवाल / डॉ. शेळके | श्री साईनाथ हॉस्पिटल | 456.00 | 456.00 | |
| ४ | रविंद्र बाळासाहेब नवले<br>विभाग- कामगार विभाग<br>हुद्दा – कामगार अधिकारी | स्वतः | Cardiac Treatment | CMO Casualty | श्री साईबाबा हॉस्पिटल | 773.00 | 773.00 | |
| ५ | दिपक सुर्यकांत लोखंडे<br>विभाग – लेखाशाखा<br>हुद्दा – लिपिक | आई | Blood Pressure with Diabeties | डॉ. मेहरोत्रा | श्री साईबाबा हॉस्पिटल | 2528.00 | 2282.00 | |
| ६ | सतिष गोविंद कासार विभाग – सभा कामकाज<br>हुद्दा – लिपिक | स्वतः | Diabeties | डॉ. मेहरोत्रा | श्री साईबाबा हॉस्पिटल | 1980.00 | 1980.00 | |
| ७ | स्वाती इंद्रभान कडू विभाग – ज्यू.कॉलेज<br>हुद्दा – सहा शिक्षिका | पती | Diabeties | डॉ. मेहरोत्रा | श्री साईबाबा हॉस्पिटल | 1637.00 | 1232.00 | |
| ८ | तांबे अंजली बाळासाहेब<br>विभाग – साईबाबा हॉस्पि.<br>हुद्दा – लॅब टेक्निशियन | सासू / पती / मुलगा | Blood Pressure with Diabeties | डॉ. मेहरोत्रा / डॉ. इंगळे | श्री साईबाबा हॉस्पिटल | 2403.00 | 2403.00 | |
| ९ | राजेश रमणलाल वाकडे<br>विभाग – साईबाबा हॉस्पि.<br>हुद्दा – सि. बायोमेडीकल इंजिनिअर | आई | Blood Pressure with Diabeties | डॉ. इंगळे | श्री साईबाबा हॉस्पिटल | 615.00 | 615.00 | |
| १० | श्री. लुटे चंद्रकांत धोंडिराम<br>विभाग – रक्तपेढी<br>हुद्दा – तंत्रज्ञ | वडील | Blood Pressure with Diabeties | डॉ. मेहरोत्रा | श्री साईबाबा हॉस्पिटल | 1324.00 | 1054.00 | |
| ११ | प्रसाद मुरलीधर सोनवणे<br>विभाग– आय टी आय<br>हुद्दा– शिपाई | आई | Ortho Surgery | डॉ. वर्पे | श्री साईनाथ हॉस्पिटल | 9059.00 | 9059.00 | |
| १२ | चव्हाण भानुदास बजरंग<br>विभाग– साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा – वॉडबॉय | पत्नी | Arthiritis | डॉ. खुराणा | श्री साईबाबा हॉस्पिटल | 125.00 | 125.00 | |
| १३ | रावस निलेश बाळकृष्ण<br>विभाग – साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा – परिचारक | वडील / आई | Blood Pressure / Arthritis | डॉ. शिंदे / डॉ. खुराणा | श्री साईबाबा हॉस्पिटल | 2198.00 | 2681.00 | |
| १४ | बकरे मनोज सतिष<br>विभाग – क. महा विद्या.<br>हुद्दा.– मदतनीस | आई | Opthal Treatment | डॉ. सोनटक्के | श्री साईनाथ हॉस्पिटल | 228.00 | 228.00 | |

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १५ | अशोक नामदेव झुंगे<br>विभाग- भांडार<br>हुद्दा – अधिक्षक | स्वत: | Blood Pressure & Dermatologaist Treatment | डॉ. कांबळे | श्री साईनाथ हॉस्पिटल | 536.00 | 536.00 | |
| १६ | रमेश बाबूराव कोते<br>विभाग – साईप्रसाद<br>हुद्दा – मदतनीस | स्वतः | Diabeties | डॉ. पोरवाल | श्री साईनाथ हॉस्पिटल | 603.00 | 592.00 | |
| १७ | वर्पे सविता चांगदेव<br>विभाग – साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा – परिचारका | आई | Diabeties | डॉ. इंगळे | श्री साईबाबा हॉस्पिटल | 3904.00 | 3904.00 | |
| | | | | | एकूण | 57843.00 | 44895.00 | |
| | **ब – संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये रेफर केले होते** | | | | | | | |
| १८ | सदाफळ राजेंद्र सोपान<br>विभाग – प्रसादालय<br>हुद्दा – मदतनीस | स्वत: | Leuakamia Blood Ca | डॉ. मेहरोत्रा | दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल, पुणे | 185163.00 | 178443.00 | |
| १९ | जगन्नाथ देवराम डांगे<br>विभाग – साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा – डायलेसीस तंत्रज्ञ | स्वत: | Tumour / Ca | डॉ. कुलकर्णी | टाटा मेमोरीयल हॉस्पि. , मुंबई | 22224.00 | 19424.00 | |
| २० | मोहन बबन शिरसाठ<br>विभाग – कॅन्टीन<br>हुद्दा – मदतनीस | स्वत: | Nephritis / Renal Failure | डॉ. मेहरोत्रा | सहयाद्री हॉस्पिटल, नाशिक (लाईफ लाईन हॉस्पिटल नावात बदल) | 63626.00 | 58946.00 | |
| २१ | डॉ. शुभा मेहरोत्रा<br>विभाग – साईबाबा हॉस्पिटल, हुद्दा – डॉक्टर | आई | Ca Breast | डॉ. देवरे | रुबी हॉल क्लिनिक, पुणे | 124478.00 | 114338.00 | |
| २२ | पठाण नसरुल्ला नुरखॉं<br>विभाग – साईबाबा हॉस्पिटल, हुद्दा – लिपिक | पत्नी | Inflammatary Bowel Disease | डॉ. मेहरोत्रा | रुबी हॉल क्लिनिक, पुणे | 2500.00 | 2500.00 | |
| २३ | श्री. सतिश रामभाऊ खरात<br>विभाग – प्रशासन<br>हुद्दा – लिपीक टंकलेखक | मुलगी | Thrombocytopenia | डॉ. रचना साबळे | केईएम हॉस्पिटल, मुंबई | 69439.00 | 69439.00 | |
| | | | | | एकूण | 467430.00 | 443090.00 | |
| | **क - संस्थानचे मान्य यादीत नसलेले व रेफर न केलेले हॉस्पिटल** | | | | | | | |
| २४ | सुनील सखाराम तांबे<br>विभाग – आय टी आय<br>हुद्दा – निर्देशक | वडील व आई | Paralysis | डॉ. आदित्य महामनकर | आदित्य नर्सिंग होम, महाड | 19816.00 | 11671.00 | रुग्णाचे वास्तव्य महाड येथे आहे. |
| २५ | डॉ. कौशिक हाजीभाई मकवाना<br>विभाग – श्री साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा – वैद्यकिय प्रशासक | आई | Eye Operation | | मधुहिष्टी आय हॉस्पिटल, कच्छ | 33149.00 | 26311.00 | सदर रुग्णाचे वास्तव्य कच्छ / भुज येथे आहे. |
| २६ | रामचंद्र बाबू दर्गे<br>विभाग – मुंबई कार्यालय<br>हुद्दा – प्र. कार्यालय अधिक्षक | पत्नी | Diabeties | डॉ. आनंद अबासणे | तिरुपती मेडिकल सेंटर मुंबई | 18111.00 | 3061.00 | मुंबई कार्यालय |
| २७ | किशोर केशव क्षिरसागर<br>विभाग – मुंबई कार्यालय<br>हुद्दा – लिपीक टंकलेखक | पत्नी | Ca | डॉ. निर्मल राऊत | एशियन इन्स्टिट्यूटऑफ मेडीकल सायन्स | 20413.00 | 2802.00 | मुंबई कार्यालय |
| २८ | राधाकृष्णन पी.<br>विभाग – मुंबई कार्यालय<br>हुद्दा – वरीष्ठ लिपिक | स्वतः | Operation / surgery | डॉ. समीर कुमठा | सुश्रुषा सिटिझन्स को. ऑपरेटिव्ह हॉस्पिटल, मुंबई | 45201.00 | 35585.00 | मुंबई कार्यालय |
| | | | | | एकूण | 136690.00 | 79430.00 | |
| | | | | | अ + ब +क एकूण | 661963.00 | 567415.00 | |

**संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान–** सदर बिलांची संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली असून देय होणारी एकूण रक्कम रु.**567415**/- इतकी आहे.

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत–** नियमावली प्रमाणे छाननी केली असुन मा. उप समितीचे पुर्वमान्यता घेऊन समितिने मान्य केलेली देय होणारी रक्कम अदा करणेस हरकत नाही, असे मत आहे.

---

(ब) **व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. –** १) जा. नं. एसएसएस-वशी रुग्णालय ५८२-९७ दि. १६/०१/१९९९.

२) मा. व्यवस्थापन समिति सभा दि. ०८/०२/२००९ निर्णय क्र. ७५ अन्वये रु. १०,०००/- पर्यंत मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

**प्रास्ताविक –** खालील संस्थान कर्मचा-यांची रु. १०,०००/- पर्यंतची खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु. १०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहेत.

**मागणी–**

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **अ. संस्थानचे श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात उपचार घेतलेले** | | | | | | | |
| १ | श्री. यादव माधव कोते<br>विभाग- पाहेरकरी<br>हुद्दा- संरक्षण | आई | Multiintarat Stroke with encephalopathy accelerated with HTN | डॉ. भागवत | श्री साईबाबा हॉस्पिटल | 13505.00 | 12285.00 | |
| २ | श्री. सुचिता राजीव मुठाळ<br>विभाग- साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा- सिस्टर इंन्चार्ज | पती / मुली | Opthal Treatment | डॉ. सोनटक्के | श्री साईनाथ हॉस्पिटल | 235.00 | 235.00 | |
| ३ | श्री. रवि श्रावण चौधरी<br>विभाग- वहान विभाग<br>हुद्दा- ड्रायव्हर | आई / वडील | Blood Presure /Diabetes | डॉ.इंगळे | श्री साईबाबा हॉस्पिटल | 5435.00 | 2048.00 | |
| ४ | डॉ. अनिल विठठलराव घरटे<br>विभाग- साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा – सी.एम.ओ. | आई / पत्नी / मुलगा | Blood Presure | सी.एम.ओ. | श्री साईबाबा हॉस्पिटल | 3040.00 | 3040.00 | |
| ५ | पी.के. शेकडे<br>विभाग- श्री साईनाथ रुग्णालय<br>हुद्दा – अधिक्षक | वडील / स्वत: | Blood pressure | डॉ. पोरवाल | श्री साईनाथ हॉस्पिटल | 982.00 | 982.00 | |
| ६ | श्री प्रदीप वि. त्रिभूवन<br>विभाग- रुग्णालय<br>हुद्दा – मदतनीस | पत्नी | Dermatologist Treatment | डॉ. कांबळे | श्री साईनाथ हॉस्पिटल | 1114.00 | 1114.00 | |
| ७ | कल्पना रघूनाथ मूसमाडे<br>विभाग -साईनाथ हॉस्पिटल<br>हुद्दा – परिचारीका | स्वत: | Opthal & Orthopedic Treatment | डॉ. सोनटक्के / डॉ. वर्पे | श्री साईनाथ हॉस्पिटल | 742.00 | 742.00 | |
| ८ | अशोक नामदेव झुरंगे<br>विभाग- भांडार<br>हुद्दा – अधिक्षक | स्वत: | Blood Pressure | डॉ. पोरवाल / डॉ. कांबळे | श्री साईनाथ हॉस्पिटल | 467.00 | 420.00 | |
| ९ | डॉ. मेहेरे मंगेश नंदकुमार<br>विभाग-साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा – आर.एम.ओ. | आई | Arthritis treatment | डॉ. इंगळे | श्री साईबाबा हॉस्पिटल | 1903.00 | 1711.00 | |
| १० | बकरे दिलीप गंगाधर<br>विभाग – सा.प्र. निवास<br>हुद्दा – अधिक्षक | स्वत: | Heart Attack | डॉ. मेहरोत्रा | श्री साईबाबा हॉस्पिटल | 34500.00 | 34500.00 | |
| ११ | श्री.सुकदेव शंकर बारहाते<br>विभाग- पाणीपुरवठा<br>हुद्दा- तारतंत्री | वडील / स्वत: | Asthama with Diabetes | डॉ. पोरवाल / डॉ.इंगळे | श्री साईबाबा हॉस्पिटल/साईनाथ हॉस्पिटल | 483.00 | 483.00 | |
| १२ | बंदावणे सुभाष मल्हारी<br>विभाग- ध्वनीक्षेपन<br>हुद्दा – विदयुत पर्यवेक्षक | मुलगा | Renal treatment | डॉ. वाघुळदे | श्री साईबाबा हॉस्पिटल | 10025.00 | 10025.00 | |

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १३ | राजेश रमणलाल वाकडे विभाग-साईबाबा हॉस्पिटल हुद्दा – सि. बायोमेडीकल इंजिनिअर | आई | Arthritis | डॉ. इंगळे | श्री साईबाबा हॉस्पिटल | 615.00 | 615.00 | |
| १४ | बकरे सतिष गंगाधर विभाग – बांधकाम हुद्दा – वरीष्ठ लिपिक | पत्नी / स्वतः | Arthritis / blood pressure / Diabetes | डॉ. गोरे / डॉ. मेहरोत्रा | श्री साईबाबा हॉस्पिटल | 5992.00 | 5658.00 | |
| | | | | | **एकूण** | **79038.00** | **73858.00** | |
| | **ब – संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये रेफर केले होते** | | | | | | | |
| १५ | डॉ. शिंदे वैभव सुभाष विभाग-साईबाबा हॉस्पिटल हुद्दा – आर.एम.ओ. | मुलगी | Penoscrotal Hypospadiasis | डॉ. गोरे | केईएम हॉस्पिटल, मुंबई | 79141.00 | 59521.00 | |
| १६ | श्री. सतिश रामभाऊ खरात विभाग – प्रशासन हुद्दा – लिपीक टंकलेखक | मुलगी | Thrombocytopenia | डॉ. रचना साबळे | केईएम हॉस्पिटल, मुंबई | 25598.00 | 25598.00 | |
| १७ | मोहन बबन शिरसाठ विभाग – कॅन्टीन हुद्दा – मदतनीस | स्वत: | Renal Failure | डॉ. मेहरोत्रा | सहयाद्री हॉस्पिटल, नाशिक (लाईफ लाईन हॉस्पिटल नावात बदल) | 262774.00 | 260824.00 | |
| १८ | बकरे दिलीप गंगाधर विभाग – प्र. अधिक्षक हुद्दा – सा.प्र. निवास | स्वत: | CVA | डॉ. मेहरोत्रा | रुबी हॉल क्लिनीक, पुणे | 12932.00 | 12932.00 | |
| | | | | | **एकूण** | 380445.00 | 358875.00 | |
| | | | | | **अ + ब एकूण** | **459483.00** | **432733.00** | |

**<u>संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान –</u>** सदर बिलांची संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली असून देय होणारी एकूण रक्कम रु.**432733**/- इतकी आहे.

**<u>विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–</u>** नियमावली प्रमाणे छाननी केली असुन मा. उप समितीची पुर्वमान्यता घेऊन समितीने मान्य केलेली देय होणारी रक्कम अदा करणेस सविनय सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त अ व ब प्रस्तावामध्ये नमुद केलेप्रमाणे संस्थान कायम कर्मचा-यांच्या नावासमोरील देय असलेली रक्कम त्यांना अदा करणेस मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस आहे.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

२७ **प्रिंटर्स व यु.पी.एस. खरेदी करणेबाबत.**

श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये रुग्णांना अति जलद सुविधा देणेकामी संगणक व संगणकीय साहीत्याची आवश्यकता आहे .त्यानुसार हॉस्पिटल सुरु होण्या अगोदर संगणक व संगकीय साहीत्य खरेदी करण्यात आलेले होते . चे दुरुस्तीवर्षांचा होता तद्नंतर वेळोवेळी संगणक व संगणकीय साहीत्या ३ सदर संगणकांचा वॉरंटी कालावधी हा केवळ .त आलेली आहेव देखभाल करण्यापरंतु सदर संगणक व संगणकीय साहीत्यास आज १० वर्ष पुर्ण होत आलेले आहेत. पुर्वी खरेदी करण्योत आलेल्या संगणकीय साहीत्यापैकी बरेचशे संगणकीय साहीत्य नादुस्त झाले असल्याने नवीन संगणकीय साहीत्य खरेदी करणे आवश्यक आहे

सध्या श्री साईबाबा हॉस्पिटलकरिता खालीलप्रमाणे संगणकीय साहीत्याची आवश्यकता आहे .

| Sr. No. | Make Model | Nos |
|---|---|---|
| 01 | Dot Matrix Printer | 05 |
| 02 | Laser Jet Printer 1020 | 05 |
| 03 | U.P.S. 600 V | 40 |
| 04 | 24 port mangeble switch | 05 |

याबाबत विविध नामांकीत कंपन्याच्या संकेत स्थळावर तसेच स्थानिक विक्रेत्यांकडे चौकशी केली असता उपरोक्त संगणकीय साहीत्य खरेदी करणेकामी अंदाजे रक्कम रु२ .,९०,०००अक्षरी रुपये दोन लाख) -/ नव्वद हजार ( .चे समजतेमात्र खर्च अपेक्षित असल्या

तरी उपरोक्त संगणकीय साहीत्य विहीत पध्दतीने खरेदी करणेकामी सदरचा प्रस्ताव मा उप समितीचे .सभेमध्ये चर्चा होऊन निर्णय होणेस्तव सविनय सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावामध्ये नमूद केलेप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटलकरीता आवश्यक असलेले प्रिंटर्स व यु.पी.एस. खरेदीकामी विहित पध्दतीने निविदांची मागणी करणेस तसेच त्याकामी येणा-या अंदाजे रु.२,९०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस आहे.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

२८ **श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभागाकरिता 10 KVA यु.पी.एस. खरेदीबाबत.**

**प्रास्ताविक** – श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभागाने दि. ०७/०४/२०१५ रोजीचे मागणीपत्रान्वये एक नग १० KVA यु.पी.एस ची मागणी केलेली आहे. कारण त्यांचेकडे सध्या वापरत असलेला यु.पी.एस हा वापरुन खराब झालेला आहे व तो दुरुस्ती साठी लागणारे स्पेअर पार्ट उपलब्ध नाहीत त्यामुळे त्यांनी नविन यु.पी.एस ची मागणी केलेली आहे.

याकामी M/s. Microtronics, Aurangabad यांचेकडून दुरध्वनीवरुन दरपत्रक मागविण्यात आले होते त्यानुसार M/s. Microtronics, Aurangabad यांनी दि.२२/०५/२०१५ चे ई मेल पत्रान्वये १० KVA यु.पी.एस चे दर कळविलेले आहे, त्याचा तपशील खालीलप्रमाणे–

| Sr. No. | Description | Qty. | Rate per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 01. | 10 KVA UPS – Input & Output -3 Phase | 01 | 393750.00 | 393750.00 |
| | | Total Amt. in Rs. | | 393750.00 |

वरीलप्रमाणे एक नग १० KVA यु.पी.एस खरेदीकामी अंदाजे रु.3,93,750/- इतका खर्च अपेक्षित आहे.

**मागणी** – श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभाग यांचे दिनांक ०७/०४/२०१५ रोजीचे मागणीपत्रान्वये (औषध भांडार विभाग प्राप्त दि. १४/०५/२०१५) चे मागणी पत्रक.

**संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान** – अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. 17-2 (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत** – श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभागाकरिता 10 KVA यु.पी.एस विहीत पध्दतीने ई- निविदा मागवून खरेदी करता येईल.

तरी उपरोक्त एक नग १० KVA यु.पी.एस विहीत पद्धतीने ई-निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या रु.३९३७५०/- चे खर्चास मान्यता असावी ही विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभागाकरिता प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे ०१ नग १० KVA यु.पी.एस. महाराष्ट्र शासनाचे दरसुचीनुसार खरेदी करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस आहे.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

२९ **श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभागाकरीता Mini Xerox Machine खरेदीबाबत.**

श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभागाने दि. २७/०२/२०१५ रोजीचे मागणीपत्रान्वये एक नग Mini Xerox Machine ची मागणी केलेली आहे. रुग्णाला Stent, Balloon इ. साहित्य वापरल्यानंतर त्याच्या चलनच्या झेरॉक्स काढण्यासाठी झेरॉक्स मशिनची आवश्यकता आहे.

याकामी M/s. Om Sai Marketing, Aurangabad यांचेकडून दरपत्रक मागविण्यात आले होते त्यानुसार M/s. Om Sai Marketing, Aurangabad यांनी दि.11/05/2015 चे ई मेल पत्रान्वये एक नग Mini Xerox Machine चे दर कळविलेले आहे, त्याचा तपशील खालीलप्रमाणे–

| Sr. No. | Description | Qty. | Rate per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 01. | Mini Xerox Machine | 01 | 57750.00 | 57750.00 |
| | | Total Amt. in Rs. | | 57750.00 |

वरीलप्रमाणे एक नग Mini Xerox Machine खरेदीकामी अंदाजे रु.57750/- इतका खर्च अपेक्षित आहे.

**मागणी**– श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभाग यांचे दिनांक. २७/०२/२०१५ रोजीचे मागणी पत्रान्वये (औषध भांडार विभाग प्राप्त दि. 27/02/20) चे मागणी पत्रक.

**संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान**– अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. 17-2 (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत**– श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभागाकरिता एक नग Mini Xerox Machine विहीत पध्दतीने निविदा मागवून खरेदी करता येईल.

तरी उपरोक्त एक नग Mini Xerox Machine विहीत पद्धतीने निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या रु. ५७७५०/- चे खर्चास मान्यता असावी ही विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभागाकरीता प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे आवश्यक असलेले ०१ नग Mini Xerox Machine देणगी स्वरुपात मिळाल्यास स्विकारणेत यावे. देणगी स्वरुपात प्राप्त न झाल्यास सदरहू झेरॉक्स मशिन खरेदी करणेसाठी विहीत पध्दतीने निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.५७,७५०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस आहे.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

३० **श्री साईबाबा रुग्णालयातील आर्थोपेडीक ओ.टी. विभागाकरीता Foot Operated Sealing Machine मंजुर दराने खरेदी करणेबाबत.**

श्री साईबाबा रुग्णालयातील आर्थोपेडीक ओ.टी. विभागाने दिनांक २८/०३/२०१५ (औषध भांडार विभाग प्राप्त दि. ०९/०४/२०१५) चे मागणीपत्रान्वये 1 नग Foot Operated Sealing Machine ची मागणी केलेली आहे. सदर Foot Operated Sealing Machine हे आर्थोपेडीक ओ.टी. विभागातील पुर्नवापर होणारे सर्जिकल साहित्य निर्जंतुक (ETO) करुन ते ETO पेपर मध्ये ते पुन्हा मशिनव्दारे पॅक करण्यात येते.

दि.३०/०१/२०१४ रोजीचे मा. त्रिसदस्य समिती सभेतील निर्णय क्र.३ (२८) अन्वये श्री साईबाबा रुग्णालयातील Cath Lab या विभागाकरिता १ नग Foot Operated Sealing Machine विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणा-या अंदाजे रु. 28,125/- इतक्या खर्चास मान्यता मिळालेली होती.

त्यानुसार इकडील पत्र क्र. 3942, दि. 18/02/2015 अन्वये एकूण 14 अधिकृत विक्रेते / पुरवठा धारक यांचेकडून दि. 03/03/2015 अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यानुसार सिलबंद कोटेशन प्राप्त न झाल्यामुळे सर्व अधिकृत विक्रेते/ कोटशन धारक दूरध्वनीव्दारे तगादा करण्यात आला होता. त्यास अनूसरुन ३ कोटेशन प्राप्त झालेले असून येत्या समिती सभेपुढे समक्ष उघडण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आलेला येत आहे. तेंव्हा त्याच मंजूर दराने ०१ नग Foot Operated Sealing Machine खरेदी करता येईल.

तसेच श्री साईबाबा रुग्णालयातील Cath Lab या विभागाकरिता १ नग Foot Operated Sealing Machine मंजूर दराने खरेदी करण्यास व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रुपये 28,125/- चे खर्चास मान्यता असावी ही विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, मागील मंजुर दर हे फक्त ०६ महिने कालावधीसाठीच ग्राहय धरणेत येतात. सबब श्री साईबाबा रुग्णालयातील आर्थोपेडीक ओ.टी. विभागाकरीता आवश्यक असलेले ०१ नग Foot Operated Sealing Machine खरेदी करणेसाठी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.२८,१२५/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस आहे.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

३१ **श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाकरीता रेफ्रीजरेटर खरेदी करणेबाबत.**

श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाने दि. १२/०१/२०१५ रोजीचे मागणीपत्रान्वये एक नग ३२० लिटर रेफ्रीजेटरची मागणी केलेली आहे. सध्या त्यांच्याकडे ५ नग फ्रिज असून प्रयोगशाळा विभागातील वेगवेगळया तपासणेकामी लागणा-या केमिकल्स ठेवण्यासाठी जागा अपूरी पडते त्यामुळे एक नग ३२० लिटर रेफ्रीजेटरची आवश्यकता आहे.

याकामी M/s. Sai Enterprises, Shrirampur यांचेकडून दूरध्वनीद्वारे दरपत्रक मागविण्यात आले होते त्यानुसार M/s. Sai Enterprises, Shrirampur यांनी दि.12/05/2015 चे ई मेल पत्रान्वये एक नग ३३० लिटर क्षमतेच्या रेफ्रीजेटरचे दर कळविलेले आहे, त्याचा तपशील खालीलप्रमाणे–

| Sr. No. | Description | Qty. | Rate per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 01. | Refrigerator Double Door Capacity – 330 Lt. | 01 | 33800.00 | 33800.00 |
| | | | Total Amt. in Rs. | 33800.00 |

वरीलप्रमाणे एक नग ३३० लिटर रेफ्रीजेटरचे खरेदीकामी अंदाजे रु.३३८००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

<u>मागणी–</u> श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा विभाग यांचे दिनांक १२/०१/२०१५ रोजीचे मागणीपत्रान्वये (औषध भांडार विभाग प्राप्त दि. 20/02/2015) चे मागणी पत्रक.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान–** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. 17-2 (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–** श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाकरिता एक नग ३३० लिटर फ्रिज विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करता येईल.

तरी उपरोक्त एक नग ३३० लिटर रेफ्रिजेटर विहीत पद्धतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणा-या रु. ३३८००/- चे खर्चास मान्यता असावी ही विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाकरीता प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे ०१ नग रेफ्रीजरेटर खरेदी करणेसाठी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.३३,८००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस आहे.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

३२ **श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस. ओ.टी. नं.२ मध्ये Epoxy Flooring चे काम मागील मंजूर दराने करणेबाबत.**

श्री साईबाबा हॉस्पिटलमधील सी.व्ही.टी.एस ओ.टी नं. 2 मध्ये दि. १०/०४/२०१५ रोजी शॉर्ट सर्किटमुळे आग लागली होती त्यामुळे ओ.टी. मधील Epoxy Flooring खराब झालेले आहे. त्यामुळे सी.व्ही.टी.एस ओ.टी नं. 2 विभागाने दि.15/04/2014 (औषध भांडार प्राप्त दि.16/04/2014) चे मागणी पत्रकान्वये Epoxy Flooring चे काम करुन मिळावे असे कळविलेले आहे.

यापूर्वी सदर ओ.टी. मध्ये मा. त्रिसदस्य समिती सभा दि.१२/०६/२०१४ निर्णय क्र. ४५२ (१) अन्वये M/s. Al-med Equipments, Mumbai यांचेकडुन इकडील पत्र क्र.२१४० दि.०८/०९/२०१४ अन्वये Epoxy Flooring चे काम करुन घेण्यात आलेले होते. त्यानुसार M/s. Al-med Equipments, Mumbai यांचेकडून दूरध्वनीद्वारे दराबाबत विचारणा केली असता त्यांनी त्याच मंजूर दराने काम करण्यास तयार असल्याचे कळविले आहे. तसे त्यांनी त्यांचे त्यांनी दि.२७/०४/२०१५ रोजीचे ई मेल पत्रान्वयें कळविलेले आहे.

| Sr. No. | Name of Items | Area | Thickness | Rate Per in Rs. Per sq. ft. Incl. of Taxes | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | C.V.T.S O. T. - 2 | 313.5sq ft. | 2mm | Rs.112.50 | 35268.75 |
| | | | | **Total Amt. in Rs.-** | **35268.75** |

तरी वरीलप्रमाणे सी.व्ही.टी.एस ओ.टी नं. 2 मधील Epoxy Flooring चे M/s. Almed Equipments, Mumbai यांचेकडुन मागील मंजूर दराने करुन घेण्यास व याकामी येणाऱ्या रक्कम रु. 35269/- चे खर्चास मान्यता घेणेकामीचा प्रस्ताव मा. उपसमिती सभेपुढे ठेवण्यास मान्यता असावी.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, मागील मंजुर दर हे फक्त ०६ महिने कालावधीसाठीच ग्राहय धरणेत येतात. सबब श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस. ओ.टी. नं.२ मध्ये प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे Epoxy Flooring चे काम करुन घेणेसाठी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.३५,२६९/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस आहे.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

३३ **श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस. ओ.टी. नं.१ व २ या विभागाकरिता Reusable Cardio Plegia Chember (1000CC) खरेदीबाबत.**

श्री साईबाबा रुग्णालयातील CVTS OT – II या विभागाने दि. २९/१२/२०१४ चे मागणीपत्रकान्वये तसेच CVTS OT – I या विभागाने दि. ०७/०३/२०१५ चे मागणीपत्रकान्वये प्रत्येकी ०१ नग Reusable Cardio Plegia Chember (1000CC) ची मागणी केलेली आहे. सध्या सदर विभागाकडे या प्रकारचे एक Reusable Cardio Plegia Chember आहे. लागोपाठ होणा-या ओपन हार्ट (व्हाल्व) सर्जरीकरीता आणखी एक नग Reusable Cardio Plegia Chember ची आवश्यकता आहे, त्यामुळे २ नग Reusable Cardio Plegia Chember खरेदी करणे गरजेचे आहे.

सदर २ नग Reusable Cardio Plegia Chember (1000CC) चे खरेदीकामी अंदाजे खर्चासाठी M/s. Bombay Surgical & Scientific Co., Mumbai यांचेकडून दूरध्वनीद्वारे दर पत्रक मागविण्यात आले होते. त्यांचे दर पत्रकानूसार सदर Reusable Cardio Plegia Chember चे दर प्रती नग रु.४३८७५/- इतके कळविलेले आहे त्यांचे दरानूसार ०२ नग Reusable Cardio Plegia Chember खरेदीकामी रक्कम रु.८७७५०/- इतका खर्च अपेक्षित आहे.

<u>मागणी</u> – श्री साईबाबा रुग्णालयातील CVTS OT – II या विभागाने Reusable Cardio Plegia Chember (1000CC) दि.२९/१२/२०१५ (औषध भांडार विभाग प्राप्त दि. ०९/०१/२०१५, दुरुस्ती करुन प्राप्त दि.२०/०२/२०१५) अन्वये तसेच CVTS OT – I या विभागाने दि. ०७/०३/२०१५ (औषध भांडार विभाग प्राप्त दि. १८/०३/२०१५) मागणी केलेली आहे.

<u>संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान</u> – अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उंदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात.

<u>विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत</u> – श्री साईबाबा रुग्णालयातील CVTS OT – I आणि II या विभागात जेंव्हा रुग्ण हा On Pump वर जात असतो तेंव्हा सदर रुग्णाचे Blood जमा करण्यासाठी सदर Reusable Cardio Plegia Chember (1000CC) चा वापर करतात. त्यामुळे ते खरेदी करणे गरजेचे आहे. त्यामुळें दोन्ही ओ.टी. करीता लागणारे प्रत्येकी १ नग Reusable Cardio Plegia Chember (1000CC) विहीत पद्धतीने निविदा मागवून करता येईल.

तरी उपरोक्त ०२ नग Reusable Cardio Plegia Chember (1000CC) विहीत पद्धतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या रु.८७,७५०/- इतक्या खर्चास मान्यता असावी.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस. ओ.टी. नं.१ व २ या विभागाकरिता आवश्यक असलेले ०२ नग Reusable Cardio Plegia Chember (1000CC) विहीत पध्दतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.८७,७५०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस आहे.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

३४ **श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस. ओ.टी. नं.२ करिता Heater Cooler मशिनसाठी Warmer Blanket मंजूर दराने खरेदीबाबत.**

श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस. ओ.टी. नं 2 विभागात Heater Cooler हे मशिन सन 2011 मध्ये खरेदी करण्यात आलेले असून त्यावर रुग्णाचे ऑपरेशन चालू असतांना रुग्णाच्या शरीरातील तापमान कमी झाल्यावर त्यांचे तापमान वाढवणेसाठी उपरोक्त Blanket वापरण्यात येते. सध्या त्यांच्याकडे असलेले Heater Cooler मशिनसाठी लागणारे Blanket हे वापरुन लीक (Puncture) झालेले असल्यामुळे त्यांनी दि.०३/०९/२०१४ (औषध भांडार प्राप्त दि. ०१/११/२०१४) चे मागणीपत्रान्वये एक नग Warmer Blanket ची मागणी केलेली आहे.

सदर Heater Cooler मशिन हे Maquet कंपनीचे असल्यामुळे सदर मशिनकरिता Maquet कंपनीचेच Blanket खरेदी करावे लागणार आहे. यापुर्वी सी.व्ही.टी.एस ओ.टी. १ करिता मा. त्रिसदस्य समिती सभा दि. १२/०६/२०१४ निर्णय क्र. ४५२ (४) अन्वये इकडील पत्र क्र. १८६८ दि. ११/०८/२०१४ अन्वये M/s. Maquet Medical India Pvt.Ltd., Mumbai. यांचेकडून रु. ४३,५७४/- इतक्या रकमेत एक नग Blanket खरेदी केलेले आहे. व त्याचा वापर सी.व्ही.टी.एस. ओ.टी. नं. I मध्ये नियमित चालु आहे. वरील मागणी ही सी.व्ही.टी.एस. ओ.टी. नं. II करिता आहे.

सदर 1 नग Blanket हे M/s. Maquet Medical India Pvt.Ltd., Mumbai यांचेकडुनच मागील मंजूर दर रु. ४३,५७४/- या दराने खरेदी करता येईल. याबाबत M/s. Maquet Medical India Pvt.Ltd., Mumbai यांना दुरध्वनीवर विचारणा केली असता, त्यांनी सदर मंजुर दराने Warmer Blanket देण्यास तयार असल्याचे दि. १७/११/२०१४ रोजी ई-मेल पत्रान्वये कळविले आहे.

तरी M/s. Maquet Medical India Pvt. Ltd., Mumbai यांचेकडून एक नग Warmer Blanket मागील मंजूर दराने खरेदीस व याकामी येणा-या रक्कम रु. ४३,५७४/- चे खर्चास मान्यता असावी.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, मागील मंजुर दर हे फक्त ०६ महिने कालावधीसाठीच ग्राहय धरणेत येतात. सबब श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस. ओ.टी. नं.२ करिता Heater Cooler मशिनसाठी आवश्यक असलेले ०१ नग Warmer Blanket खरेदीकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.४३,५७४/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस आहे.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

३५ **डिफीब्रीलेटरचे Internal Paddles खरेदी करणेबाबत.**

श्री साईबाबा हॉस्पिटल करीता पुरवठा आदेश क्र. 8373/2005 दि. 08/08/2005 अन्वये कार्डीयाक ऑपरेशन थिएटर करीता एक Heart start XL डिफीब्रीलेटर एकुण रु. 2,83,000/- इतक्या रकमेत खरेदी करणेत आले आहे. सदर डिफीब्रीलेटर करीता कंपनीने दिलेला एक वर्षाचा वॉरंटी कालावधी दि. 14/11/2006 रोजी संपलेला आहे. डिफीब्रीलेटरचे दुरुस्ती व देखभालीकरीता कंपनीकडे दि. 01/04/2015 ते दि. 31/03/2016 या कालावधीकरीता कॉम्प्रेहेसीव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट करणेत येत आहे. सदर कालावधीत कझ्युमेंबल स्पेअर पार्ट (उदा. Internal / External Paddles, ECG Cable etc) वगळता मशिनचे दुरुस्तीकरीता लागणारे स्पेअर पार्ट कंपनी स्वखर्चाने बदलणार आहे.

सध्या कार्डीयाक ओ. टी. डिफीब्रीलेटर मशिनचे Adult Internal Paddles व्यवस्थीत काम देत नसल्याचे विभागाने त्यांचे पत्र क्र. 1279 दि. 08/04/2015 अन्वये कळविले आहे. त्यानुसार सदर Paddles ची तपासणी केली असता सदर Internal Paddles खराब झाले असल्यामुळे नवीन खरेदी करणे आवश्यक असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर डिफीब्रीलेटर मशिन कार्डीयाक ओ.टी. विभागात नियमीत वापरात असल्याने दुरूस्त करणे आवश्यक आहे. त्यासाठी मे. सिरॉनीक्स इस्ट्रुमेंटस प्रा. ली. पुणे यांनी पत्र क्र. GJM/CMS/2015/05/29/3, दि. 29/05/2015 अन्वये सर्व करांसहीत एकुण रू. 42,000/- (अक्षरी रू. बेचाळीस हजार मात्र) इतक्या रकमेचे कोटेशन पाठविले असुन सदर रकमेची कंपानीने आगाउ मागणी केलेली आहे. परंतु कंपनी प्रतिाधीशी झालेल्या चर्चेअंती वरील Internal Paddles श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये प्राप्त झाल्यानंतर सदर रक्कम अदा होणेस कंपानीने स्वीकृती दर्शविली आहे. सदर Internal Paddles करीता कंपानीने तीन महिन्यांची वॉरंटी देत आहे. तसेच मे. सिरॉनीक्स इस्ट्रुमेंटस प्रा. ली. पुणे हे एकमेव पुरवठाधारक आहेत व त्यांचेकडेच सदर डिफीब्रीलेटचे स्पेअर पार्ट उपलब्ध असतात. सदर Internal Paddles मा. व्यवस्थापान समितीच्या मान्यतेनंतर अंदाजे दोन ते तीन आठवडयांचा कालावधी आपेक्षीत आहे.

तरी मे.सिरॉनीक्स इस्ट्रुमेंटस प्रा. ली. पुणे यांचेकडुन डिफीब्रीलेर करीता Internal Paddles खरेदी करणेस व त्यासाठी येणाऱ्या एकुण रू. 42,000/- च्या खर्चास मान्यता असावी.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे मे.सिरॉनीक्स इस्ट्रुमेंटस प्रा.ली., पुणे यांचेकडुन श्री साईबाबा हॉस्पिटलमधील डिफीब्रीलेटर करीता Internal Paddles खरेदी करणेस व त्यासाठी येणाऱ्या एकुण रु.४२,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस आहे.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

३६ **कार्डीयाक ओ.टी.०२ मधील ओ.टी. टेबलचे दुरुस्तीबाबत.**

श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कार्डीयाक ओ.टी. 02 विभागाकरीता पुरवठा आदेश क्र.6013, दि. 06/01/2011 अन्वये एक ओ.टी टेबल मे. मॅक्वेट मेडीकल इंडिया प्रा. ली. मुंबई यांचेकडुन एकुण रू. 19,32,916/- इतक्या रकमेत खरेदी करण्यात आला आहे. सदर ओ. टी. टेबल करीता कंपनीने दिलेला दोन वर्षाचा वॉरंटी कालावधी दि. 14/04/2013 रोजी संपलेला आहे. सदर ओ.टी. टेबलचे नियमीत दुरुस्ती व देखभाल करणेसाठी कंपनीकडे दि. 01/04/2014 ते 31/03/2015 या कालावधीकरीता कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (CMC) करणेत आले होते. CMC कालावधीत दुरूस्तीसाठी आवश्यक असणाऱ्या सर्व स्पेअर पार्टची व कन्झ्युमेबलची किंमत संस्थान वेगळी अदा करीत आहे.

सध्या दि. 10/04/2015 रोजी कार्डीयाक ओ.टी विभागात अचानक शॉर्टसर्किट मुळे आग लागली होती. त्यामध्ये ओ.टी. टेबलचे काही स्पेअर पार्ट व ॲक्सेसरिज जळुन खराब झालेल्या आहे. त्यानंतर सदर मशिनचे तपासणी करणे करीता कंपनी इंजिनीअर आले असता त्यांनी सर्व्हीस रिपोर्ट दि. 13/04/2015 अन्वये काही स्पेअर पार्ट खराब झाल्याचे कळविले आहे. त्यासाठी कंपनीने त्यांचे पत्र. क्र. MCC-WR-068/15, दि. 13/04/2015 अन्वये स्पेअर पार्ट बदलणेकरीता सर्व करांसहीत एकुण रु. 6,68,669/- (अक्षरी रु. सहा लाख आडोसष्ट हजार सहाशे एकोणसत्तर मात्र) इतक्या रकमेचे कोटेशन पाठविले आहे. सदर रकमेची कंपनीने आगाउ मागणी केलेली आहे. परंतु कंपनी प्रतिनिधीशी झालेल्या चर्चेअंती वरील स्पेअर पार्ट बदललेनंतर अदा होणेस कंपनीने स्वीकृती दर्शविली आहे.

ओ.टी टेबल करीता कंपनीने दि. 20/04/2015 चे पत्रान्वये असे कळविले आहे की, 'सदर ओ. टी. टेबल हा सध्या जरी व्यवस्थित काम देत असेल तरीही ओ.टी.मध्ये झालेल्या आगीच्या उष्णतेने आतील Hydraulic & Electronic पार्टस् खराब झाले असावेत. त्यामुळे सदर टेबल पेशंटच्या सुरक्षितेच्या दृष्टीने वापरात ठेवू नये.' परंतु याबाबतीत मा. वैद्यकिय संचालक सो. यांचेशी चर्चा केली असता- सदर टेबल ऐवजी नवीन टेबल खरेदी करून त्या खर्चाचा विमा कंपनीकडे क्लेम करता येईल व सदरचा टेबल दुरूस्त करून विविध ओ.टी विभागात तातडीची आवश्यक असतांना वापरता येईल. सदर दुरूस्ती संस्थानच्या खर्चाने करता येईल असे नम्र मत आहे. सध्या दुरूस्ती करीता अंदाजे रू. 6,68,669/- इतका खर्च येणार आहे. उपरोक्त स्पेअर पार्ट व ॲक्सेसरिज करीता कंपनी प्रतिनिधी सोबत प्रत्यक्ष चर्चा करून दर कमी करता येईल असे मत आहे. सदर स्पेअर पार्ट हे विशिष्ट रचना व स्पेसीफिकेशन असलेले असतात त्यामुळे इतर पुरवठाधारक कंपनीकडे उपलब्ध होत नाही. नवीन याच प्रकारचे ओ.टी. टेबलची अंदाजे किंमत रू. 33,00,000/- इतकी आहे.

तरी मे.मॅक्वेट मेडीकल इंडिया प्रा. ली. मुंबई यांचेकडुन ओ.टी. टेबलचे स्पेअर पार्ट बदलणेस व त्यासाठी प्रत्यक्ष चर्चा करून येणाऱ्या अंदाजे एकुण रू. 6,68,669/- च्या खर्चास मान्यता असावी.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे मे.मॅक्वेट मेडीकल इंडिया प्रा. ली. मुंबई यांचेकडुन श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कार्डीयाक ओ.टी. टेबलचे स्पेअर पार्ट बदलणेस व त्यासाठी येणाऱ्या एकुण रु.६,६८,६६९/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस आहे.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

३७ **कार्डीयाक ओ.टी.०२ मधील विविध मशिन्सकरीता स्पेअर पार्ट/ ॲक्सेसरिज खरेदी करणेबाबत.**

श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कार्डीयाक ओ.टी. 02 विभागाकरीता सन 2011 यावर्षी विविध कंपन्याकडुन विविध मेडीकल इक्वीपमेंट व मशिन्स खरेदी करणेत आले आहे. सदर मशिन्स करीता कंपनीने दिलेला एक वर्षाचा वॉरंटी कालावधी संपलेला आहे. सदर मशिन्सचे नियमीत दुरुस्ती व देखभाल करणेसाठी संबधित कंपनीकडे दि. 01/04/2015 ते 31/03/2016 या कालावधीकरीता कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (CMC) करणेसाठी मा. त्रिसदस्यीय समिती समोर प्रस्ताव सादर करणेत आला आहे. त्यास अद्याप मान्यता मिळालेली नाही.

सध्या दि. 10/04/2015 रोजी कार्डीयाक ओ.टी विभागात अचानक शॉर्टसर्किट मुळे आग लागली होती. त्यामध्ये फिलिप्स मॉनिटर, एल. अॅन्ड टी. मॉनिटर (सध्याची मे.स्कॅनरे हेल्थकेअर प्रा.लि.मैसूर), ड्रॅगर बॉईल्स मशिन, या इक्वीमेंटस्च्या काही ॲक्सेसरिज व स्पेअर पार्ट जळुन खराब झालेले आहे. त्यानंतर सदर मशिनची तपासणी करणे करीता संबंधित कंपनी इंजिनीअर आले असता त्यांनी सदर मशिनची तपासणी करून त्यांचे सर्व्हीस रिपोर्ट अन्वये काही स्पेअर पार्ट व ॲक्सेसरिज खराब झाले असुन बदलणे आवश्यक असल्याचे कळविले आहे. त्यासाठी सदर कंपन्यांनी त्यांचे पत्रान्वये सर्व करांसहीत एकुण रु. 50,149/- (अक्षरी रु. पन्नास हजार एकशे एकोणपन्नास मात्र) इतक्या रकमेचे कोटेशन्स पाठविले आहे. सदर रक्कम कंपनीस उपरोक्त स्पेअर पार्ट व ॲक्सेसरिज बदललेनंतर अदा करावयाची आहे. सदर स्पेअर पार्ट व ॲक्सेसरिज हया विशिष्ट रचना व स्पेसीफिकेशन असलेले असतात त्यामुळे इतर पुरवठाधारक कंपनीकडे उपलब्ध होत नाही. तसेच सदरच्या कंपन्या ह्या एकमेव पुरवठाधारक आहेत.

तसेच आगीत जळालेल्या सर्व मशिन्स व इक्वीपमेंटस यांचा विमा कंपनीने पंचनामा केलेला असुन सदर विमा कंपनीकडुन जळालेल्या मशिन्स व इक्वीपमेंटसची रक्कम मिळणेस अंदाजे सहा ते बारा महिनांचा कालावधी लागु शकतो.

तरी विविध मशिन्सच्या ॲक्सेसरिज व स्पेअर पार्ट सबंधित कंपनीकडुन खरेदी करणेस व त्यासाठी प्रत्यक्ष चर्चा करून येणाऱ्या अंदाजे एकुण रू.50,149/- च्या खर्चास मान्यता असावी.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, कार्डीयाक ओ.टी.०२ मधील विविध मशिन्सकरीता स्पेअर पार्ट/ ॲक्सेसरिज खरेदी करणेकामीचा प्रस्ताव तपासून फेरसादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस आहे.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

३८ **श्री गुरुपौर्णिमा उत्सव- २०१५ व श्री साईसच्चरित पारायण सोहळा- २०१५ चे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी तर्फे श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०१५ गुरुवार,दि.३०/०७/२०१५ ते शनिवार दि.०१/०८/२०१५ असा तीन दिवस साजरा करणे करीता उत्सव खर्च रु. ४१,००,०००/-( रु. एके चाळीस लाख) मात्र खर्चाचा प्रस्ताव दिनांक २४/०६/२०१५ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे दि. २४/०६/२०१५ रोजीचे सभेत मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. यावर मा. व्यवस्थापन समितीचे निर्णय क्र.१८१ "सालाबादप्रमाणे याही वर्षी श्री गुरुपौर्णिमा उत्सव साजरा करणेस तसेच उत्सवानिमित्त प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्यासाठी येणा-या रु. ४१,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.तसेच श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०१५ निमित्त येणा-या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा. मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा. खंडपीठाच्या मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करणेस यावी," असा निर्णय पारीत झालेला आहे.

श्री साईसच्चरित पारायण सोहळा वर्ष २१ वे शनिवार दि.१५/०८/२०१५ ते रविवार दि.२३/०८/२०१५ अखेर साजरा करणे करीता पारायण खर्च रु. रु.१६,६०,०००/- (रु. सोळा लाख साठ हजार) मात्रचे खर्चास प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दि.२४/०६/२०१५ रोजीचे सभेत मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. यावर मा. व्यवस्थापन समितीचे निर्णय क्र. १८० “सालाबाद प्रमाणे याही वर्षी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे सौजन्याने व शिर्डी ग्रामस्थ,शिर्डी यांचे सहकार्याने श्री साईसच्चरीत पारायण सोहळा साजरा करणेस तसेच त्यासाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.१६,६०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच श्री साईसच्चरीत्र पारायण सोहळा साजरा करणेकामी येणा-या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा. मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा. खंडपीठाच्या मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करणेस यावी," असा निर्णय पारीत झालेला आहे.

प्रशासन शाखा, कार्यासन वशी-५ यांचे कडून विधी विभागास दि.२५/०६/२०१५ रोजी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी तर्फे श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०१५ गुरुवार,दि.३०/०७/२०१५ ते शनिवार दि.०१/०८/२०१५ असा तीन दिवस साजरा करणे करीता रु. ४१,००,०००/-( रु. एके चाळीस लाख) मात्रचे खर्चास व श्री साईसच्चरीत्र पारायण सोहळा शनिवार दि.१५/०८/२०१५ ते रविवार दि. २३/०८/२०१५ या कालावधीत साजरा करणे करीता व पारायण खर्च रु.१६,६०,०००/- (रु. सोळा लाख साठ हजार) मात्रचे खर्चास मा. मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा. खंडपीठाच्या मान्यता घेणेसाठी कळविले होते.

जा.क्र एसएसएस/ वशी- विधी/१८५७/२०१५.दिनांक ०२/०७/२०१५ रोजीचे पत्रान्वये विधी विभागाने श्री संदीप एकनाथ गोंदकर , ॲडव्होकेट, औरगांबाद हायकोर्ट यांचेकडे श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०१५ व श्री साईसच्चरीत्र पारायण सोहळा - २०१५ चे खर्चास मान्यता घेणेसाठी सिव्हील अर्ज तयार करुन देणेसाठी पत्र दिले होते.त्यास अनुसरुन श्री संदीप एकनाथ गोंदकर, ॲडव्होकेट यांनी ईमेलव्दारे सर्व विभागांचे खर्च वेग-वेगळया हेडखाली दाखवीले आहेत. या बाबत संस्थानचे विधी अधिकारी श्री चित्रे यांचेशी चर्चा केली आहे. सदर विषयी मा. कार्यकारी अधिकारी महोदय यांचेशी याबाबत श्री.चित्रे यांचेसमवेत चर्चा केली असता प्रत्येक विभागाचा खर्च रु.१०,००,००० /- (रु.दहा लाख) चे आत आहे. त्यामुळे सदरचे खर्चास मा. मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे सदरचा खर्चाबाबतचा प्रस्ताव मा.उपसमितीचे सभेत सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

**अ) श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१५ खर्च तपशिल** श्री गुरुपौर्णिमा उत्सव- २०१५ गुरुवार,दि.३०/०७/२०१५ ते शनिवार दि.०१/०८/२०१५ असा तीन दिवस साजरा करणे करीता रु. ४१,००,०००/- (रु.एके चाळीस लाख) मात्रचे खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.क्र | खर्च तपशिल | विभाग | श्री गुरुपौर्णिमा उत्सव -२०१४ | | श्री गुरुपौर्णिमा उत्सव- २०१५ अंदाजे खर्च |
|---|---|---|---|---|---|
| | | | अंदाजे खर्च | प्रत्यक्ष खर्च | |
| १ | मंडप व कमानी स्टेज | बांधकाम | ९३५०००.०० | २७२८८७.०० | ४,९६,३५२.०० |
| २ | कलाकार बिदागी, कीर्तनकारासह | मंदीर | ३०६९८०.०० | १७७६९.०० | ३,११,०५७.०० |
| ३ | भक्तांना मिष्टांन्न् मजूरीसह | प्रसादालय | ७६३७१०.०० | ५५७८०६.०० | ७,७८,०३८.०० |
| ४ | विद्युत रोषणाई | विद्युत | १३००००.०० | ५०२५६.०० | १,३०,०००.०० |
| ५ | निमंत्रण पत्रिकाछपाई खर्च, | वशी-५ | | २,९७,०००.०० | ३,५०,०००.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६ | निमंत्रणपत्रिका पाठविणेकामी पोष्टेज खर्च | वशी-१२ | १३,००,०००.०० | ९,३०,०००.०० | ९,७५०००.०० |
| ७ | उदीप्रसाद, जाहिरात, बॅनरखर्च | वशी-८, जनसंपर्क | | ५३,४२१.०० | २,७५,०००.०० |
| ८ | जादा कामगार | कामगार | २५००००.०० | १४४३२२.०० | २,५०,०००.०० |
| ९ | पालख्या पिण्याचे पाणी इ. | पाणीपुरवठा | २२५०००.०० | १९७७५.०० | २,२५,०००.०० |
| १० | इतर खर्च | | १५९३१०.०० | २१४९०.०० | १,०९,५५३.०० |
| ११ | मंदीर सजावट | बगीचा | २०००००.०० | ०.०० | २,००,०००.०० |

श्री गुरुपौर्णिमा उत्सव खर्च अंदाजपत्रकात कोणत्याही विभागाचा खर्च रक्कम रु. १०,००,०००/- (रु. दहा लाख) व त्या पेक्षा जास्त नाही.

**ब) श्री साईसच्चरीत्र पारायण सोहळा २०१५ खर्च तपशिल-**

श्री साईसच्चरित पारायण सोहळा वर्ष २१ वे शनिवार दि.१५/०८/२०१५ ते रविवार दि.२३/०८/२०१५ अखेर साजरा करणेकरीता पारायण खर्च रु. रु.१६,६०,०००/- (रु. सोळा लाख साठ हजार) मात्रचे अंदाजपत्रकांत खालील प्रमाणे तरतूद केलेली आहे. तपशील खालील प्रमाणे.

| अ.न. | तपशिल | विभाग | श्री साईसच्चरीत्र पारायण सोहळा २०१४ | | श्री साईसच्चरीत्र पारायण सोहळा २०१५ अंदाजे खर्च |
|---|---|---|---|---|---|
| | | | अंदाजे खर्च | प्रत्यक्ष खर्च | |
| १ | मंडप , मॅटीन व स्टेज | बांधकाम | ३,००,०००.०० | २,८९,४५७.०० | ३,४५,०००.०० |
| २. | कलाकार बिदागी | मंदीर | ७५,०००.०० | ७,९०२.०० | ६७,१६९.०० |
| ३. | प्रसाद खर्च (चहा, कॉफी व खर्चासह) | प्रसादालय | ५,७५,०००.०० | ५,८९,९४३०० | ८,९४,६१८.०० |
| ४. | जादा कंत्राटी (कामगार) | कामगार | --- | ६५,७८७.०० | १,००,०००.०० |
| ५. | इतर खर्च (फर्निचर भाडे, प्लास्टिक कापड, फोटोग्राफी, किरकोळ खर्च) | | २०,०००.०० | ७,२८०.०० | २५,०६३.०० |
| ६. | फुल सजावट खर्च | बगीचा | --- | --- | ६०,०००.०० |
| ७. | विदयुत रोषणाई | विद्युत | --- | --- | १,६८,१५०.०० |

श्री साईसच्चरीत्र पारायण सोहळा-२०१५ खर्च अंदाजपत्रकात कोणत्याही विभागाचा खर्च रक्कम रु. १०,००,०००/- (रु.दहा लाख) व त्या पेक्षा जास्त नाही. त्यामुळे सदरच्या खर्चास मा.उप समितीचे सभेत मान्यता मिळणे आवश्यक आहे.

निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री गुरुपौर्णिमा उत्सव- २०१५ व श्री साईसच्चरित पारायण सोहळा-२०१५ साजरा करणेकामी प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे प्रत्येक विभागास येणा-या खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस आहे.** (कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५)

---

३९ **पानमळा गोडावून येथील प्रतिबंधित १७८३ क्विंटल तांदुळाबाबत.**

अन्न व औषध प्रशासन, अहमदनगर, येथील सहा.आयुक्त (अन्न) यांनी दि.१७/०४/२०१५ रोजी तातपुरता प्रतिबंधित केलेला तांदुळ १७८३ क्विंटल यावर योग्य प्रक्रिया व उपाययोजना करुन संपुर्ण साठा जाळे-जळमटे व किडे, अळया हयापासून मुक्त झाल्याचे व तो खाण्यायोग्य असल्याचे मान्यताप्राप्त NABL विश्लेषण अहवाल या कार्यालयाकडे सादर करणेबाबत आदेशित केले आहे.

सदर काळात लग्नसराई व इतर कार्यामुळे महिला बचत गट सदस्य उपलब्ध न झाल्याने श्री उत्तम लोढा,राहाता यांनी सेवाभावे दिलेल्या मशिनव्दारे संस्थान मान्य हमालांकरवी रु.६/- प्रति गोणी या दराने उपरोक्त साठयापैकी ११७६ गोण्या (प्रत्येकी ५० किलो प्रमाणे) तांदुळ स्वच्छ केला आहे.

स्वच्छ केलेल्या एकूण ११७६ तांदुळाची पहाणी करुन पुढील मार्गदर्शन करणेबाबत अन्न औषध प्रशासन, अहमदनगर यांना पत्र पाठवून विनंती करण्यात आली होती. त्यावर सहा.आयुक्त अन्न व ओषध प्रशासन, अहमदनगर यांनी पत्र पाठविले असुन सदर पत्रात वर्णन केलेप्रमाणे तांदुळाचे सर्व साठयावर योग्य प्रक्रिया, उपाययोजना करुन जाळे-जळमाटे, कीड व अळया यापासून मुक्त झाल्याचे व तांदुळ मानवी खाण्यायोग्य असल्याचे मान्यताप्राप्त NABL प्रयोगशाळेच्या विश्लेषण अहवालासह सादर न केल्याने पुढील कार्यवाही घेणे शक्य होणार नाही.

तरी तांदुळावर केलेल्या प्रक्रिया उपाय योजनांची तपशीलवार माहिती व सदर तांदुळ मानवी खाण्यास योग्य असल्याचे मान्यताप्राप्त NABL विश्लेषण अहवाल सोबत पाठविणेबाबत विनंती केली आहे. ज्याव्दारे लवकर पुढील कार्यवाही घेणे सुकर होईल, असे म्हटले आहे.

तरी सदर पत्रातील आदेशाप्रमाणे कार्यवाही करणेकामी पुढीलप्रमाणे कार्यवाही करता येईल, त्यास मान्यता असावी.

**अ)** सध्या लग्नसराई संपल्यामुळे श्रीरामपूर व परिसरातील महिला बचत गट कामातुन मुक्त असल्याने ३५६६ (१७८३ क्वि.) गोण्या तांदुळाचा संपूर्ण साठा अंदाजे रु.१४ प्रति ५० किलोच्या गोणीचे दराने रु.४९,९२४/- पर्यंतचे कामासाठी परिसरातील महिला मंडळांना समक्ष दाखवून संपुर्ण साठा स्वच्छ करणेकामी दरपत्रके मागवून ती मा. कार्यकारी अधिकारी साहेब यांचे परवानगीने मा.प्र.अ.(भांडार) यांचे कार्यालयात उघडून निम्नतम दरधारकास पुढील कार्यादेश देणेस मान्यता मिळावी.

**ब)** उपरोक्त टेंडर धारकास तांदुळ स्वच्छ करून देणेकामीचे साहित्य उदा- सुप चाळणी त्यांना स्वतचे आणणेस सांगता येईल त्या बदल्यात त्यांना संस्थान मार्फत २ वेळा मोफत चहा देता येईल त्याबरोबरच थप्पीवरील तांदुळाच्या गोण्या काढणेकामी विभागांतर्गत व्यवस्था करता येईल, मात्र साफ केलेला व गोणीत पॅक केलेला सर्व तांदुळ विभागामार्फत लावून घेता येईल.

**क)** उपरोक्त सर्व साठा साफ होणेस अंदाजे २५ ते 30 दिवसांचा कालावधी अपेक्षित आहे कारण प्रसादालयात चौकशी केली असता एक स्त्री कामगार एका दिवसात अंदाजे ५ ते ६ पोते (प्रत्येकी १०० कि.प्रमाणे) मूहणजेच ५० किलोच्या १० ते १२ गोण्या स्वच्छ करत असल्याचे समजले.

**ड)** उपरोक्त सर्व साठा स्वच्छ झालेनंतर तो तांदुळ आदेशाप्रमाणे कोणत्याही मान्यताप्राप्त NABL लॅब मध्ये तपासून तदनंतर त्याचा प्राप्त अहवाल मा.सहा.आयुक्त अन्न व औषध प्रशासन, अहमदनगर, (म.रा.) यांना पाठवून त्यांचे आदेशाप्रमाणे पुढील कार्यवाही करता येईल.

तरी उपरोक्त अ,ब,क व ड प्रमाणे कार्यवाही करणेस तथा वरीलप्रमाणे अंदाजे रक्कम रु. ४९,९२४/- (अक्षरी रुपये एकोणपन्नास हजार नऊशे चोवीस मात्र) खर्चाचे प्रस्तावास मा.उप समितीचे सभेपुढे निर्णय होऊन मान्यता मिळणेस्तव सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, पानमळा गोडावून येथील प्रतिबंधित १७८३ क्विंटल तांदुळ स्वच्छ करणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.४९,९२४/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यता यावी, अशी या उपसमितीची शिफारस आहे.** (कार्यवाही- अधिक्षक, भांडार विभाग)

---

४० **वाहन क्रमांक एम.एच.१७/ एजी- १०१६ (कार्डीयाक रुग्णवाहिका) चे झालेले दुरुस्ती खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

वाहन विभागाकडील दि.२०/०६/२०१५ रोजीचे मंजुर टिपणीनुसार, वाहन क्र.एम.एच.१७/ए.जी-१०१६ (कार्डीयाक रुग्णवाहीका) या वाहनाचे सततचे वापराने रॉकर गॅग असेमब्ली व , टॅपेट कव्हर तुटलेले होते. सदरचे वाहन हे सेंसर सिस्टीमशी जोडलेले आहे. हे वाहन चैन टायमींग असल्याने वाहन विभागात सेंसर सिस्टीम व चैन टायमींग चेकींग इक्वीपमेंट उपलब्ध नाही. तसेच इंजिन ऑईल मध्ये रॉकरचे फायबर तुकडे आढळल्याने सदर वाहनाचे दुरुस्तीचे काम फोर्स मोटर्स कंपनीचे अधिकृत डिलर,उज्वल फोर्स नाशिक यांचेकडून करुन घेणेस व याकामी येणा-या खर्चास प्रशासकीय मान्यता मिळाली होती.

त्यानुसार सदर वाहन दि.२७/०६/२०१५ रोजी फोर्स मोटर्स कंपनीचे अधिकृत डिलर, उज्वल फोर्स, नाशिक यांचेकडे पाठविण्यात आले होते. उज्वल फोर्स नाशिक यांनी दि.०२/०७/२०१५ रोजी आवश्यक त्या स्पेअर पार्टसह दुरुस्तीचे काम पुर्ण केले आहे. त्यांचे दुरुस्ती बीलानुसार कार्डीयाक वाहनाकरिता रक्कम रु.४१,०७५/- (अक्षरी रक्कम रु. एक्केचाळीस हजार पंच्याहत्तर ) मात्र खर्च आलेला आहे. सदर बीलांचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.न | पुरवठाधारकांचे नाव | बील नंबर | एकुण रककम रु. |
|---|---|---|---|
| १. | उज्वल एजेन्सीज, नाशिक. स्पेअर पार्ट बील | ५७४-७५,७६,७७,७८ | ३२,१६०.०० |
| २. | मजुरी बील | १३३ | ८,९१५.०० |
| | **अक्षरी रककम रु. एक्केचाळीस हजार पंच्याहत्तर मात्र.** | | **४१,०७५.००** |

वाहन ताब्यात घेतेवेळी बीलाची रक्कम रोखीने अदा करावी लागणार असल्याने तसेच कार्डीयाक ॲम्बुलन्स ही अत्यावश्यक सेवा असल्याने तातडीने दुरुस्तीचे काम पुर्ण करण्यात आले आहे. प्रस्तुत खर्च मोटारकार दुरुस्ती खर्च या अंदाजपत्रकातुन करता येईल.

वर नमूद केलेप्रमाणे कार्डीयाक वाहनाचे दुरुस्ती कामाकरिता रक्कम रु.४१,०७५/- (अक्षरी रक्कम रु.एक्केचाळीस हजार पंच्याहत्तर) मात्र खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्डीयाक वाहनाचे दुरुस्ती कामाकरिता आलेल्या रक्कम रु.४१,०७५/- मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस आहे.**

(कार्यवाही- अधिक्षक, ~~भांडार~~ वाहन विभाग)

---

४१ **सिंहस्थ कुंभमेळा- २०१५ चे कालावधीमध्ये शिर्डी नगरपंचायत, शिर्डी करीता यांना एक मालवाहतूक वाहन भाडोत्री तत्वावर उपलब्ध करुन देणेबाबत.**

मा. मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी संदर्भ क्र.०१ चे पत्राने, सिंहस्थ कुंभमेळयामुळे शिर्डी येथे होणा-या गर्दीच्या अनुषंगाने दि.२८/०८/२०१५ ते दि.२६/०९/२०१५ या कालावधीत साई मंदिरा जवळील रस्त्यावरील

फेरीवाले, अतिक्रमणे हटविणेसाठी संस्थानकडे ५० कर्मचारी व दोन वाहनांची मागणी केलेली आहे. त्यास अनुसरुन उपरोक्त संदर्भ क्र.०२ अन्वये बांधकाम विभाग-कुंभमेळा-शताब्दी कक्षाकडून मंजूर टिपणीवर मा.कार्यकारी अधिकारी सो. यांनी "सध्या एक वाहन व एका शिफटमध्ये प्रत्येकी दोन कंत्राटी कर्मचारी देणेत यावेत" असे निर्देश दिलेले आहेत.

त्यानुसार, संदर्भ क्र.०३ चे टिपणीद्वारे दि.२८/०८/२०१५ ते दि.२६/०९/२०१५ अखेर ३१ दिवस एक भाडोत्री टाटा-४०७ टेम्पो (सकाळी ०६.०० ते रात्री २२.०० या वेळेत) शिर्डी नगरपंचायत यांना साई मंदिर जवळील रस्त्यावरील फेरीवाले, अतिक्रमणे हटविणेसाठी इकडील जा.नं.एसएसएस/वाहन/१६५१/२०१५, दि.२३/०६/२०१५ रोजीचे पत्राने परिसरातील टाटा-४०७ टेम्पो वाहनधारक यांचेकडून दरपत्रकाची मागणी करण्यात आली होती. त्यानुसार ०३ दरपत्रके प्राप्त झालेली होती. सदर दरपत्रके उघडणेस मा. कार्यकारी अधिकारी सो. यांची मान्यता घेवुन दि.०४/०७/२०१५ रोजी मा.प्रशासकीय अधिकारी (वाहन विभाग) यांचे समक्ष उघडण्यात आलेली आहेत. सदर उघडणेत आलेल्या दरपत्रकांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | दरपत्रकधारकाचे नांव | दरपत्रकामध्ये दिलेले अंतीम दर (रु.) (प्रति दिन प्रमाणे) |
|---|---|---|
| ०१ | श्री अशोक बाबुराव कोळपकर, रा.राहाता | रु.१,६००/- |
| ०२ | श्री. विठ्ठल रामराव वाणी, रा. नांदुर्खी | रु.१,६५०/- |
| ०३ | श्री दिलीप गंगाधर लुटे, रा. राहाता | रु.२,१००/- |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्याचा विचारकरता अ.नं.०१ वरील दरपत्रकधारक, श्री अशोक बाबुराव कोळपकर, रा. राहाता यांनी देवु केलेले दर (प्रति दिन रु.१,६००/-मात्र) निम्नतम असुन त्यांचे कडील वाहन क्र.एमएच-१७-टी-४६२३ (टेम्पो टाटा-४०७) हे दि.२८/०८/२०१५ ते दि.२६/०९/२०१५ या कालावधीत सकाळी ०६.०० ते रात्री १०.०० या वेळेत वाहन चालक, दुरुस्ती व इंधन खर्चासह भाडोत्री लावणे योग्य होईल.

तरी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचे मागणीनुसार, सिंहस्थ कुंभमेळयामुळे शिर्डी येथे होणा-या गर्दीच्या अनुषंगाने दि.२८/०८/२०१५ ते दि.२६/०९/२०१५ या कालावधीत साई मंदिरा जवळील रस्त्यावरील फेरीवाले, अतिक्रमणे हटविणेसाठी श्री.अशोक बाबुराव कोळपकर, रा. राहाता यांचा एक टेम्पो वाहन प्रति दिन रु.१,६००/- मात्र दराने भाडोत्रीतत्वावर लावणे कामी कार्योदेश देणेस व याकामी येणा-या रु.४९,६००/- (अक्षरी रक्कम रु.एकोणपन्नास हजार सहाशे) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचे मागणीनुसार, सिंहस्थ कुंभमेळयामुळे शिर्डी येथे होणा-या गर्दीच्या अनुषंगाने दि.२८/०८/२०१५ ते दि.२६/०९/२०१५ या कालावधीत साई मंदिरा जवळील रस्त्यावरील फेरीवाले, अतिक्रमणे हटविणेसाठी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी करीता यांना एक मालवाहतूक वाहन भाडोत्री तत्वावर उपलब्ध करुन देणेसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे केलेल्या कार्यवाहीचे अवलोकन करणेत येऊन, त्याकामी निम्नतम दरधारक श्री.अशोक बाबुराव कोळपकर, रा. राहाता यांचेकडून एक टेम्पो वाहन प्रति दिन रु.१,६००/- मात्र दराने भाडोत्रीतत्वावर लावणेस मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस आहे.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

४२ **संस्थानचे विविध ठिकाणी बसविणेकामी ए.सी. खरेदी करणेबाबत.**

(१) श्री साईनाथ रुग्णालय, गायनीक ओटी विभाग यांनी दिनांक 23/04/2015 व दिनांक 05/05/2015 रोजीचे पत्रान्वये गायनीक ओटी मध्ये ए.सी. अतिशय जुने असल्याने नविन ए.सी. बसविण्याची मागणी केलेली आहे. सदर ओटी मधील ए.सी. सन 2002 मध्ये खरेदी करण्यात आलेले असून, त्यांची वारंवार दुरुस्ती करावी लागते.

(२) श्री साईनाथ रुग्णालय, प्रयोगशाळा विभाग यांचे दिनांक 27/04/2015 रोजीचे पत्रान्वये प्रयोगशाळेतील ए.सी. अतिशय जुना असल्याने त्याठिकाणी रक्त टेस्टीगच्या मशीनरी सुस्थितीत राहव्यात यासाठी नविन ए.सी. बसविण्याची मागणी केलेली आहे.

(३) लेखाशाखेतील मनिऑर्डर विभागातील सर्व कामे संगणकाव्दारे चालू असल्याने तेथील वातावरण नियंत्रीत राहणेसाठी वापरात असलेले सध्याचे दोन ए.सी. जुने झाल्याने ते वारंवार खराब होत आहेत. या सर्वाचा परिणाम कर्मचा-याचे कामकाजावर होत असल्याने, मनिऑर्डर विभागाने तेथे नविन ए.सी. बसवून देण्याची मागणी दिनांक 11/03/2015 रोजीचे पत्रान्वये केली आहे.

उपरोक्तप्रमाणे मागणी केलेल्या ठिकाणी बसविणेकरीता आवश्यक ए.सी. इकडील विभागाकडे शिल्लक नसल्याने नविन नामांकित कंपन्याचे ए.सी. खरेदी करावे लागणार आहे. या खरेदीकामी तपशील पुढीलप्रमाणे:

| अ.नं. | ठिकाण | तपशील | मागणी | अंदाजे दर रुपये | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| 1. | श्री साईनाथ रुग्णालय, गायनिक ओटी | स्प्लिट टाईप ए.सी. वॉल माऊंटेड, 3 स्टार, रोटरी कॉम्प्रेसर, कॉपर कंडेंसर व कॉपर पाईपींग, कंपनी - नामाकींत, क्षमता – 2 टन | 1 | 48,000/- | 96,000/- |
| 2. | श्री साईनाथ रुग्णालय, प्रयोगशाळा विभाग | | 1 | 48,000/- | 48,000/- |
| 3. | लेखाशाखा विभाग (मनिऑर्डर) | | 2 | 48,000/- | 96,000/- |
| | | | | एकूण रक्कम रुपये : | 2,40,000/- |

उपरोक्तप्रमाणे संस्थानचे विविध ठिकाणी बसविणेकामी दोन टन क्षमतेचे पाच नग ए.सी. खरेदीसाठी अंदाजे रक्कम रुपये 2,40,000/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी संस्थानचे विविध ठिकाणी बसविणेकामी दोन टन क्षमतेचे पाच नग ए.सी. खरेदीसाठी येणा-या अंदाजे रुपये 2,40,000/- खर्चास, कामास व वर्तमानपत्रात जाहीरात देऊन निविदा मागविणेकामी सदर प्रस्ताव मा. उप-समितीची सभेपुढे निर्णयार्थ सादर

**यावर सविस्तर चर्चा होऊन, मागील दि.२४.०६.२०१५ रोजीचे त्रीसदस्य समिती सभेतील निर्णय क्र.१६२ (२) अन्वये श्री साईबाबा हॉस्पिटलमधील प्रस्तावित आर्थो आय.सी.सी.यु. विभागामध्ये ०५ नग ए.सी. खरेदी करुन बसविणेकामी श्री व्यंकटेश्वरा टंकी प्रोजेक्ट प्रा.लि., पुणे यांचे एकत्रित रु.२,८५,९९५/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरलेले आहे. प्रस्तावित ए.सी. खरेदीचा त्यामध्ये समावेश करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस आहे.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

४३ **श्री साईप्रसादालयातील सोलर स्टीम कुकींग प्रकल्पाचे केमिकल सर्क्युलेशन करणेचे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

श्री साईप्रसादालयातील अन्न शिजविणेकामी इंधन खर्चात बचत होणेसाठी भारतातील सर्वात मोठा सोलर स्टीम कुकींग प्रकल्प दिनांक 30 जुलै 2009 रोजी कार्यान्वित करणेत आलेला आहे. प्रकल्पापासून दररोज सरासरी एक टन अन्न शिजले जाते.

2014 मध्ये नविन IBR कायाद्यानुसार प्रकल्पाचे मॉडीफिकेशनचे काम केलेले असून दर वर्षी बॉयलर इन्स्पेक्टर, बॉयलर कार्यालय, अहमदनगर महाराष्ट्र शासन यांचेमार्फत तपासणी केली जाते. दिनांक 19 जुन 2015 रोजी सोलर स्टीम प्रकल्पाची तपासणीची अंतीम मुदत होती. त्यानुसार शासकिय नियमानुसार प्रती हेडरकरीता रक्कम रु. 500/- प्रमाणे एकुण रक्कम रु. 9500/- फी ऑनलाईन अदा केलेली असून दिनांक 13.6.2015 रोजी बॉयलर इन्स्पेक्टर श्री कुंभार साहेब स्टीम प्रकल्पाची पाहणी करणेकामी शिर्डी येथे आले होते. तपासणी करतेवेळी एक हेडर ओपन केले असता त्यात स्केल अढळलेने त्यांनी केमिकल सक्युलेशन करुन घेणेस व त्यानंतर हायड्रो टेस्ट करणेबाबत सांगितले आहे.

हेडर व पाईपलाईन मध्ये स्केल साचलेले असल्याने हेडर मधून स्टीम आऊटलेट पाईप लाईनद्वारे बाहेर येते व सदरचे पाईपलाईन मध्ये साचते. त्यामुळे पाईपलाईन मध्ये स्केल साचून पाईप लाईन बंद होऊन लिकेज होऊ शकते. प्रकल्पास एकुण 19 नग हेडर असून प्रत्येक हेडर मधून केमिकल सक्युलेशन करणे आवश्यक आहे. केमिकल सक्युलेशन करणेकरीता प्रॉपर केमिकल, सक्युलेशन पंप व सक्युलेशन करणेकामी आवश्यकतेनुसार ॲसेम्ब्ली करावी लागणार आहे. प्रत्येक 19 हेडर पैकी 17 हेडरची क्षमता 500 लि.ची असल्याने त्या क्षमतेचा पंप व केमिकल लागणार आहे.

प्रकल्पाचे IBR नुसार हायड्रोलिक टेस्टींग करणेपुर्वी केमिकल सर्क्युलेशन करणे आवश्यक आहे. केमिकल सर्क्यलेशन करणारी एजन्सी स्थानिक ठिकाणी नसुन सदरचे काम IBR चे काम करणाऱ्या एजन्सीकडून करुन घ्यावे लागणार आहे. तसेच चार हेडरचे वॉटर लेव्हल गेज खराब झालेले असून ते नविन टाकावे लागणार आहे. त्याकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.नं. | तपशील | नग | अंदाजे दर रुपये | एकूण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| 1. | केमिकल सर्क्युलेशन | 19 | 10,000./- | 1,90,000/- |
| 2. | अर्धा इंच वॉटर लेव्हल गेज असेम्ब्ली | 5 | 8,000/- | 40,000/- |
| 3. | हायड्रोटेस्ट | 19 | 1,000/- | 19,000/- |
| | | | **एकूण रक्कम रुपये :** | **2,49,000/-** |

अक्षरी रुपये दोन लाख, एकोणपन्नास हजार मात्र

उपरोक्त प्रमाणे कामे करणेसाठी रक्कम रु. 2,49,000/- मात्र खर्च अपेक्षित आहे. केमिकल सर्क्युलेशन तसेच हायड्रोलिक टेस्टींग IBR मान्यता प्राप्त एजन्सीकडून निविदा मागावून करुन घेता येईल.

तरी सोलर स्टीम कुकींग प्रकल्पाचे केमिकल सर्क्युलेशन व हायड्रो टेस्ट करणेकरीता येणाऱ्या रक्कम रु. 2,49,000/- चे खर्चास, कामास व वर्तमानपत्रात जाहीरात देऊन IBR मान्यता प्राप्त एजन्सीकडून निविदा बोलविणेसाठी सदर प्रस्ताव मा. उप समिती सभेसमोर मान्यतेसाठी निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयातील सोलर स्टीम कुकींग प्रकल्पाचे केमिकल सर्क्युलेशन व हायड्रो टेस्ट करणेकामी वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन, IBR मान्यता प्राप्त एजन्सींकडून निविदा मागविणेस व याकामी येणा-या रु.२,४९,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस आहे.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

४४ **थर्मिक फ्ल्युड यंत्रणेचे केमिकल सर्क्युलेशन व नवीन थर्मिया बी ऑईल खरेदी करणेस मान्यता मिळणेबाबत.**

श्री साई प्रसादालयात इंधन खर्चात कपात व्हावी या उद्देशाने लाडू प्रसादाची बुंदी तळणेकामी तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने सन 2009 मध्ये थरमॅक्स मेक थर्मिक फ्लुड हिटींग यंत्रणा कार्यान्वित करण्यात आलेली आहे. यंत्रणा कार्यान्वित केलेमुळे खालीलप्रकारे फायदा झालेला आहे.

1. एल.पी. गॅसची बचत होते.
2. कर्मचा-यांना काम करतांना उष्णतेचा त्रास होत नाही.
3. तळलेली बुंदी एकसारख्या तापमानामुळे करपत नाही तसेच व्यवस्थितरित्या तळली जाते.
4. तापमानाचे अॅटोमॅटीक नियंत्रण असल्यामुळे तुप कमी लागते.
5. कुठल्याही प्रकारचा आवाज, धुर येत नाही.

प्रस्तुत यंत्रणा सन 2009 पासून अहोरात्र कार्यान्वित आहे. यंत्रणा देखभालीचे काम मेकॅनिकल विभागाकडील तांत्रिक कर्मचारी करतात मात्र वार्षिक पध्दतीने दुरुस्तीचे काम थर्मेक्स कंपनीचे अधिकृत सर्व्हीस एजन्सी मे. मॅक्सथर्म वर्क्स, औरंगाबाद यांना देणेत आलेले आहे.

सततच्या वापरामुळे यंत्रणेच्या पॅनमधील क्वॉईलला स्केल आलेले आहे. त्यामुळे बुंदी तळणेसाठी तुपाचे तापमान पुरेशे मिळत नसल्याने, कर्मचा-यांना बुंदी तळणेसाठी वेळ लागतो. थर्मिक फ्लुड यंत्रणेच्या पूर्ण पाईप व कढईच्या क्वॉईल यामधून तीन ते चार दिवस केमिकल सर्क्युलेशन करावे लागणार आहे व त्यानंतर यंत्रणेला कॉम्प्रेसर हवेच्या प्रेशरने क्लीन करावी लागणार असून यंत्रणेला संपूर्ण 627 लिटर थर्मिया बी ऑईल भरावे लागणार आहे. त्याकामी मे. मॅक्झीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांचेकडून दरपत्रक मागविण्यात आलेले असून खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे आहे :

| अ.नं. | दरपत्रक नंबर | तपशील | नग | दर | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1. | 5520 / दि. 18.06.2015 | केमिकल (Decarburizing In R) | 60 किलो | 450.00 | 27,000.00 |
| | | व्हॅट 12.50% : | | | 3,375.00 |
| 2. | 5619 / दि. 12.06. 2015 | Thermia B | 627 लि. | 158.00 | 99066.00 |
| | | व्हॅट 12.50% | | | 12,383.00 |
| | | वाहतुक खर्च : | | | 4,500.00 |
| 3. | 5619 / दि. 12.06. 2015 | थर्मिक फ्लुड टेस्टींग चार्जेस | 1 | 3,000.00 | 3,000.00 |
| | | सुपरव्हिजन चार्जेस | 1 | 20,000.00 | 20,000.00 |
| | | सर्व्हीस टॅक्स 14% : | | | 3,220.00 |
| | | **एकूण रुपये :** | | | **1,72,544.00** |

अक्षरी रुपये एक लाख, बहात्तर हजार, पाचशे चव्वेचाळीस मात्र

थर्मिक फ्लुड यंत्रणा बुंदी तळणेसाठी अत्यंत उपयुक्त असून, चांगले स्थितीत कार्यान्वित असणे आवश्यक आहे. त्यामुळे थरमॅक्स कंपनीचे नगर जिल्ह्याचे अधिकृत डिलर मे. मॅक्झीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांचेकडून करुन घेता येईल. तसेच याकामी येणा-या रुपये 1,72,544/- मात्रचे खर्चास मा. उप-समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

तरी बुंदी तळणेकामी वापरात असलेली थर्मिक फ्लुड यंत्रणेचे मे.मॅक्झीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांचेकडून केमिकल सर्क्युलेशन करुन ऑईल बदली करणेस व त्याकामी येणा-या रक्कम रुपये 1,72,544/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. उप-समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे श्री साई प्रसादालयामध्ये बुंदी तळणेकामी वापरात असलेल्या थर्मिक फ्लुड यंत्रणेचे मे.मॅक्झीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांचेकडून केमिकल सर्क्युलेशन करुन ऑईल बदली करणेस व त्याकामी येणा-या रक्कम रु.१,७२,५४४/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस आहे.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

४५ **मंदिर व मंदिर परिसर, द्वारावती आणि साईबाबा भकतनिवासस्थान येथील संपूर्ण ए.सी. यंत्रणेचे सन २०१५-१६ या वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेसाठी मान्यता मिळणेबाबत.**

श्रींचे मंदिर व परिसर, व्दारावती तसेच साईबाबा भक्तनिवासस्थान येथे श्री साईभक्तांच्या सोयीकरीता ए.सी. व फ्रिज बसवून कार्यरत आहेत. या ठिकाणी (1) दोन टन वॉल माऊंटेड ए.सी. 131 नग (2) दिड टन स्प्लिट ए.सी. 22 नग (3) एक टन स्प्लिट ए.सी. 57 नग (4) विन्डो ए.सी. दिड टन 7 नग (5) पाच टन डक्टेबल ए.सी. प्लांट 6 नग (6) डोमेस्टीक फ्रिज 13 नग (7) मोठे डिफ्रीज 5 नग इत्यादी यंत्रणा साईभक्तांचे सोयीकरीता कार्यरत आहेत. या यंत्रणेमधील काही स्पेअरपार्ट खराब झाल्यास ते तातडीने बदलणे गरजेचे असते. त्याकरीता सदरचे स्पेअरपार्टची खरेदी करावे लागतात. प्रत्येक कंपनीचे स्पेअरपार्ट हे दुस-या कंपनीच्या स्पेअरपार्ट पेक्षा वेगळे असल्याने तसेच सदरचे स्पेअरपार्ट हे जवळपास उपलब्ध होत नसल्याने ते थेट मुंबई, पुणे येथून खरेदी करावे लागतात. त्यामुळे हे स्पेअरपार्ट मिळवून फिटींग करुन यंत्रणा कार्यान्वित होईपर्यंत पर्यायाने ए.सी. यंत्रणा काही वेळा बंद ठेवावी लागते अथवा कमी क्षमतेवर कार्यान्वित ठेवावी लागते. सदरचा स्पेअरपार्ट उपलब्ध झाल्यानंतर तो बसवून ए.सी. यंत्रणा पूर्ण क्षमतेने कार्यान्वित केली जाते किंवा एखाद्या वेळी संबंधीत कंपनीचे प्रतिनिधी यांना बोलावून दुरुस्ती करुन घ्यावी लागते. या दुरुस्ती कार्यवाहीसाठी बराच अवधी लागण्याने पर्यायाने साईभक्तांना देण्यात येणा-या सेवा सुविधांमध्ये व्यतयय निर्माण

होतो. याकरीता प्रत्येक वर्षी तातडीने जागेवरच दुरुस्ती करणेकामी मंदिर व परिसर, व्दारावती तसेच साईबाबा भक्तनिवासस्थान या ठिकाणीचे संपूर्ण ए.सी. यंत्रणेचे CAMC देण्यात येते.

मागील सन 2014-2015 या वर्षाकरीता मा. त्रिसदस्यीय समितीचे दिनांक 12/06/2015 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 459 अन्वये संपूर्ण ए.सी. यंत्रणेचे वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकामी मे. कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई यांना जा.नं. एसएसएसटी/मेकॅनिकल/2653/2014 दिनांक 30 ऑगष्ट, 2014 अन्वये अन्वये 6,00,000/- इतक्या रकमेचा दिनांक 01/09/2014 ते 31/08/2015 या कालावधीकरीता कार्यादेश देण्यात आला होता. या सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट कालावधीमध्ये त्यांनी सर्व्हीस दिली असून, सर्व यंत्रणा सुरळीत कार्यान्वित आहेत. या सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टचा कालावधी दिनांक 31/08/2015 रोजी संपत आहे.

आता, मंदिर व परिसर, व्दारावती तसेच साईबाबा भक्तनिवासस्थान येथील संपूर्ण ए.सी. यंत्रणेचे सन 2015-2016 या वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) दिनांक 01/09/2015 ते 31/08/2016 या कालावधीसाठी देणेकामी पुढीलप्रमाणे खर्च अपेक्षीत आहे :

| Sr. No. | Description | Qty | Unit Rate | Amount |
|---|---|---|---|---|
| 1. | Annual Compressive Maintenance Contract of Central AHU with Condensing Units & Other Air Conditioning Units Installed Temple & Campus, Dwaravati, Saibaba Bhaktaniwassthan and other equipment as per attached list. | 1 Job | 8,00,000/- | 8,00,000/- |

उपरोक्तप्रमाणे मंदिर व परिसर, व्दारावती तसेच साईबाबा भक्तनिवासस्थान येथील संपूर्ण ए.सी. यंत्रणेचे सन 2015-2016 या कालावधीकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) दिनांक 01/09/2015 ते 31/08/2016 या कालावधीसाठी देणेकामी अंदाजे रक्कम रुपये 8,00,000/ (अक्षरी रुपये आठ लाख) मात्र खर्च येणे अपेक्षित आहे.

तरी मंदिर व परिसर, व्दारावती तसेच साईबाबा भक्तनिवासस्थान येथील संपूर्ण ए.सी. यंत्रणेचे सन 2015-2016 या कालावधीकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) दिनांक 01/09/2015 ते 31/08/2016 या कालावधीसाठी देणेकरीता येणा-या अंदाजे रुपये 8,00,000/- खर्चास, कामास व वर्तमानपत्रात जाहीरात देऊन ई-निविदा मागविणेकामी सदर प्रस्ताव मा. उप-समितीची सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे मंदिर व परिसर, व्दारावती तसेच साईबाबा भक्तनिवासस्थान येथील संपूर्ण ए.सी. यंत्रणेचे दिनांक ०१.०९.२०१५ ते ३१.०८.२०१६ या कालावधीसाठी वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकामी वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन, ई-निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.८,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस आहे.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

४६ **साईभक्तांचे सुविधेकरीता जुने प्रसादालय इमारतीत विस्तारीत दर्शन रांग सुविधा करणेबाबत.**

**मा. त्रिसदस्य समितीचे दिनांक ३० जानेवारी, २०१५ रोजीचे सभेत निर्णय क्र. ०६-**

" .. .. उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन २०१५ निमीत्ताने संस्थानतर्फे शिर्डी व शिर्डी परिसरात साईभक्तांसाठी अतिरीक्त सुविधा करणेसाठी प्रस्तावित कामांमधील शिर्डी व राहाता या शहरांबाहेरुन जाणारा नगर-मनमाड दुपरी बाह्यवळण रस्ता विकसीत करणेचे काम वगळून इतर कामे विहीत कार्यपध्दतीने करुन घेणेस व तयासाठी येणा-या अंदाजे रु.५७,५४,८०,०००/- मात्रचे खर्चास तत्वतः मान्यता देण्यात आली. याकामी येणा-या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी. व मा. खंडपीठाच्या मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करणेत यावी.

तसेच शिर्डी व राहाता या शहरांबाहेरुन जाणारा नगर-मनमाड दुपदरी बाह्यवळण रस्ता विकसीत करणेबाबत समिती प्रत्यक्ष आढावा घेऊन निर्णय देईल, असे ठरले."

**मा.उच्च न्यायालयाचे आदेश:-** प्रस्तुत प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने पी. आ. एल. क्र. १८/२०११ मधील सिव्हील ॲप्लीकेशन नं.३५००/२०१५ मध्ये दि.०६/०५/२०१५ रोजी मा.न्यायालयाने आदेश करुन रु.५७,५४,८०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता दिली आहे.

**प्रस्ताव-** कुंभमेळा कालावधीत होण-या गर्दीचे अनुषंगाने उपलब्ध करावयाच्या सोयी-सुविधांकरीता मा. उच्च न्यायालयाने रु.५७.५४ कोटी मात्र खर्चाचे प्रस्तावास मान्यता दिलेली आहे. कुंभमेळा कालावधीत जुने प्रसादालय इमारतीत करावयाच्या अतिरिक्त दर्शन रांगेसाठी रु.१,१०,७०,०००/- मात्रचे खर्चास व सदरहू खर्च कुंभमेळा करीता मा. उच्च न्यायालयाने परवानगी दिलेल्या रु. ५७.५४ कोटी मात्र या अपेक्षीत खर्चापैकी होणारे संभाव्य बचतीतून करणेस आणि याकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस मा. त्रिसदस्य समितीचे सभेत मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार सदरहू कामातील बांधकाम विषयक रु.४९,३६,१०९/- मात्र रकमेच्या कामांसाठी दि.३०/०५/२०१५ रोजीचे टिपणीद्वारे वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर ई-निविदा सूचना प्रसिध्द करणेस मान्यता देण्यात आली. त्यानुसार दि.१७/०६/२०१५ रोजीचे दिव्य मराठी औरंगाबाद व संध्यानंद, मुंबई या वर्तमानपत्रात निविदा सूचना प्रसिध्द करणेत आली होती. दि.०२/०७/२०१५ रोजी पर्यंत ई-निविदा अपलोड करणेचे अंतिम मुदतीत फक्त एकाच ठेकेदाराने निविदा अपलोड केल्याचे आढळून आली असल्याने, सदरहू कामासाठी फेर (2nd Call) ई-

निविदा सूचना प्रसिध्द करुन ई- निविदा मागविणेस दि.०३/०७/२०१५ रोजीचे टिपणी अन्वये मान्यता मिळालेली आहे. परंतू सिंहस्थ कुंळामेळा २०१५ साठी अल्प कालावधी असल्याने, निविदा प्रक्रीया राबविणे व काम पूर्ण करणे इ. बाबींसाठी पुरेशा कालावधी शिल्लक नसल्याने, दि.१२/०७/२०१५ रोजी मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर तथा सदस्य यांनी घेतलेल्या बैठकीत कामांचा आढावा घेतला त्यावेळी जुने प्रसादालय परिसरातून दर्शन रांगा करणेचेकाम दि.०५/०८/२०१५ पर्यंत पुर्ण करणेबाबत निर्देश दिले आहेत. त्यामुळे याकामासाठी चालू असलेली निविदा प्रक्रीया रद्द करुन सदर प्रकल्पात नमूद असलेल्या कामांपैकी आवश्यक तेथे किरकोळ स्वरुपाची (डाग-डुजी, रंगकाम, छताचे पत्रे बदलणे, दर्शन रागांसाठी आवश्यक तेथे कॉंक्रीट ओटे, भिंती इ. तोडफोड करणे) ही कामे तातडीने सुरु करावी लागणार आहेत.

(अ) उपरोक्त निर्देशांनुसार दर्शन रांगाचे सोयीसाठी जुने प्रसादालय इमातीचे आतिल भागास रंगकाम करणेसाठी श्री साईबाबा हॉस्पीटल अंतर्गत रंगकाम करणे कामाचे ठेकेदार सौरभ डेकोरेटर्स, पुणे यांचे जा. क्र. ६२१२/२०१५ दि.१६/०३/२०१५ रोजीचे कार्यादेशातील मंजूर दराने सदरहू रंगकाम करुन घेता येईल. यामध्ये रंगकामात भिंतींचा जुना रंग घासुन, प्रायमर व आवश्यक तेथे ऑईल बॉण्ड डिस्टेम्पर, ऑईल पेन्ट रंगकाम करणेसाठी रु.३,१३,७१०/- मात्र खर्च येईल.

तरी दर्शन रांगेसाठी जुने प्रसादालयातील अंतर्गत रंगकाम करणेसाठी ठेकेदार सौरभ डेकोरेटर्स, पुणे यांना मागिल मंजूर दराने कार्यादेश देणेस मान्यता मिळणेस विनंती.

(ब) दर्शन रांगेसाठी जुने प्रसादालयातील काही भिंती, मुख्य किचन मधील भिंतीच्या टाईल्स, तसेच काही कॉंक्रीट ओटे तोडावे लागणार आहेत. याकामी अंदाजे रक्कम रु.५०,०००/- मात्र खर्च अपेक्षीत आहे. यासाठी स्थानिक मजूरी ठेकेदारांकडून कोटेशन मागवून सदरचे काम करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

(क) जुने प्रसादालयातील मुख्य किचनच्या छताचे पत्रे खराब झालेले असून, पावसाळयात त्यातुन पाणी लिकेज होते. त्यामुळे सदर हॉलमधून दर्शन रांग करणेपूर्वी किचन हॉलमधील छताचे पत्रे बदलणे आवश्यक आहे. याकामी अंदाजे रक्कम रु.४,५०,०००/- मात्र खर्च अपेक्षीत आहे. यासाठी स्थानिक पुरवठादारांकडून विहीत पध्दतीने कोटेशन मागवून पत्रे खरेदी करुन मजूरी दराचे ठेकेदारामार्फत सदरचे पत्रे बसवून घेता येईल. त्यास मान्यता मिळणेस विनंती.

तरी उपरोक्त अ, ब व क प्रमाणे कार्यवाही करणेस मान्यतेस्तव सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्तांचे सोयीकरीता जुने प्रसादालय इमारतीत विस्तारीत दर्शन रांगेची सुविधा करणेसाठी प्रस्तावात नमुद केलेल्या अ, ब व क प्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस आहे.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०५** **सन- २०१५ मध्ये नाशिक येथे संपन्न होणा-या सिंहस्थ कुंभमेळयानिमित्त तसेच सन- २०१८ मध्ये होणा-या शताब्दी महोत्वाकरीता सुरक्षा साहित्य खरेदीकामी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.**

**प्रस्ताव-** मंगळवार दिनांक- ०२/०६/२०१५ रोजी सायंकाळी ६.३० वाजता मा.जिल्हाधिकारी कार्यालय सेथे मा.जिल्हाधिकारी साहेब यांच्या कक्षात सन- २०१५ मध्ये नाशिक येथे संपन्न होणा-या सिंहस्थ कुंभमेळयानिमित्त तसेच सन २०१८ रोजी होणा-या शताब्दी महोत्सवाकरीता सुरक्षा साहीत्य खरेदी करणेकामी झालेल्या सभेचे इतिवृत्त.

या सभेस खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

१. मा.श्री.विनय जोशी साहेब, जिल्हा सत्र न्यायाधिश तथा अध्यक्ष.
२. मा.श्री.अनिल कवडे साहेब, जिल्हाधिकारी तथा सदस्य.
३. मा.श्री. राजेंद्र जाधव साहेब, कार्यकारी अधिकारी तथा सदस्य.
४. मा.डॉ. सौरभ त्रिपाठी, पोलीस अधिक्षक, अहमदनगर.
५. श्री.अशोक ढगे, कन्सल्टंन्ट
६. श्री.आर.बी.आहेर, उप कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग.
७. श्री.व्ही.जी.कोते, सीसीटीव्ही कंट्रोल सेलप्रमुख.

सन २०१५ मध्ये नाशिक येथे संपन्न होणा-या सिंहस्थ कुंभमेळयानिमित्त तसेच सन २०१८ रोजी होणा-या शताब्दी महोत्सवाकरीता तातडीने सुरक्षा साहीत्य खरेदीबाबत कार्यवाही करण्याच्या दृष्टिने खालीलप्रमाणे विषय मांडण्यात आलेले आहे.

१. **Specilized Security Equipments** - X-ray Scanner with central control and portable X-ray Scanner, Under Vehicle Surveillance System, Exlosive Detection kit, Walky-Talky, Wirless Base Station, UPS with Inbuild Battery for XBIS and UVSS and DFMD along with electric Cablling with DB Pannel and MCB, Portable RF Jammer हे सर्व लिमटेड टेंडरव्दारे प्रसिध्द करुन, पीएसयु या सरकारी असलेल्या कंपन्यांना आमंत्रित करुन, त्यांचेकडुन निविदा घेण्यात याव्या असे ठरले.

२. इतर आवश्यक असलेले सुरक्षा साहीत्य यांचे टेंडर बनवुन प्रसिध्द करण्यात याचे असे ठरले.

३. सदरील प्रसिध्द करण्यात आलेले ओपन टेंडर हे लिमिटेड टेंडरमध्ये समाविष्ठ करणेबाबत ठरले.

४. सदरचा प्रस्ताव कन्सल्टंन्ट यांनी दि.०५/०६/२०१५ रोजी मा.पोलीस अधिक्षक कार्यालय यांना सादर करावा व त्यानंतर पोलीस अधिक्षक यांच्या सहमतीने निविदा कोणत्याही परीस्थितीत सोमवार पर्यंत प्रसिध्द कराव्यात असे ठरले.

५. कन्सल्टंन्ट यांनी लिमिटेड टेंडरमध्ये असलेले साहीत्य हे पीएसयु या सरकारी असलेल्या कंपन्यांना संपर्क साधुन, सदर सुरक्षा साहीत्य किती दिवसांत मिळेल याबाबत कार्यवाही करणेबाबत सांगण्यात आले.

६. पीएसयु सरकारी कंपन्यांना टेंडर प्रसिध्द झाल्यावर प्री-बीड मिटींगचे वेळी सादर करणेसाठी बोलविण्यात यावे, असे ठरले.

वरीलप्रमाणे सुरक्षा साहीत्यांबाबतची कार्यवाही लवकरात लवकर करण्यात यावी. असे आदेश देण्यात आले व सभा समाप्त करण्यात आली.

निर्णय क्र.२०५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त इतिवृत्ताची नोंद घेण्यात येऊन ते कायम करणेत आले.**

(कार्यवाही- सी.सी.टी.व्ही. कंट्रोल सेलप्रमुख)

---

विषय नं.०६ **सिंहस्थ कुंभमेळा- २०१५ निमित्त होणा-या गर्दीच्या पार्श्वभूमीवर करण्यात येणा-या कामाचा आढावा घेणेबाबत.**

निर्णय क्र.२०६ **आजचे सभेत वरील विषयावर चर्चा करणेसाठी मा.डॉ.सौरव त्रिपाठी, पोलिस अधिक्षक, अहमदनगर व त्यांचे सहकारी तसेच श्री.कुंदन सोनवणे- उपविभागीय अधिकारी, शिर्डी, श्री.धैर्यशील जाधव- मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी व संस्थानचे वतीने मा.औरंगाबाद खंडपीठामध्ये काम पहाणारे ॲडव्होकेट संजय चौकीदार हे उपस्थित होते. यावेळी खालीलप्रमाणे चर्चा झाली.**

**(१)** पोलिस अधिक्षक, अहमदनगर यांनी त्यांचे पत्राद्वारे शिर्डी शहर सुरक्षिततेसाठी शिर्डी शहरामध्ये व नगर-मनमाड रस्त्यावर संस्थानमार्फत सी.सी.टी.व्ही. यंत्रणा बसवून मिळणेची मागणी केलेली असून त्यासाठी अंदाजे रु.८१.७९ लाख मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरहू सी.सी.टी.व्ही. यंत्रणा ही सिंहस्थ कुंभमेळयाकरिताच पोलिस विभागाने सुचविलेली आहे व ही यंत्रणा सुरु करणे अत्यंत गरजेचे आहे, असे समितीला वाटते. त्यामुळे या विषयाबाबत मा.औरंगाबाद खंडपीठामध्ये संस्थानचे वतीने काम पहाणारे ॲडव्होकेट श्री.चौकीदार, की जे आजच्या सभेत उपस्थीत आहेत, त्यांचा सल्ला घेण्यात आला. या कामासाठी तसेच संस्थान परिसरामध्ये सी.सी.टी.व्ही. यंत्रणा उभारणीकामी सी.सी.टी.व्ही. कन्सटल्टंटची नेमणूक करणेही गरजेचे आहे. याकरीता पोलिस विभागासाठी सी.सी.टी.व्ही. यंत्रणा व संस्थानला आवश्यक असलेली कन्सल्टंटची नेमणूक याकामी समांतर निविदा प्रक्रिया तात्काळ सुरु करणेत यावी.

**(२)** सिंहस्थ कुंभमेळा कालावधीमध्ये शिर्डी शहरामध्ये स्त्रीयांसाठी शौचालयाची व्यवस्था करणे अत्यंत गरजेचे आहे, त्यासाठी ०३ जागा निश्चित करण्यात आलेल्या आहेत. या जागांवर शौचालयांची व्यवस्था करणेकामी अंदाजे रु.५० लाख मात्र पर्यंत खर्च अपेक्षित असून स्त्रीयांसाठी शौचालय नसलेबाबत तक्रारी येत आहेत. याकरीता सदरहू खर्चही मा.औरंगाबाद खंडपीठाने सिंहस्थ कुंभमेळयासाठी रु.५७ कोटी मात्र खर्चामधून करणेत यावा व वेळेची मर्यादा विचारात घेता याकामीची ई-निविदाची प्रक्रीया लगेच चालू करणेत यावी.

मा.उच्च न्यायालयामधील Civil Application No.3500/2015 in Public Interest Litigation No.18/2011 वर मा.उच्च न्यायालयाच्या दि.०६/०५/२०१५ रोजीच्या आदेशान्वये सिंहस्थ कुंभमेळा कालावधीमध्ये भक्तांच्या सोयी-सुविधा व संरक्षणासाठी रु.५७,५४,८०,०००/- मात्रचे खर्चास मंजुरी दिलेली आहे. मा.खंडपीठाच्या या मंजूर खर्चामधून उपरोक्त दोन्ही कामे करावयाची असल्याने याबाबत सल्ला घेणेसाठी मा.औरंगाबाद खंडपीठामध्ये संस्थानचे वतीने काम पहाणारे ॲडव्होकेट संजय चौकीदार यांना सभेसमोर बोलविणेत आले होते.

समिती सभेने ॲड.चौकीदार यांचेबरोबर याकामी चर्चा केली व मा.खंडपीठाने सिंहस्थ कुंभमेळा कालावधीमध्ये भक्तांच्या सोयी-सुविधा व संरक्षणासाठी रु.५७,५४,८०,०००/- मात्र पर्यंत खर्च करण्यास परवानगी दिलेली आहे. कुंभमेळयासाठी निश्चितच या रकमेपेक्षा कमी खर्च होणार आहे व या खर्चामधून शिर्डी शहरासाठी सी.सी.टी.व्ही. यंत्रणा व स्त्रीयांसाठी शौचालय ही कामे करणार आहोत, याबाबतची माहिती मा.खंडपीठास देण्यात यावी, अशा सूचना देण्यात आल्या.

**(३)** सुरक्षा साहित्य खरेदी करणेकामीच्या प्री-बीड मिटींगसाठी निविदाधारकांना नमुन्यांसह उपस्थित राहणेबाबत कळविणेत आले होते. परंतु एकही निविदाधारक उपस्थित नव्हते. तरी आता सोमवार दि.२७.०७.२०१५ रोजी दुपारी ०४.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे पुन्हा प्री-बीड मिटींगसाठी संबंधीतांना नमुन्यांसह आमंत्रित करणेत यावे.

**(४)** कुंभमेळया दरम्यान वाहन पार्किंगच्या ठिकाणी ज्या भक्तांची मागणी असेल त्यांचेसाठी प्री-पेड ॲटो रिक्षाची सोय उपलब्ध करुन देणेकरीता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे उपविभागीय अधिकारी, शिर्डी यांनी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, श्रीरामपूर यांचेसमवेत सभेचे आयोजन करावे.

**(५)** शिर्डी शहरातील नगर-मनमाड रस्त्यावरील ट्रॅफीक सिग्नल त्वरीत चालू करणेबाबत मुख्याधिकारी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना निर्देश देण्यात आले व त्यांनी दि.२८.०७.२०१५ पर्यंत सिग्नल चालू होतील याची ग्वाही दिली.

**(६)** मंदिर परिसर सुरक्षीततेसाठी नेमणूक केलेल्या पोलिस कर्मचा-यांची कुंभमेळयाच्या कालावधीमध्ये हत्यारे ठेवणेची तातडीची गरज लक्षात घेता, संस्थान व पोलिस अधिका-यांनी एकत्रित पहाणी करुन तात्पुरत्या स्वरुपात जागा निश्चित करावी. तसेच कायमस्वरुपी जागेबाबतचा सविस्तर प्रस्ताव यथावकाश सभेसमोर ठेवणेत यावा.

**(७)** श्रींचे द्वारकामाई समोर मोकळया जागेमध्ये पोलिसांसाठी राहूटी उभारणेकामी तात्पुरत्या स्वरुपात जागा उपलब्ध करुन देण्यात यावी.

(८) मंदिर परिसराच्या महाद्वारांवर बुलेटप्रुफ मोर्चे बनविणेसाठी ठेकेदारास कार्यादेश देण्यात आलेला आहे परंतु आजतागायत सदरहू मोर्चे तयार झालेले नाहीत. याकरीता सध्याचा ठेकेदार काम करण्यास उत्सुक नसल्यास निविदेतील अटी/ शर्तीनुसार त्याचेवर दंडात्मक कार्यवाही करणेत येऊन, द्वितीय निम्नतम दरधारक ठेकेदारास सदरहू काम देण्यात यावे.

(९) पोलिस उपअधिक्षक, शिर्डी यांचेकडून महाद्वारांवरील पोलिस कर्मचा-यांना त्यांच्या कर्तव्याबाबत योग्य त्या सुचना दिल्या जातील, अशी पोलिस अधिक्षक, अहमदनगर यांनी सभेसमोर माहिती दिली.

(१०) शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना शहर साफसफाई करणेकामी १०० अकुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणेऐवजी १०० अकुशल कंत्राटी कर्मचा-यांचे वेतनाऐवढी रक्कम देण्यात यावी. नगरपंचायत, शिर्डी यांनी कर्मचा-यांची नेमणूक करुन त्यांचेवर नियंत्रण ठेवावे.

(११) यापुर्वी वेळोवेळी झालेल्या चर्चेप्रमाणे शिर्डी व शिर्डी परिसरातील प्लॅस्टीक कचरा नष्ट करणेसाठी संस्थानमार्फत प्रकल्प उभारणीकामी सविस्तर माहितीसह सभेसमोर प्रस्ताव सादर करावा. शिडी परिसरातील प्लॅस्टीक कचरा गोळा करावयाची जबाबदारी नगरपंचायत, शिर्डीची राहील.

(१२) कुंभमेळयाच्या कालावधीमध्ये भाविकांची गर्दी होऊ नये म्हणून एका दिवसामध्ये जास्तीत तास्त साईभक्तांना श्रींचे दर्शन घेता यावे, याकरिता समाधी मंदिरामधील दर्शनाची वेळ वाढविणेबाबत सविस्तर अभ्यास करुन सभेसमोर प्रस्ताव सादर करणेत यावा.

तसेच सिंहस्थ कुंभमेळा निमित्त करण्यात येत असलेल्या विविध सुविधांसमवेत या कामाच्या प्रगतीबाबतचा दैनंदिन अहवाल मा.अध्यक्ष महोदय व समिती सदस्यांना माहितीसाठी पाठविणेत यावा.

(कार्यवाही- बांधकाम/ कुंभमेळा कक्ष/ संरक्षण/ कामगार/ जनसंपर्क/ मंदिर/ सीसीटीव्ही)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.**

आयत्या वेळेचा
विषय नं.०१ **श्री गुरुपौर्णिमा उत्सव- २०१५ मध्ये लाडू विक्री काऊंटरवर लाडू पाकीटांऐवजी बुंदी पाकिटे विक्रीबाबत.**

प्रस्ताव- दिनांक २०/०७/२०१५ रोजी आयोजित श्री गुरुपौर्णिमा उत्सव- २०१५ रोजी अधिक्षक/विभागप्रमुख यांचे उपस्थितीत झालेल्या आढावा बैठकीत मा.कार्यकारी अधिकारीसो. तसेच उपकार्यकारी अधिकारीसो. यांचेशी चर्चेत मा.कार्यकारी अधिकारीसो. यांनी पुढीलप्रमाणे निर्देश दिले आहेत.

श्री गुरुपौर्णिमा उत्सव- २०१५ हा दिनांक ३०/०७/२०१५ ते ०१/०८/२०१५ या कालावधीत संस्थानमार्फत साजरा केला जाणार आहे. या काळात साईभक्तांची मोठया प्रमाणावर गर्दी होणार आहे. गर्दीच्या काळात ज्या साईभक्तांना घरी श्रींचा प्रसाद न्यावयाचा आहे त्यांचेकरीता लाडू प्रसाद काऊंटरवर १५० ग्रॅम वजनाचे (३ लाडूचे) पाकीटाऐवजी त्याच वजनाचे सुटी बुंदीचे पाकीट विक्रीसाठी उपलब्ध करुन दयावेत असे निर्देश दिलेले आहेत.

तरी उपरोक्तप्रमाणे कार्यवाहीस मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.२०७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सिंहस्थ कुंभमेळा व त्यामधील पर्वणींच्या वेळी श्रींचे दर्शनासाठी प्रचंड गर्दी होण्याची शक्यता असून दर्शन झाल्यानंतर साईभक्त श्रींचा प्रसाद म्हणून विक्री करणेत येत असलेले लाडू प्रसाद पाकिट विकत घेत असतात. परंतु लाडूप्रसाद निर्मिती करतेवेळेस लाडू वळविणे व सुकविणेसाठी बराच कालावधी लागतो. याकरिता जास्तीत जास्त साईभक्तांना श्रींच्या प्रसादाचा लाभ घेता यावा म्हणून लाडू पाकिटाऐवजी लाडू पाकिटाच्या वजनाऐवढी (१५० ग्रॅम) बुंदी पाकिटे साईभक्तांना प्रायोगिक तत्वावर श्री गुरुपौर्णिमा उत्सव- २०१५ पासून उपलब्ध करुन देण्यात यावीत.**

**तसेच या निर्णयाची अंमलबजावणी श्रींचे उत्सव व गर्दीच्या कालावधीमध्ये करण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, लाडू प्रसाद निर्मिती विभाग/ प्र.अधिक्षक, कॅन्टीन विभाग)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.०२ **नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन- २०१५ चे कालावधीत संस्थान परिसर, अतिरिक्त दर्शनरांग व नियोजीत वाहनतळांचे ठिकाणी साईभक्तांचे सोयीसाठी पत्रा शेड मंडप व इतर अनुषंगिक व्यवस्था करणेकामी प्राप्त ई-निविदांवर निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :-**

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

**मा. व्यवस्थापन समिती निर्णय :-** मा. व्यवस्थापन समितीचे दि.३० जानेवारी, २०१५ रोजीचे सभेत निर्णय क्र.०६ खालीलप्रमाणे संमत करणेत आलेला आहे.

*"... .. उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन-२०१५ निमित्ताने संस्थानतर्फे शिर्डी व शिर्डी परिसरात साईभक्तांसाठी अतिरिक्त सुविधा करणेसाठी प्रस्तावित कामांमधील शिर्डी व राहाता या शहरांबाहेरुन जाणारा नगर-मनमाड दुपदरी बाह्यवळण रस्ता विकसीत करणेचे काम वगळून इतर कामे विहीत कार्यपध्दतीने करुन घेणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रु.५७,५४,८०,०००/- मात्रचे खर्चास तत्वतः मान्यता देण्यात आली. याकामी येणा-या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करणेत यावी. तसेच शिर्डी व राहाता या शहरांबाहेरुन जाणारा नगर-मनमाड दुपदरी बाह्यवळण रस्ता विकसीत करणेबाबत समिती प्रत्यक्ष आढावा घेऊन निर्णय देईल, असे ठरले."*

**मा. उच्च न्यायालय खंडपीठ परवानगी आदेश :- Civil Application No.3500/2015 in Public Interest Litigation No.18/2011** वर मा. उच्च न्यायालय यांनी दि.०६/०५/२०१५ रोजी दिलेल्या आदेशान्वये रु.५७,५४,८०,०००/- मात्रचे खर्चास परवानगी देणेत आलेली आहे.

**प्रस्तावना :-** दि.२७ ऑगष्ट २०१५ ते दि.२६ सप्टेंबर २०१५ या कालावधीत मुख्य शाही स्नानाच्या तिथी असल्याने शिर्डी येथे जास्तीत जास्त गर्दी होण्याची शक्यता आहे. त्यासाठी शिर्डी व परिसरात साईभक्तांकरीता अतिरिक्त सोयी-सुविधा उपलब्ध करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने वर नमूद गर्दीचे कालावधीत भक्तांसाठी करावयाच्या अतिरिक्त सुविधांमध्ये साई भक्तांच्या वाहनांसाठी वाहनतळे तयार करणे, जड वाहतूक बाह्यवळण रस्त्याने वळविणे, तात्पुरत्या स्वरुपाचे निवारा शेडस्, अतिरिक्त दर्शनरांग व्यवस्था, तात्पुरत्या सावर्जनिक स्वच्छतागृहांची व्यवस्था, पाणीपुरवठा, सुरक्षा, अतिरिक्त प्रसाद भोजनव्यवस्था, अल्पोपहार इ. सोयी-सुविधा संस्थानतर्फे करणे प्रस्तावित आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयान्वये इकडील विभागामार्फत संस्थान परिसर, अतिरिक्त दर्शनरांग व नियोजीत वाहनतळांचे ठिकाणी साईभक्तांचे सोयीसाठी पत्रा शेड मंडप व इतर अनुषंगिक व्यवस्था करणेकामी दि. ०८/०५/२०१५ रोजीचे मंजूर टिपणी अन्वये या कामी वर्तमान पत्रात व संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन ई –निविदा मागविणेत आल्या होत्या. प्राप्त ई- निविदांचे तांत्रीक लिफाफ्यातील कागदपत्रांची छाननी केली असता फक्त ०२ ठेकेदारच पात्र होत असल्याने याकामी दि.२५/०६/२०१५ रोजीचे मंजुर टिपणी अन्वये वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर दुस-यांदा निविदा मागविणेसाठी(Second Call) जाहिरात प्रसिध्द करण्यात आली व सदरहू कामाची ई-निविदा ही www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर अपलोड करणेत आलेली होती. ई-निविदा प्रक्रियेच्या तारखांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Activity | Date & Time |
|---|---|---|
| 1) | Tender publishing date: | 06/07/2015. |
| 2) | Tender document download start date: | 06/07/2015 from 11:00 Hrs. |
| 3) | Pre-bid meeting date: | 07/07/2015 from 11:00 Hrs. |
| 4) | Tender document download end date: | 13/07/2015 upto 17:00 Hrs. |
| 5) | Bid submission start date: | 06/07/2015 from 12:00 Hrs. |
| 6) | Bid submission closing date: | 13/07/2015 upto 17:00 Hrs. |
| 7) | Technical bid hard copy submission date: | 14/07/2015 upto 17:00 Hrs. |
| 8) | Bid opening date (Technical): | 15/07/2015 at 11:00 Hrs. (If possible). |
| 9) | Bid opening date (Commercial): | 15/07/2015 at 15:00 Hrs. (If possible). |

उपरोक्तकामी खालील ०६ ठेकेदार यांनी ई-निविदा अपलोड केलेल्या आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१ | काळे ॲण्ड सन्स, पुणे | ०२ | विजय मंडप ॲण्ड साऊंड सव्हिर्सेस, औरंगाबाद |
| ०३ | जवाहर स्पिकर्स ॲण्ड मंडप कॉन्ट्रक्टर, तुळजापूर | ०४ | लल्लूजी ॲण्ड सन्स, औरंगाबाद |
| ०५ | निकिता एस.बी.एस. को-ऑप सोसायटी, औरंगाबाद | ०६ | आर. एम. बी. इवेन्ट मॅनेजमेंट प्रा. लि., मुंबई |

वरील प्रमाणे अपलोड झालेल्या ई-निविदांचा लिफाफा क्र.०१ (Technical Bid) दि.१५/०७/२०१५ रोजी सकाळी ११:०० वाजता मा. प्रशासकिय अधिकारी, लेखाधिकारी व उपस्थित ठेकेदार यांचे समक्ष उघडणेत येऊन, अपलोड केलेल्या निविदाधारकांचे कागदपत्रांची छाननी करणेत आली असून त्याचा अहवाल खालीलप्रमाणे आहे.

| अ.न. | ठेकेदाराचे नाव | शेरा |
|---|---|---|
| ०१ | काळे ॲण्ड सन्स, पुणे | पात्र |
| ०२ | विजय मंडप ॲण्ड साऊंड सव्हिर्सेस, औरंगाबाद | अपात्र |
| ०३ | जवाहर स्पिकर्स ॲण्ड मंडप कॉन्ट्रक्टर, तुळजापूर | अपात्र |
| ०४ | लल्लूजी ॲण्ड सन्स, अहमदाबाद | पात्र |
| ०५ | निकिता एस. बी. एस. को-ऑप सोसायटी, औरंगाबाद | अपात्र |
| ०६ | आर. एम. बी. इवेन्ट मॅनेजमेंट प्रा. लि., मुंबई | पात्र |

वर नमूद केलेप्रमाणे पात्रताधारक ०३ ठेकेदारांच्या वाणिज्यीक निविदा (Commercial Bid) त्याच दिवशी दि.१५/०७/२०१५ रोजी सांय ०४:३९ वाजता मा. प्रशासकिय अधिकारी, लेखाधिकारी व उपस्थित ठेकेदार यांचे समक्ष उघडणेत आलेले आहेत. ठेकेदार यांनी देऊ केलेल्या दरांचा तपशिल खालीलप्रमाणे आहेत.

| अ.न. | ठेकेदाराचे नाव | निविदा रक्कम (रु.) | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | लल्लूजी अॅण्ड सन्स, अहमदाबाद | २,२६,२८,८००/- | निम्नतम |
| ०२ | काळे अॅण्ड सन्स, पुणे | २,५५,६९,२५०/- | व्दितीय निम्नतम |
| ०३ | आर. एम. बी. इवेन्ट मॅनेजमेंट प्रा. लि., मुंबई | २,६५,२९,०५०/- | तृतीय निम्नतम |

प्रस्ताव:- वरीलपैकी ठेकेदार लल्लूजी अॅण्ड सन्स, अहमदाबाद यांची रु.२,२६,२८,८००/- मात्र रकमेची निम्नतम दराची निविदा स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देणेसाठी मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.२०८ **सिंहस्थ कुंभमेळयाच्या कालावधीचा विचार करता, तातडीची आवश्यकता म्हणून सिंहस्थ कुंभमेळा सन-२०१५ चे कालावधीत संस्थान परिसर, अतिरिक्त दर्शनरांग व नियोजीत वाहनतळांचे ठिकाणी साईभक्तांचे सोयीसाठी पत्रा शेड मंडप व इतर अनुषंगिक व्यवस्था करणेकामीच्या उपरोक्त प्रस्तावास मा.अध्यक्ष व सदस्य यांची चक्रीय पध्दतीने मान्यता घेण्यात आलेली आहे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात येऊन, त्यास मान्यता देण्यता आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.०३ **वाढीव दर्शन रांगेकरीता मंदिर परिसरात (16 गुंठे) स्टेनलेस स्टील वॉकर रेलीग तसेच मंदिर दर्शन रांगेकरीता त्रिस्तरीय रॅम्प तयार करुन बसविणेकामी कार्यादेश देणेबाबत.**

प्रस्ताव- नाशिक सिहस्थ कुंभमेळा सन 2015 मध्ये दिनांक 27 ऑगष्ट 2015 ते 26 सप्टेंबर, 2015 या कालावधीत शिर्डी येथे भाविकांची प्रंचड गर्दी होण्याची शक्यता आहे. त्याकामी करावयाच्या कार्यवाहीसाठी संस्थानचे संबंधीत विभागांनी दिलेल्या अंदाजपत्रकीय खर्चाचा एकत्रित प्रस्तावास मा. त्रिसदस्य समितीचे दिनांक 30/01/2015 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 6 अन्वये तसेच त्यानुसार नियोजित कामासाठी येणा-या अंदाजे रुपये 57,54,80,000/- मात्रचे खर्चास मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी दिनांक 06/05/2015 रोजी दिलेल्या आदेशान्वये मान्यता दिलेली आहे. सदर मान्यता मिळालेल्या खर्चामध्ये मंदिर (16 गुंठे) परिसरात स्टेनलेस स्टील वॉकर रेलींग तयार करुन बसविणेकामी येणा-या खर्चाचा सामावेश आहे.

मा. त्रिसदस्य समितीचे व मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचे मान्यतेनुसार सदरहु कामांसाठी इकडील विभागामार्फत निविदा तयार करुन संस्थान संकेतस्थळावर व वर्तमानपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. या कालावधीत 6 (सहा) निविदाधारकांकडून ई-निविदा प्राप्त झाल्या होत्या. सदरील प्राप्त झालेल्या 6 ई-निविदांचा लिफाफा क्रमांक 1 (टेक्नीकल बीड) दिनांक 22/06/2015 रोजी मा. प्रशासकीय अधिकारी यांचे समक्ष उघडणेत आले असून, प्राप्त कागदपत्रांची छाननी केल्यानंतर त्यामध्ये सर्व सहाही निविदाधारक पात्र झाले होते. पात्र निविदाधारकांचे कमर्शियल बीड दिनांक 22/06/2015 रोजी मा. कार्यकारी अधिकारी, प्रशासकीय अधिकारी यांचे समक्ष उघडणेत आले असता, त्यातील मे.अपूर्वा इंजिनिअरींग वर्क्स, औरंगाबाद यांचे दर निम्नतम रुपये 24,91,710/- असून, त्यांचे दरांचा तपशील खालीलप्रमाणे:

| No. | Sr. No. | Material Details | Qty | Unit | Rate | Total Amount |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | **Stainless Steel (Walker Type) Railing** | | | | | |
| | 1.1 | Stainless Steel SS 304 Square Pipe – 40 mm x 40 mm x 2 mm Thick (14 Swg) | 5120 | Feet | 235/- | 12,03,200/- |
| | 1.2 | Stainless Steel SS 304 Round Pipe – 25 mm Dia. X 1.6 mm Thick (16 Swg) | 8320 | Feet | 93/- | 7.73.760/- |
| | 1.3 | Stainless Steel SS 304 Bottom Patti 100 mm X 3.00 mm Thick | 275 | Feet | 310/- | 85,250/- |
| | 1.4 | Stainless Steel Nut Bolt M 10 x 150 mm | 110 | Nos. | 25/- | 2,750/- |
| | 1.5 | Stainless Steel Nut Bolt M 10 x 60 mm | 100 | Nos. | 15/- | 1,500/- |
| | 1.6 | Stainless Steel SS 304 Hinges & Tower Bolts, Sliding Roller, Bracket etc. | 1 | Lot. | 1,500/- | 1,500/- |
| 2 | **Stainless Steel Ramp with Railing in Temple** | | | | | |
| | 2.1 | Stainless Steel SS 304 Square Pipe 40 mm x 40 mm x 3 mm Thick (10 Swg) | 650 | Feet | 355/- | 2,30,750/- |
| | 2.2 | Stainless Steel SS 304 Round Pipe 25 mm Dia. x 1.6 mm Thick (16 Swg) | 800 | Feet | 125/- | 1,00,000/- |
| | 2.3 | Aluminum Chequered Plate 5 mm Thick | 260 | Sq.Ft | 350/- | 91,000/- |
| | 2.4 | Locking Arrangement | 1 | Nos. | 2,000/- | 2,000/- |
| 3 | | | | | **Total Amount Rs :-** | **24,91,710/-** |

**In Word Rupees Twenty Four Lakh, Ninety One Thousand, Seven Hundred Ten Only**

मे. अपुर्वा इंजिनिअरींग वर्क्स, औरंगाबाद यांचे दर रुपये 24,91,710/- निम्नतम असल्याने, त्यांचे निम्नतम दर स्विकारुन त्यांना कार्यादेश देणेस मान्यतेचा प्रस्ताव दिनांक 24/06/2015 रोजीचे मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे सादर करण्यात आला होता. उपरोक्त दराबाबत सदर सभेमध्ये सविस्तर चर्चा होऊन, प्राप्त झालेले निम्नतम दर DSR नुसार योग्य आहेत किंवा कसे याबाबत अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर यांचा अभिप्राय घेवून निम्नतम दरधारकास कार्यादेश देणेबाबत पुढील कार्यवाही करावी, असे निर्देश दिलेले आहेत.

वरील निर्देशानुसार अधिक्षक अभियंता, सार्वजनीक बांधकाम मंडळ, अहमदनगर यांना इकडील जा. नं. एसएसएसटी/ मेकॅनिकल/ 1776/2015 दिनांक 27 जून, 2015 नुसार स्टेनलेस स्टील वॉकर रेलींग तयार करुन बसविणे कामाकरीता ई-निविदेव्दारे प्राप्त निम्नतम दर DSR नुसार योग्य आहेत किंवा कसे? याबाबत स्पष्ट अभिप्राय कळविणेबाबत पत्र पाठविण्यात आले होते. त्यानुसार कार्यकारी अभियंता, सार्वजनीक बांधकाम विभाग, संगमनेर यांनी त्यांचे दिनांक 23/07/2015 रोजीचे पत्राने "उपरोक्त संदर्भीय विषयान्वये आपला प्रस्ताव व कार्यालयास दर तपासणीसाठी प्राप्त झालेला असून, सदर प्रस्तावातील बांधकाम साहित्याचे दर हे अ.नगर जिल्हा करीता मंजुर दरसुची सन 2013-14 मध्ये समाविष्ठ नाही. त्यामुळे या बाबतचा निर्णय आपण आपले स्तरावर घ्यावा" असे कळविलेले आहे.

तरी कार्यकारी अभियंता, सार्वजनीक बांधकाम विभाग, संगमनेर यांनी दिलेला अभिप्राय तसेच ई-निविदेव्दारे प्राप्त निम्नतम दरानुसार विषयांकित कामासाठी मे.अपूर्वा इंजिनिअरींग वर्क्स, औरंगाबाद यांनी देऊ केलेले दर स्विकारुन, त्यांना कार्यादेश देणेबाबत प्रस्ताव मा. त्रिसदस्यीय समितीपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.२०९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सिंहस्थ कुंभमेळा सन- २०१५ चे कालावधीत वाढीव दर्शन रांगेकरीता मंदिर परिसरात (16 गुंठे) स्टेनलेस स्टील वॉकर रेलीग तसेच मंदिर दर्शन रांगेकरीता त्रिस्तरीय रॅम्प तयार करुन बसविणेकामी मे.अपूर्वा इंजिनिअरींग वर्क्स, औरंगाबाद यांचे रु.२४,९१,७१०/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.०४ **पाणी पुरवठा विभागास सिंहस्थ कुंभमेळा- २०१५ करीता आवश्यक प्लंबींग साहित्य खरेदीकामी प्राप्त निविदेतील न्युनतम दरधारकांना पुरवठा आदेश देणेबाबत.**

प्रस्ताव- पाणी पुरवठा विभागास सिंहसृथ कुंभमेळा – २०१५ करीता पृलंबिंग साहितृय खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.१७,९७,९६०/- (अक्षरी रु. सतरा लाख सत्यान्नव हजार नऊशे साठ) मात्रचे खर्चास मा.त्रिसदस्य समिती सभा दि.३०.१.२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ०६ नुसार मान्यता मिळालेली आहे. तसेच दि.०६.०५.२०१५ रोजी मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांची मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार सदरचा प्रस्ताव दि.१४.०५.२०१५ रोजी पुढील कार्यवाहीसाठी इकडील कार्यालयास प्राप्त झालेला आहे.

पाणी पुरवठा विभागास सिंहसृथ कुंभमेळा २०१५ करीता सदर पृलंबिंग साहितृयाची तातडीची आवशृयकता असलृयाने सदरची खरेदी लवकरात लवकर करणेबाबत कळविण्यात आलेले आहे.

सदरचे खरेदीची प्रक्रिया जनसंपर्क विभागामार्फत वर्तमानपत्रात जाहिरात देऊन ई-निविदा पद्धतीने करण्यात आलेली होती. सृकॅन केलेलृया तांत्रिक कागदपत्रांचे लिफाफे दि.२०.०६.२०१५ रोजी सायं.०५.०० वा पर्यत ऑनलाईन मागणी करण्यात आलेले होते.

ऑनलाईन निविदेसोबत सादर केलेले (Technical Bid) दि.२५.०६.२०१५ रोजी मा.कार्यकारी अधिकारी महोदय, मा.प्रशासकीय अधिकारी, खरेदी विभाग व मा.मुखृयलेखाधिकारी यांचे समक्ष उघडले असता, फकृत दोनच तांत्रिक निविदा प्राप्त झालेलृया आहेत. सदरचृया दोन तांत्रिक निविदा उघडलृया असता दोनही निविदाधारकांचृया निविदा तांत्रिकदृषृटया पात्र ठरलेलृया आहेत. परंतू टेंडर नियमानुसार तीन निविदा आवशृयक आहे. पाणी पुरवठा विभागास सिंहसृथ कुंभमेळा २०१५ करीता सदर पृलंबिंग साहितृयाची तातडीची आवशृयकता असलृयाने याकरीता अलृप कालावधीची सात दिवसांची ई-निविदा प्रक्रिया राबवून पुढील खरेदीची प्रक्रिया राबविणेत यावी. याकामी तातडीने जनसंपर्क विभागामार्फत अहमदनगर, नाशिक व मुंबई येथिल वर्तमानपत्रात थेट जाहीरात प्रसिध्द करण्यात यावी, असे तांत्रिक निविदा उघडणेचृया वेळी ठरले होते.

तृयानुसार जनसंपर्क विभागामार्फत जाहिरात प्रसिधृद करुन अलृप मुदतीची फेर ई-निविदा प्रक्रिया राबविणेत आलेली होती. ऑनलाईन प्रापृत तांत्रिक व मुळ निविदा दि.१३.०७.२०१५ रोजी मा. प्रशासकीय अधिकारी व लेखाधिकारी यांचे समक्ष उघडलृया असता तीन निविदाधारकांचृया निविदा प्रापृत झालेलृया आहेत. तीनही निविदाधारकांचृया तांत्रिक निविदा पात्र ठरलेलृया आहेत. नंतर मुळ निविदा उघडून तृयाचा तुलनात्मक तकृता तयार केलेला आहे. सदरचे तकृतृयामधृये नृयुनतम दरधारकांचे दर अधोरेखित केलेले आहेत.

सदर तकृतृयानुसार, मे. एकृसल ट्रेडींग कंपनी, मुंबई यांचे अ.नं. १,२,३,४,५,६,७,८,९,१०,११ ,१२,१३, १५,१६, १७,१८, १९,२०,२१,२२,२४,२५,२६,३३,३९,४२,४४,४५,४६,४८,४९ चे साहितृयासाठी, मे.एशियन सेलृस कार्पोरेशन, नाशिक यांचे अ.नं.१४,२८,३१,३२,३४,३५,३६,३७,३८,५२ चे साहितृयासाठी तर मे. युनियन ट्रेडींग कंपनी, नाशिक यांचे अ.नं. २३,२९,३०,४०,४१,५०,५१ चे साहितृयासाठी नृयुनतृतम दर आलेले आहेत. तसेच अ.नं.२७, ४३, ४७ चे साहितृयासाठी समान दर आलेले आहेत. तृया साहितृयासाठी समप्रमाणात विभागून पुरवठा आदेश देता येईल.

कुंभमेळयासाठी सदर साहित्याची तातडीची गरज असल्याने सदरचे तुलनात्मक तक्त्यातील न्युनतम दरधारकांस पुरवठा आदेश देणेस व याकामी प्रत्येक्षात खर्च येणा-या रकूकम रुपये १५,०५,६९२/- (अक्षरी रु. पंधरा लाख पाच हजार सहाशे ब्यान्नव) मात्रचे खर्चास मान्यता असावी.

निर्णय क्र.२१० **सिंहस्थ कुंभमेळयाच्या कालावधीचा विचार करता, तातडीची आवश्यकता म्हणून पाणी पुरवठा विभागास सिंहस्थ कुंभमेळा- २०१५ करीता आवश्यक प्लंबींग साहित्य खरेदीकामीच्या उपरोक्त प्रस्तावास मा.अध्यक्ष व सदस्य यांची चक्रीय पध्दतीने मान्यता घेण्यात आलेली आहे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात येऊन, त्यास मान्यता देण्यता आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.०५ **डॉ.मनोहर शिंदे, कार्डीयालॉजीस्ट (कंत्राटी) यांचे मानधनाबाबत.**

प्रस्ताव- मा मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल केलेल्या सिव्हील ॲप्लिकेशन २७९७/२०१४ मधील दि. १९/०३/२०१४ रोजीचा निर्णय नुसार डॉ मनोहर शिंदे यांची श्री साईबाबा रुग्णालयात कंत्राटी पध्दतीने कार्डीओलॉजीस्ट या पदावर दरमहा मासिक सर्वसमावेशक एकत्रित मानधन रु ३,००,०००/- वर ६ महिने कालावधीसाठी तात्पुरती नेमणूक करणेत आली व त्यास मा त्रिसदस्य समिती सभा दि १२/०४/२०१४ चे निर्णय क्र २७५ नुसार मा व्यवस्थापन समितीची कार्योत्तर मान्यता घेण्यात आली होती.

मा मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल केलेल्या सिव्हील ॲप्लिकेशन २९०/२०१५ मधील दि. १२/०१/२०१५ रोजीचा निर्णय नुसार डॉ मनोहर शिंदे यांना दि ०२११/२०१४ पासून पुढे १ वर्ष किंवा पुढील आदेश होईपर्यंत जे आधी घडेल त्या कालावधीसाठी दरमहा मासिक सर्वसमावेशक एकत्रित मानधन रु ३,००,०००/- वर नेमणूक करणेत आली आहे.

डॉ मनोहर शिंदे यांना सर्वसमावेशक मासिक रुपये तीन लाख मानधना ऐवजी त्याच पदावर स्थायी स्वरुपात कार्यरत असणा-या इतर वैद्यकीय अधिका-यांना मिळणा-या वेतनाचे जवळपास म्हणजेच रु ६०,०००/- मानधन पुर्णवेळेसाठी अधिक कामाच्या प्रभाणात प्रतिकेस इन्सेन्टिव्ह लागू करण्यास तसेच इतर कार्डीयालॉजीस्ट यांना कॅथलॅब विभागातील शस्त्रक्रीया/ प्रोसिजर्स वरील इंन्सेटिव्ह दरात वाढ करणेबाबत मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव दि २६/०४/२०१५ रोजीचे मा त्रिसदस्य समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर करणेत आला होता. त्यावर निर्णय क्र १३९ नुसार इन्सेंटीव्ह देणेचा अंतिम निर्णय झाल्यानंतर डॉ मनोहर शिंदे यांचेबाबत स्वतंत्र प्रस्ताव सादर करणेत यावा असे ठरले.

दि. २८/०५/२०१५रोजीचे मा त्रिसदस्य समिती सभेत इंन्सेन्टीव्ह बाबतचा निर्णय अंतिम झालेला आहे.

आता डॉ मनोहर शिंदे यांनीदि. ११/०७/२०१५ रोजीचे अर्जान्वये 'मी दि. ०२ मे २०१४ रोजी कामावर हजर झालो असुन, मुलाखतीचेवेळी सुरवातीस 3 लाख रु मासिक मानधन देण्यात येईल व पुढीलदोन आठवड्यानंतर कामकाजाच्या अहवालावरुन मासिक रु ४ लाख अशी सुधारणा करण्यात येईल वसहा महिन्यानंतर प्रोत्साहनभत्ता लागु करणेत येईल, असे सांगणेत आले होते. तसेच काही डॉक्टरांसोबत कार्डीयाकविभाग सुरळीतपणे चालु ठेवलाव कार्डीयाक संबंधी खरेदीचेप्रक्रियेत सहभाग घेऊन गत वर्षात संस्थानचे रु. ६ कोटीची बचत केलेली आहे. तथापि आजपर्यंत माझया पगारात सुधारणा केलेली नसुन प्रोत्साहन भत्ताही चालु केलेला नाही.' यासाठी वेळोवेळी मी तोंडी तसेच लेखीस्वरुपात प्रशासनास मागणीकेलेली आहे. तरी माझे प्रकरणात लक्ष घालुन सदर अर्जाचा विचार करुन माझे पगारात सुधारणा करुन या वित्त वर्षापासुन प्रोत्साहन भत्ता लागु करणेत यावा असे कळविले आहे.

श्री साईबाबा रुग्णालयातील कार्डीओलॉजीस्ट डॉ.बजाज व डॉ.वर्मा यांना दि ०८/११/२०१४ पासून तात्पुरत्या स्वरुपात निलंबित केल्यानंतर डॉ शिंदे यांनी कार्डीयाक विभाग यशस्वीरित्या सांभाळलेला असुन आजही तो विभाग सुरळीतरित्या चालू आहे त्यामुळे निलंबित झालेल्या डॉक्टरांची उणिव त्यांनी भासू दिली नाही.

डॉ शिंदे यांचे उपरोक्त नमुद केलेले योगदान विचारात घेता तसेच दि २६/०४/२०१५ रोजीचे मा त्रिसदस्य समितीचे निर्णय क्र १३९ नुसार व आता डॉ मनोहर शिंदे यांचे दि ११/०७/२०१५ चे अर्जाचा विचार करता डॉ मनोहर शिंदे यांचे मानधनाबाबत तातडीने निर्णय घेणे योग्य ठरेल असे वाटते.

डॉ मनोहर विश्वासराव शिंदे यांना मासिक रुपये तीन लाख मानधनाऐवजी त्याच पदावर स्थायी स्वरुपात कार्यरत असणा-या इतर वैद्यकीय अधिका-यांना मिळणा-या सुरवातीचे वेतनाचे जवळपास वेतन त्यांना मानधन म्हणून आता रु ६१०००/- (अक्षरी रुपये एकसष्ट हजार मात्र) तसेच संस्थान नियमाप्रमाणे प्रोत्साहन भत्ता देता येईल.

निर्णयास्तव सादर.

निर्णय क्र.२११ **यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ.मनोहर विश्वासराव शिंदे, कार्डीयालॉजीस्ट (कंत्राटी) यांना एकत्रित मासिक रु.३,००,०००/- मात्र मानधनाऐवजी प्रती माह रु.६१,०००/- मात्र मानधन व संस्थान नियमाप्रमाणे प्रोत्साहन भत्ता (Incentive) देणेस मा.अध्यक्ष व सदस्य यांची चक्रीय पध्दतीने मान्यता घेण्यात आलेली आहे. त्याची नोंद घेण्यात येऊन, समितीच्या या निर्णयाची दि.०१ ऑगष्ट, २०१५ पासून अंमलबजावणी करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

वरील निर्णय क्र.२०१ ते २११ सर्वानुमते घेण्यात आला.
यानंतर रात्रौ ११.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरित/-xxx | स्वाक्षरित/- xxx | स्वाक्षरित/- xxx |
| (राजेंद्र जाधव) | (अनिल कवडे) | (विनय जोशी) |
| कार्यकारी अधिकारी | जिल्हाधिकारी, अहमदनगर | मुख्य जिल्हा न्यायाधीश |
| सदस्य | सदस्य | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी